
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ....सा.वा....
दा. क्र. : २२२८

BVBK-0402228

# उडत्या पाकळ्यांच्या शोधात



BVBK-0402228

सुभाष भांडारकर

रविराज प्रकाशन / पुणे ३०

प्रकाशक :
रवि बेहेरे
रविराज प्रकाशन,
४५८/२ सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ४११ ०३०.

मुद्रक :
रवि बेहेरे,
रविराज प्रिंटरी,
६३४, बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२,

प्रकाशन क्रमांक : ७१

प्रथमावृत्ती : जानेवारी १९८८

© सुभाष भांडारकर

मुखपृष्ठ :
सालकर

मुखपृष्ठ छपाई :
रविराज प्रिंटरी, पुणे २.

मूल्य : पंधरा रुपये

**बालमित्रांनो,**

साहसकथा कुणाला बरे आवडत नाहीत ?

लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वांनाच साहसकथेचे आकर्षण असते! परंतु त्यातल्या त्यात नऊ ते सोळा ह्या किशोरवयातील मुलांना, आपल्याच वयाच्या मुलांचा ज्यात सहभाग आहे, अशी साहसकथा वाचायला मिळणं ही एक मेजवानीच समजायला हवी !

सामान्यपणे, अशा मुलांना साहस, निसर्गातील अद्भुत्, गूढ व चमत्कृतिजन्य अशा घटनांबद्दल एक प्रकारचे विशेष कुतूहल व आकर्षण असते !

सचिन व सलमा ही अशीच तुमच्याच वयाची, सुसंस्कृत, विज्ञाननिष्ठ, उद्योगप्रिय व स्वावलंबी कुटुंबामध्ये वाढलेली दोन मुले आहेत. सहाजिकच तीसुद्धा स्वावलंबी, निसर्गावर प्रेम करणारी, नाविन्याची आवड असणारी, उत्साही आणि धाडसी नसतील तर ते नवलच म्हणायला हवं! आपल्या वडिलांबरोबर ती उन्हाळी सुट्टीत सहलीस निघतात व तिथे पोहोचताच उडत्या तबकड्यांचे रहस्य शोधून काढण्याच्या मार्गावर असलेल्या आपल्या वडिलधाऱ्यांना मदत करावी ह्या हेतूने एक मोठेच धाडस करतात. ते करतेवेळी त्यांना कोणत्या दिव्यातून जावे लागते; त्यातून ती शेवटी कशी पार पडतात हेच तुम्ही या साहसकथेत वाचणार आहात. मात्र एक अट, कथा वाचून झाल्यावर ती तुम्हाला कशी काय आवडली, हे कळवायला विसरायचं नाही बरं !

तुमचा सर्वांचाच

**सुभाष भांडारकर**

१० जानेवारी, १९८८

९, सुरय्या मंझिल,
पोस्टल कॉलनीसमोर,
नेहरू रोड, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०२९.

## अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| १) | सहल ठरली | १ |
| २) | आंबोलीत दाखल | ७ |
| ३) | विश्रामधामात मुक्काम | १२ |
| ४) | जंगलातून फेरफटका | १९ |
| ५) | फिरून पुन्हा विश्रामधामात | ३४ |
| ६) | तस्करांच्या गुहेत | ३८ |
| ७) | यू. एफ्. ओ. दृष्टिपथात | ४२ |
| ८) | मध्यरात्रीचे साहस | ४६ |
| ९) | सुखरूप परत | ५२ |
| १०) | परशुराम भूमीवर गुप्तचरांचे जाळे | ५५ |
| ११) | हवामहल बंगलीत | ६० |
| १२) | पुन्हा एकदा गुहेकडे | ६७ |
| १३) | शत्रूंच्या शिबिरात | ७२ |
| १४) | अवतार समाप्ति | ७९ |
| १५) | पुनर्जन्म | ८७ |
| १६) | थ्री चिअर्स टू थ्री | ९५ |

२२२८ १२।६।८८

एक :

# सहल ठरली

सूर्यास्तापूर्वीची ती वेळ. काळोखाच्या सावल्या हळूहळू डोंगर खाली उतरत होत्या. अशावेळी गर्द झाडीतील त्या निर्जन पायवाटेने चार शहरवासी व्यक्ती गप्पागोष्टी करीत रमत–गमत चाललेल्या होत्या. सर्वांच्या मागून शेपटी हलवीत चाललेला तो त्यांचा देखणा कुत्रा–बंटी–मध्येच थांबून आपली मागली तंगडी पंचेचाळीस अंशांच्या कोनात जमिनीपासून वर उचलून वाटेतील प्रत्येक अनोळखी झाडाला व दगडाला ओळखपत्रे बहाल करीत होता. त्या चार व्यक्तींपैकी पिळदार मिशा आणि दाढी असलेल्या सहा फुटी देखण्या व्यक्तीचे नाव होते कर्नल रफिक शेख. मध्यम बांध्याच्या गौरवर्णी विरळ केसांच्या दुसऱ्या चाळिशीतील

व्यक्तीचे नाव होते डॉ. प्रसन्न आणि त्यांच्याबरोबर चाललेली सुमारे दहा-अकरा वर्षे वयाची ती दोन मुले म्हणजेच सचिन व सलमा होती.

'कर्नलसाहेब, आपली बरीच वर्षे संरक्षणदलात गेली, मग यू. एफ्. ओज्. म्हणजे उडत्या तबकड्यांच्या बाबतीत आपले काय मत आहे ?' डॉक्टरसाहेबांनी प्रश्न केला.

यू. एफ्. ओज्चे नाव कानावर पडताच सचिन, सलमानेच काय पण बंटीनेसुद्धा आपले कान टवकारले आणि गुर्र गुर्र ऽऽ असा प्रश्नार्थक आवाज त्याच्या तोंडामधून सहज निघाला. आजकाल दूरदर्शनवरील यू. एफ्. ओ. सेरीज्चे कार्यक्रम पाहिल्यापासून तर लहानापासून थोरापर्यंत सर्वांचेच त्या विषयावरील औत्सुक्य वाढीस लागलेले होते.

'आपणास फक्त माझे मतच पाहिजे की, एकदा अनुभव पाहिजे? कर्नलसाहेबांनी डॉक्टरांवर तर सरळ सरळ बॉम्बच टाकला !

'म्हणजे अंकल, तुम्ही यू. एफ्. ओज् स्वतः पाहिलीहेत ?' सचिन व सलमा दोघेही एकदमच आश्चर्याने ओरडली.

सचिन व सलमा दोघे एकाच वयाची. एकाच शाळेत शिकणारी. एकमेकांची वर्गसोबती. सलमादेखील इतर मुलांचे ऐकून आपले वडील कर्नल शेख ह्यांना लहानपणापासून अंकल ह्याच नावाने हाक मारीत असे.

अरे हो ! पण या सर्वांची मी प्रथम तुम्हाला ओळख करून द्यायला हवी होती नाही का ? तेवढेच कसे विसरलो बघा !

डॉ. प्रसन्न, एम्. एस्सी., डि. एस्सी; एम्. एस्. ( यु. एस्. अे. ); पीएच्. डी. एवढ्या लांबलचक पदव्या नावापुढे असल्या तरी गृहस्थ तुमच्या–आमच्याप्रमाणेच अगदी साधासुधा आणि सर्वांशी मिळून–

मिसळून राहणारा ! पुण्यातील सुप्रसिद्ध कॉलेजमध्ये सूक्ष्माणू जीवशास्त्र शाखा-प्रमुख म्हणून ते काम करतात. अमेरिकेमधील सिनसिनाटी विद्यापीठात सतरा वर्षे संशोधन कार्य केल्यानंतर तेथील लठ्ठ पगाराची व मानाची नोकरी सोडून देऊन ते पाचच वर्षांपूर्वी पुण्यात येऊन स्थायिक झाले. रॉकफेलर फौंडेशनच्या मदतीने पुणे विद्यापीठाने नवीनच सुरू केलेल्या मॉलेक्युलर बायॉलॉजी शाखेचे ते प्रमुख बनले व अवघ्या पाचच वर्षांत त्यांनी पुण्यातील या संशोधन शाळेस जागतिक कीर्ती प्राप्त करून दिली. सचिन त्यांचा एकुलता एक मुलगा. प्राथमिक शिक्षण अमेरिकेत झाल्यावर पुण्यामधील अभिनव इंग्लिश स्कूलमध्ये तो सहाव्या यत्तेत शिकत आहे. सलमा ही त्याची वर्गसोबती. कर्नल शेख ह्यांची एकुलतीच मुलगी. कर्नलसाहेबांनी पाच वर्षांपूर्वी लष्करातून लवकर निवृत्ती घेऊन पुणे–पिंपरी महामार्गावर स्वतःचे एक कार गॅरेज व पेट्रोलपंप काढला. त्यांची पत्नी रोशनआरा हीदेखील स्वतःची ' रोशन ट्रॅव्हल्स ' नावाची ट्रॅव्हल एजन्सी चालवते.

डॉ. प्रसन्न व कर्नल शेख ह्यांची दोस्ती जमण्याचे सचिन–सलमा ह्यांच्यातील मैत्री हे एक तर कारण होतेच परंतु–

' समान शीले व्यसनेषु सख्यम् ' असे म्हणतात ना, त्याप्रमाणे दोघांच्या आवडीनिवडी व स्वभाव-विशेष जवळ जवळ सारखेच असा योगायोग जुळून आल्याने या दोनही कुटुंबांमधील मैत्री गेल्या पाच वर्षांत अधिकाधिक दृढ होत गेली.

दोघांनाही खगोलशास्त्र, अवकाशसंशोधन, प्राणीशास्त्र, बागकाम आणि निसर्ग व प्रवास यांची आवड. मग काय रोज घरात त्याच विषयांवरील चर्चा, नवे नवे संशोधन, नवे नवे प्रकल्प व योजना. मुलांनाही त्यामधून बरेच नवे ज्ञान मिळत होते आणि तीसुद्धा हुशार,

चुणचुणीत व उद्योगी बनत चाललेली होती. एवढेच काय आजकाल कर्नलसाहेबांचा लाडका बंटी कुत्रासुद्धा ह्या सर्वांच्या प्रकल्पांचा व धाडसी मोहिमांचा भागीदार व्हायला लागलेला होता !

कुत्र्यांच्या प्रदर्शनात तीन वेळा त्याची 'बेस्ट डॉग' म्हणून निवड करण्यात आली होती. कुत्र्यांच्या जगतातील जणू हिरोच होता तो !

बंडगार्डनवर जावे तर मुलांबरोबर आपला बंटी आहेच. पेशवे-पार्कवर जायचे ना ? मग बंटी नसेल तर नकोच जाऊ या. इतका बंटी मुलांचा लाडका ! म्हणून यंदाच्या उन्हाळी सहलीतही बंटीचा सहभाग घरातील सर्वांनाच अभिप्रेत होता.

यंदा उन्हाळी सुटी कुठे घालवायची हा विचार सुरू होण्यास आणि कर्नलसाहेबांना अचानक पुण्याचे पोलिस कमिशनर जोग-साहेब ह्यांचा टेलिफोन येण्यास एकच गाठ पडली.

तशी जोगसाहेबांची व कर्नल शेख यांची दोस्ती जुनीच; मग आजच एकाएकी ऑफिसमधून अगदी तातडीने त्यांनी कर्नलसाहे-बांना का बरे बोलावणे पाठवावे ? असे कोणते बरे महत्त्वाचे काम त्यांच्याकडे निघाले असावे ? असा घरी सर्वजण विचार करीत अस-ताना कर्नलसाहेबांचे घरात आगमन झाले. दिवाणखान्यात पाऊल टाकल्या टाकल्याच ते मोठ्याने म्हणाले–

'चला, यंदाची सुटी कुठे घालवायची हा आपला प्रश्न कमि-शनर जोगसाहेबांनीच सोडवून टाकला म्हणायचा शेवटी !'

त्यांच्या या उद्‍गारांवर सचिन–सलमा–बंटीसह सर्वांचीच उत्सु-कता अगदी शिगेला पोहोचली.

'अंकल, अंकल, आपण सर्वांनी कुठं जायचं या सुटीत ? सांगा ना, लवकर !' सलमा अधीर होऊन म्हणाली.

'अरे हो, हो. जरा सबूर, एवढी धाई कशाला? सांगणारच आहे मी सर्वांना! पण आधी प्रसन्नकाका आलेत का घरी ते सांगा पाहू?' कर्नलसाहेब एवढे बोलतात, तोवर डॉ. प्रसन्नांची मोटर येऊन फाटकापाशी थांबली. डॉ. प्रसन्न व कर्नल शेख ह्यांचे बंगले अगदी एकामेकास लागूनच होते. डॉ. प्रसन्नांबरोबर एका बाजूस जाऊन कर्नलसाहेबांनी थोडा वेळ काही बातचीत केल्यावर ते मुलांना म्हणाले,

'बरं का मुलांनो, यंदाची सुट्टी आपण कोकणात घालवायची, सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबोली ह्या गावी!'

'कोकण! ओहो! म्हणजे आंबे, काजू, मासे, फणस, जांभळं, करवंदं, शहाळी. डोंगरात भटकणं आणि खाडीतले खेकडे पकडणं! मज्जाच मज्जा! नाही, का हो, अंकल? आमच्या शाळेतला एक मित्र गेल्याच वर्षी कोकणात जाऊन आला, तो सांगत होता आम्हाला कोकणामधील गमती!' सलमा म्हणाली.

पोरे कोकणात जायला अगदी उत्सुक होती. बंटीसुद्धा आपली शेपटी तोंडात पकडण्याच्या प्रयत्नात स्वत:भोवतीच पृथ्वीसारखा गोल गोल फिरत आपल्या मनातील आनंद व्यक्त करीत होता. सर्वजण अगदी बेहद्द खूष होती कर्नलसाहेबांवर.

मुलांना तर परीक्षेचा निकाल केव्हा एकदा लागतो आणि उन्हाळी सुट्टी कधी एकदाची पडते असे झाले होते.

सलमा व सचिन यांनी कोकणात जाताना सोबत घ्यायच्या वस्तूंची तर एक भली मोठी यादीच बनविली, त्यात बॅट–बॉल, बॅटमिन्टनच्या रॅकेटस् व शटल कॉक्स्, पत्त्याचे संच, हार्मोनिका, मॅकॅनो, छोटी दुर्बिण, पेंटिंग व चित्रकलेचे साहित्य, सुट्टीत वाचायची पुस्तके इत्यादी सर्व काही सामावलेले होते.

कर्नलसाहेबांच्या बिबिजान, संचालिका रोशन ट्रॅव्हल्स ह्या सर्वांसाठी खास आपल्या ट्रॅव्हलिंग कंपनीची एक सुसज्ज मेटॅडोर गाडी देणार होत्या. शिवाय कर्नल आपली नेहमीची बंद जीप घेणारच होते बरोबर. राहण्याची सर्व सोय आंबोलीत सरकारी रेस्ट हाऊसवरील जागेत कमिशनरसाहेब करणार होते, परंतु स्वतःच कर्नलसाहेबानी तो सरकारी पाहुणचार नाकारला व आपल्या जुन्या दोस्तांपैकी एक कॅप्टन वागळे ऊर्फ डॅडी ह्यांच्या सावंतवाडी येथील प्रशस्त बंगलीत मुक्काम ठोकण्याचे ठरवले. लगेच कॅप्टन वागळेंना त्यांनी त्यासंबंधी एक सविस्तर पत्रही पाठवून दिले. बंगल्यात, त्यांची पत्नी वारल्यापासून गेले सात-आठ वर्षे डॅडी एकटेच राहात. डॅडींच्या त्या बंगल्यात टेलिफोन, टेलिव्हिजन व्हिडिओपासून ते रेफ्रिजेटर, कुकिंगरेंजपर्यंत सर्व सुखसोयी होत्या. बंगल्याभोवती सुंदर गार्डन आणि मागे पोहण्याचा तलावही होता. शिवाय भले मोठे बॅडमिंटन कोर्टही होतेच. एवढ्या सर्व सोयी उपलब्ध असल्यावर दुसरीकडे जायलाच हवे कशाला? आंबोली तेथून फक्त बारा किलोमीटर्सवर आहे. सर्व पुणेकर मंडळी डॅडींकडेच उतरणार हे निश्चित झाले,

दोन :

# आंबोलीत दाखल

कर्नलसाहेबांचे पत्र वाचताच कॅप्टन वागळे ह्यांना फारच आनंद झाला. त्यांनी लगेच उलट टपाली पत्रास उत्तर पाठवून सर्वांना सावंतवाडीस येण्याचे प्रेमाचे निमंत्रण दिले.

डॅडी ही व्यक्ती सावंतवाडीत अतिशय लोकप्रिय होती. पत्नीच्या निधनानंतर स्वतःच्या 'हवामहल' या नयनरम्य बंगलीतच राहण्याचे त्यांनी ठरविले. तसा त्यांचा एकुलता एक मुलगा ऑस्ट्रेलियाला त्यांना बोलवत होता. मुलगीही पुण्यास बोलवत होती, पण डॅडींचे मन कोकणाशिवाय कुठेच रमणे शक्य नव्हते. 'हवामहल' बंगलीत राहून खेळ, वाचन, लेखन व समाजकार्य ह्यामध्येच त्यांचा सारा वेळ जाई. त्यांचे घर म्हणजे लहान पोरासोरांपासून ते जख्खड म्हाताऱ्यां-

पर्यंत सर्वांनाच मुक्तद्वार होते. विद्यार्थी, शिक्षक, पोलिस, वकील, न्यायाधीश, डॉक्टर, कारखानदारांपासून आमदार, खासदारापर्यंत सर्व थरांच्या व वर्गातल्या लोकांची त्यांच्याकडे सदैव वर्दळ असे. मात्र कोकण दौऱ्यावर बऱ्याच वर्षांनी येणारा आपला हा जुना दोस्त नुसताच मजा करण्यासाठी येत असेलसे कॅप्टनसाहेबांना वाटेना. कर्नल शेख ह्या आपल्या दोस्ताचा मुलुखाचा उपद्व्यापी स्वभाव त्यांना ठाऊक असल्यामुळे हा कोणते बरे काम घेऊन इकडे येत असावा ?' असे एक भले मोठे प्रश्नचिन्ह डॅडींच्या डोळ्यांसमोर उभे राहिले.

दोन चार दिवसांपूर्वीच वर्तमानपत्र चाळीत असताना डॅडींनी एक बातमी वाचली होती. तिचे शीर्षक होते– ' कोकण समुद्र किनाऱ्यावर उडत्या तबकड्या – यू. एफ्. ओज् दृष्टिपथात ' पेपरमधील अगदी हीच बातमी वाचत असताना डॅडींना शेखसाहेब येणार असल्याची वार्ता मिळाली होती. त्यामुळे या दोन घटनांचा परस्पर काहीतरी संबंध असावा असे त्यांना त्यांचे मन सांगत होते.

१ मे रोजी अमावास्या होती. तसे डॅडींना सर्व दिवस सारखेच होते म्हणा ! परंतु अलीकडे काही महिन्यात दर अमावास्येला रात्रौ बारा वाजण्याच्या सुमारास सावंतवाडी नजीक असलेल्या दाणोली या खेडेगावात काही अघटित घटना घडत असत. तेथील श्रीसमर्थ साटममहाराजांच्या समाधीस स्वतः साटममहाराज भेट देत असत. भक्तांस प्रत्यक्ष त्यांचे दर्शन घडे. त्यामुळे या छोट्याशा गावात त्या दिवशी एक मोठी जत्रा भरे. दाणोली हे सह्याद्रीच्या आंबोली घाटमाथ्यावर असलेले पर्यटकांचे आकर्षण असलेले थंड हवेचे ठिकाण. सुमारे ५० वर्षांपूर्वी दिवंगत झालेल्या अवलिया पुरुष श्रीसमर्थ साटममहाराजांची इथे समाधी आहे.

तिथे त्यांच्या पादुकाही ठेवलेल्या आहेत. आजपर्यंत दरवर्षी फक्त साटममहाराजांच्या पुण्यतिथीलाच तेवढा या गावात एक उत्सव होत असे. एरवी येथे अगदी चिडीचाप असे. पण काय झाले कुणास ठाऊक! गेल्या सहा-सात महिन्यांपासून मात्र दाणोली-आंबोली मार्गावर दर अमावास्येच्या दिवशी व तत्पूर्वी एक दोन दिवस मोठी रहदारी दिसू लागली. कुणीतरी म्हणत अमावास्येस रात्रौ बारा-एकच्या सुमारास दाणोलीस श्रीसमर्थ साटममहाराज स्वतः येऊन कोकणातील समस्त दीनदुःखी लोकांना व भक्तगणांना आशीर्वाद देतात. त्याकरिता त्या ठिकाणी एक जत्रा भरे आणि कोकण व इतरत्र भागांतून महाराजांच्या दर्शनासाठी अमावास्येच्या आसपास दाणोलीकडे लोकांची मोठी रीघ लागे.

अर्थात् ही अफवा कुणी पसरविली कुणास ठाऊक? साटम-महाराज प्रत्यक्ष आलेले किंवा गेलेले असे कुणीच पाहिले नव्हते! फक्त ते अचानक बाह्य अवकाशामधून एका उडत्या तबकडीतून आंबोली घाटात उतरतात व तेथून अज्ञातमार्गाने दाणोलीस आपल्या समधीजवळ प्रकटतात असे बोलले जाई. ह्या गोष्टीची शहनिशा व्हावी म्हणून डॅडींना त्यामागील रहस्य जाणून घेण्याची तीव्र इच्छा होती. शिवाय त्याबद्दल बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या कानावर आल्या होत्या. त्यावरून ह्या सर्व प्रकारामागे सूत्रधार असणारी व्यक्तीदेखील कोण असावी ह्याबद्दल डॅडींनी तर्क बांधला होता. परंतु त्याविषयी संशय व्यक्त करणे म्हणजे साटममहाराजांच्या कोपास बळी पडण्यासारखे होते! एखादेवेळी अशा संशयात्म्याच्या प्राणासही धोका होता. तशा काही घटनाही घडलेल्या होत्या. स्वतः डॅडी धोका पत्करण्यासही तयार होते. परंतु त्यांना कुणाचे तरी पाठबळ हवे होते. कर्नलसारखी धाडसी व्यक्तीच त्यांना

ह्या रहस्याचा भेद करण्यास मदत करू शकली असती. कर्नल सावंतवाडीस येणार ह्या वार्तेने म्हणूनच डॅडी मनोमनी खूप आनंदले !

कर्नल ही व्यक्ती फार हुशार आहे हे डॅडी जाणून होते. आपली पत्नी कालिंदी कधी कधी मजेत आपल्याला चिडवत असे, ते तिचे शब्द आज अशावेळी डॅडींना आठवले–' काय मिस्टर वाघळू ! शेवटी उगाच नाही सरकारनं तुम्हाला कॅप्टन व शेखला कर्नल बनवलं ते ! '

दिवंगत पत्नीच्या आठवणीने क्षणभर डॅडी अस्वस्थ झाले. एवढ्या वर्षांनी आपल्या स्वतःच्या ह्या सुंदर बंगलीत आपला हा जुना दोस्त येणार, परंतु त्याचे स्वागत करायला ह्या बंगलीची मालकीण मात्र नसणार हा विचार त्यांना काहीसा उद्विग्न करून गेला. पण दुसऱ्याच क्षणाला स्वतःला सावरून ते ओरडले,

' अरे ज्ञानू, शंकर, कोण आहे रे तिकडे ? अरे, सर्व खोल्या नीट साफसूफ झाल्यात ना ? खिडक्यांची तावदानं पुसा पाहू ! एक बडे पाहुणे यायचे आहेत पुण्याहून परवा ! सर्व गाद्यांवरील चादरी, उशांचे अभ्रे धुऊन इस्त्री करून आणून ठेवा.–बरं का ? आणि खोलीतले गालिचे स्वच्छ झटकून पुन्हा नीट लावा ! ' अशा एकामागून एक अनेक सूचना ते बंगलीच्या मालकिणीची अनुपस्थिती नोकरवर्गास जाणवू नये म्हणून करू लागले.

शेवटी एकदाची २९ एप्रिल ही पाहुण्यांची सावंतवाडीस येण्याची तारीख उजाडली. सकाळपासूनच डॅडींची धावपळ व गडबड सुरू झाली. सकाळपासून त्यांनी आचारीबुवांना ' चहा–कॉफी–फराळ तयार आहे ना रे ?' हा प्रश्न किमान दहावेळा तरी विचारला असावा. अखेर एकदाचा दहाचा ठोका पडला आणि 'हवामहल' बंगलीच्या फाटकावर मोटारचा पिं ऽ ऽ पिं ऽ ऽ पीं ऽ ऽ ऽ असा दीर्घ कर्णा ऐकू

आला. 'अरे बघता काय ? पाहुणे आले, दरवाजा उघडा !' कॅप्टन वागळे मोठ्याने ओरडून नोकरवर्गास उद्देशून म्हणाले.

तेवढ्यात एक जीप फाटकातून आत आली. त्यात एकटाच ड्रायव्हर होता. आंबोली घाटात पाहुण्यांची मेटॅडोर बिघडली असून ती दुरुस्त झाल्यास मंडळी रात्रौ सावंतवाडीस मुक्कामास येतील हा निरोप द्यायला जॉन ड्रायव्हर आला होता. जॉन सावंतवाडीहून एका कार-मेकॅनिकला सोबत घेऊन आंबोलीस लगेच निघून गेला.

●

तीन :

# विश्रामधामात मुक्काम

आंबोली घाटामध्ये अडकलेली मंडळी गाडी ढकलत घेऊन कशी-बशी एकदाची आंबोलीमधील सन सेट पॉइंटसमोरच्या सरकारी रेस्ट हाऊसमध्ये आली. कर्नलसाहेब कोण आहेत हे कळल्यावर सरकारी विश्रामधामात राहण्याची सर्व सोय झाली. स्नान व नाश्ता होईस्तोवर जॉन सावंतवाडीहून मेकॅनिकला घेऊन आला. जॉनचे खाणेपिणे सावंत-वाडीच्या हॉटेलमध्ये येतेवेळीच झालेले होते. त्यामुळे त्याने मेकॅनिकला सोबत घेऊन मेटॅडोर गाडी दुरु-स्तीचे काम प्रथम हाती घेतले.

सर्वांची पोटे आता गच्च भरलेली होती. प्रवासामधील दगदगीमुळे मुले आता पेंगू लागलेली होती. बंटी एकटाच रेस्टहाऊसच्या आवारात

इकडे तिकडे शेपूट हलवीत व जमीन हुंगत फिरत होता.


कर्नलसाहेब आणि डॉ. प्रसन्न दिवाणखान्यात त्या दिवसाच्या वर्तमानपत्रांचे अंक चाळीत आरामखुर्चीत बसून विश्रांती घेत होते. एवढ्यात कर्नलसाहेबांची नजर तेथील स्थानिक वर्तमानपत्रामध्ये आलेल्या काही बातम्यांकडे वेधली गेली. एका बातमीत म्हटले होते–

'आमचा सिंधुदुर्ग जिल्ह्याचा खास वार्ताहर कळवितो की,

युरोप–अमेरिकेत दिसणाऱ्या उडत्या तबकड्या किंवा यू. एफ. ओज्. भारतात दिसल्याचे प्रकार क्वचितच ऐकू येतात. अलीकडे काही दिवसांत मात्र अशा प्रकारच्या उडत्या तबकड्या मधूनमधून कोकण किनाऱ्यालगत दृष्टीस पडत असल्याच्या बातम्या आम्हाला सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विशेषतः मालवण, वेंगुर्ले, शिरोडा, रेडी वगैरे किनारपट्टीलगतच्या गावांतील नागरिकांकडून ऐकू येऊ लागलेल्या आहेत. असे प्रकार बहुतेकवेळी अमावास्येजवळपासच घडतात. अशावेळी त्या गावामधील रस्त्यातील व घरामधीलही विद्युत्प्रवाहात अडथळा येतो. गावेच्यागावे रात्रौ बराच काळ अंधारात बुडून जातात! त्यामुळे काही लोक समुद्रपट्टीकडील ह्या गावात अलीकडे दिसणाऱ्या उडत्या तबकड्यांचा संबंध विद्युत् प्रवाह खंडित होण्याशी लावीत आहेत. काहींच्या मते पृथ्वीसभोवतालीच्या अयनांबरांचा थर अवकाशामधून प्रचंड वेगाने वातावरणात घुसणाऱ्या उडत्या तबकड्यामुळे वारंवार विचलीत होत असावा व त्यामुळे पृथ्वीवरील वीजनिर्मिती केंद्रात अडथळे निर्माण होऊन वीजप्रवाह खंडित होत असावेत.

तर काही लोक म्हणतात की, दर बारा वर्षांनी सूर्याच्या पृष्ठभागावरील डागांची संख्या वाढते. त्यामुळे सूर्यावरून प्रचंड मोठ्या प्रमाणात चुंबकीय शक्ती अवकाशात फेकली जाते. पृथ्वीवरील

चुंबकीय क्षेत्रात अशावेळी फार मोठे बदल होतात आणि तेथील आकाशवाणी, दूरचित्रवाणी व विद्युत्‌निर्मिती केंद्रे ह्यांच्या प्रक्षेपणात अडथळे येतात. ह्यावर्षी सूर्यावरील डाग वाढल्यामुळे तर असे होत नसावे!' लोक असे अनेक तर्क लढवीत आहेत.



दुसऱ्या बातमीत म्हटलेले होते–

'यू. एफ्. ओज्. ' बद्दल आमचे वेंगुर्ला व रेडीकडील वार्ताहर श्री. काका कामत कळवितात–

गेल्या अमावास्येस रात्रौ दोन वाजण्याच्या सुमारास वेंगुर्ले–उभादांडा येथील काही नागरिकांना किनाऱ्याजवळील आकाशात

एक विलक्षण दृश्य दृष्टीस पडले. एकाएकी आकाशात समुद्रकिनारपट्टीजवळ ९-१० उडत्या तबकड्यांसारखे दिसणारे प्रचंड प्रकाशमान गोल हवेत तरंगताना नागरिकांना दिसले. गावातील वीजपुरवठा त्यावेळी खंडित झालेला होता. काही वेळाने त्यामधील काही तबकड्या किनाऱ्यावरील जमिनीवर अलगद खाली उतरल्या. त्या तबकड्यांमधून चित्रविचित्र चेहऱ्यांच्या, कानाच्या जागी टी. व्ही. अँन्टेनासारख्या अँन्टेना असणाऱ्या अशा काही श्वापदासदृश सजीव व्यक्ती बाहेर आल्या अन् काळोखात जवळच्या झुडुपात क्षणार्धात नाहीशा झाल्या ! ह्या व्यक्तींना टॉर्चच्या प्रकाशात ज्या नागरिकांनी पाहिले त्यांना ते बाह्य अवकाशामधून आलेले सजीवच असावेत असा भास झाला ! असे प्रकार इतरत्रही अधूनमधून दृष्टीस पडल्याचे आमच्या कानावर येत आहे. तरी शास्त्रीय जगतातील कुणी अधिकारी व्यक्ती ह्या उडत्या तबकड्यांवर आणि बाह्य अवकाशातील सजीवांच्या पृथ्वीवरील आगमनावर काही प्रकाश टाकू शकेल का ?'

स्थानिक वर्तमानपत्रातील बातमीपत्रे वाचून झाल्यावर कर्नलसाहेबांनी ते सर्व अंक डॉ. प्रसन्नांकडे दिले आणि स्वतः फाइव्ह फाइव्ह फाइव्ह सिगारेटचे झुरके घेत विचारमग्न अवस्थेत ते खोलीतच येरझारा घालू लागले. यू. एफ्. ओजसंबधीच्या चमत्कृतिजन्य बातम्या वाचता वाचता डॉ. प्रसन्नांवर मात्र निद्रादेवी कधीच प्रसन्न झाली होती !

पुणे ते आंबोली सतत ड्रायव्हिंग केल्यामुळे कर्नलसाहेबांना आलेला थकवा त्यांच्या प्रत्येक हालचालीत दृक्गोचर होत होता. डॉ. प्रसन्न तर प्रवासातील दगदगीमुळे थकूनभागून आरामखुर्चीत पडल्या पडल्याच झोपलेले होते. बंटीही रेस्टहाऊसच्या आवारात

आपल्या शरीराचे मुटकुळ करून त्यात मुंडी खुपसून कुतरझोप घेत पडलेला होता. मुले आधीच आतल्या खोलीत झोपी गेलेली होती. जॉन व मेकॅनिक यांचे ठाकठुक् ठाकठुक चालूच होते. कर्नलसाहेबांना चहाची अनिवार तलफ आली. झोपलेल्या प्रसन्नांना जागे करणे त्यांच्या अगदी जिवावर आले. मग ते एकटेच बाहेर पडले; कुठेतरी गरम गरम चहा मारून यावा, म्हणजे प्रवासाचा शीण तरी जाईल असा विचार करून जॉन ड्रायव्हरजवळ निरोप ठेवून ते निघाले, ते तडक जवळच असलेल्या महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या कॅन्टिनमध्ये शिरले.

आंबोली हे कोकणामधील सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वसलेले एक छोटेसे निसर्गरम्य खेडे आहे. अलीकडे तेथे महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाने उन्हाळ्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी निवासस्थाने व उपाहारगृह बांधून पर्यटकांची फार छान सोय केलेली आहे. पर्यटन केंद्रामागे जंगलाच्या सुरुवातीस वनविभागाचे सुंदर उद्यान आहे. त्यांत एका बाजूस छोटी रोपवाटिका, कृत्रिम गुहा व सरोवर बनविलेले आहे. मुलांना खेळण्यासाठी बागही आहे. दुसरीकडे छोटे प्राणि–संग्रहालय आहे.

पर्यटन केंद्रासमोरच्या रस्त्याने जरा पुढे गेले की, वरच्या अंगास अठराव्या शतकातील इंग्रज-मराठे युद्धामध्ये कामी आलेल्या योद्ध्या इंग्रज अधिकाऱ्यांची थडगी व त्यावरील लिखाण गतइतिहासाची साक्ष देतात. जवळच शिवकालीन महादेवगड ह्या किल्ल्याचे उरलेसुरले ढासळलेले बुरूज दिसतात.

तिथून वर पुढे चालत डोंगरकड्याजवळील वाटेने गेले की, थोड्याच वेळात भग्नावस्थेत उभा असलेला सावंतवाडीचे भूतपूर्व नरेश श्रीमंत बापूसाहेब खेमसावन्त भोसले ह्यांचा उन्हाळी प्रासाद

दृष्टीस पडतो. त्या प्रासादामधील भव्य स्नानगृहे. टबबाथ व मुदपाकखाने त्याच्या गतवैभवाची साक्ष देतात. ह्या प्रासादाच्या गॅलरीत उभे राहिले की, सायंकाळच्या वेळेस दूरवर अस्तास चाललेल्या अरबी समुद्रात बुडणाऱ्या सूर्यनारायणाचे नयनमनोहर रूप कुणालाही सुखावते ! स्वातंत्र्यपूर्वकाळात म. गांधींचे वास्तव्य ह्या प्रासादात होते असे सांगतात.

आंबोलीपासून सुमारे दोन ते अडीच मैलांवर असलेले डोंगरदरीतील शिवमंदिर हे पर्यटकांचे आकर्षण आहे ह्यालाच हिरण्यकेशी मंदिर म्हणतात, हे मंदिर चालुक्यराजांच्या कारकिर्दीत बांधले गेले असावे असे म्हणतात. त्यापुढे गेल्यावर अतिप्राचीन पांडवलेणी असलेल्या गुहा आहेत.

आंबोली ह्या पर्यटन स्थळाला पावसाळ्याच्या सुरुवातीस भेट द्यावी. त्या वेळच्या धुक्यात एकदा हरविलेल्या माणसाचे मन पुन्हा त्याचे त्यालाच गवसणे कठीण !

कर्नल पर्यटन केंद्रातील कॅन्टिनमधला चहा पिऊन पुन्हा विश्रामधामात आले. तोवर झोपलेली मंडळी जागी झाली होती. एवढ्यात बंटीच्या भुंकण्याच्या आवाज ऐकून मुले व पाठोपाठ कर्नलसाहेब फाटकापाशी आले. तिथे एक डोकीस शिरस्त्राण घातलेला व काळा गॉगल लावलेला युरोपियन गृहस्थ एका इम्पाला गाडीपाशी उभा होता. मुलांना पाहून आपल्या मोडक्या--तोडक्या इंग्रजीत त्याने दाणोलीकडे जाणाऱ्या रस्त्याची चौकशी केली. कर्नलसाहेबांनी अंगुली निर्देशन करून त्याला दाणोलीकडे जाणारा रस्ता दाखविला, आपण पर्यटक असून साटममहाराजांच्या समाधीचे दर्शन घ्यायला

जात आहोत असे काहीतरी तो पुटपुटला. मग तिथे उभ्या असलेल्या गाडीतून पर्यटन केंद्राच्या दिशेने कुठेतरी तो निघून गेला.

एवढ्यात जॉनने संध्याकाळच्या वेळेस बांदेकरच्या हॉटेलात गरम भजी मिळतात ही बातमी मंडळीस पुरविली. भज्यांचे नाव काढताच सर्वांच्या तोंडाला पाणी सुटले. सर्वजण मग बांदेकर उपाहारगृहाच्या दिशेने निघाले. ह्या वेळेस सायंकाळचे पाच वाजले होते. पर्यटन केंद्रामागील जंगलात फेरफटका मारून सात–साडेसातला पुन्हा विश्रामधामावर यावे व मेटॅडॉर दुरूस्त झालेली असल्यास रात्रौ सावंतवाडीस डॅडींच्या 'हवामहल' बंगल्यावर मुक्काम ठोकावा असा विचार करून मंडळी चालू लागली.


बांदेकर उपाहारगृहातील गरमागरम भजी व चहा ह्यांचा आस्वाद घेऊन ही पुणेकर मंडळी बंटीसह वर्तमान मग एकदाची वनविभागाच्या जंगलात येऊन दाखल झाली.

म. ह. मं. कार्वे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय वि भाग.
वाचांक : ........ दिनांक .....
क. ......

## जंगलातून फेरफटका

वनविभागाच्या जंगलाकडे जाणारा रस्ता गर्द झाडीतून हिरण्यकेशी डोंगराकडे जातो. ह्या जंगलात पूर्वी शिकारी वाघाच्या शिकारीसाठी येत व मोक्याच्या जागी माचणे बांधून राहत असत. अजूनही हे टप्पे 'पहिले माचण' 'दुसरे माचण' ह्या नावांनीच ओळखले जातात. आता मात्र हा विभाग सरकारच्या राखीव जंगलांपैकी एक असून वाघासारख्या श्वापदांची शिकार करण्यास इथे कायद्याने सक्त मनाई आहे.

कथेची सुरुवात ह्याच गर्द झाडीमधील पाऊलवाटेवर झाली हे—आता बालवाचकांच्या लक्षात आले असेलच. डॉ. प्रसन्नांनी कर्नलसाहेबांना यू. एफ्. ओज्‌संबंधी विचारलेला प्रश्न, दुपारी रेस्टहाऊसवर त्यांनी वाच-




लेल्या वर्तमानपत्रांतील बातम्यांवर आधारित होता हेदेखील— बालवाचकांच्या सहज लक्षात आले असणार. सचिन व सलमा ह्या दोन्ही मुलांना यू. एफ्. ओज्बद्दल असलेले कमालीचे औत्सुक्य ओळखून कर्नल त्यांना स्वतःचा ह्या बाबतीतील खास अनुभव सांगू लागले,

'मुलांनो, १९७७ सालची ही गोष्ट आहे. मी लंडनहून विमान-मार्गे—लँकेशायरला चाललो होतो. माझा ब्रिटिश मित्र मला लँके-शायर विमानतळावर उतरून घ्यायला येणार होता. विमान पहाटे लँकेशायरला पोहोचणार होते. डिसेंबरमधील कडाक्याच्या थंडीचे ते दिवस! सर्वत्र धुक्याचे साम्राज्य पसरलेले होते! अशा वेळी लँकेशायर विमानतळाकडे जाणारा रस्ता निर्जन भासत होता. माझा मित्र सकाळी सहाला लँकेशायर विमानतळावर पोहोचावयाचे असल्यामुळे पहाटेच आपली मोटार घेऊन बाहेर पडला, सर्वत्र धुके असल्यामुळे तो सावधगिरीने गाडी चालवत होता. त्याच्या गाडीने

सुमारे अर्धे अंतर कापले न कापले तोच एकाएकी एक चमत्कार झाला. वेगात असलेल्या त्या गाडीचा वेग काहीही कारण नसताना एकदम मंदावला, ती क्षणात जागच्या जागी उभी राहिली ! असे का होते आहे हे माझ्या मित्राला समजेना. मग त्याने खाली उतरून ' गाडीचा पुढील बॉनेट बॉक्स उघडून पाहू ' असा विचार केला तो खाली उतरण्याचा प्रयत्न करू लागला परंतु आश्चर्य म्हणजे त्याला काही केल्या मुळी त्याच्या आसनावरून जराही हलता येईना ! त्याने स्वत:च्या मनगटावरील स्वयंचलित घड्याळाकडे पाहिले तर तेदेखील एकाएकी बंद पडलेले होते !

कुणीतरी अदृश्य शक्तीने आपली गाडी रोखून धरली असून आपल्याला आपल्या जागेवरच गच्च पकडून धरलेले असल्याचा त्याला भास झाला. आपण स्वप्नात तर नाहीना म्हणून त्याने स्वत:लाच जोराने चिमटा घेण्याचा प्रयत्न केला पण त्याला आपला हातही वर उंचावता येईना ! इतक्यात त्याला गाडीच्या काचेमधून एक चिरुटासारखी लांबट प्रकाशमान विलक्षण आकृती गाडीवर उंच आकाशात फिरत असल्याचे दिसले. त्यानंतर एक दोन मिनिटांत एकदम गाडीचे पुढील मोठे दिवे प्रखर झाले. गाडी हिंवताप भरल्याप्रमाणे जागच्या जागी थरथरू लागली. क्षणात एक प्रचंड मोठी पारदर्शक शरीर व लालबुंद डोळे असलेली मानवी आकृती येऊन गाडीपुढे उभी राहिली ! तिच्या शरीरातून जणू क्ष–किरण आरपार गेलेले होते ! अशी सुमारे सात–आठ मिनिटे निघून गेली असतील ! माझा मित्र सैन्यात काम करीत असूनही भयचकीत झाला ! जवळपास मदतीला हाक मारावी तर कुणीच नव्हते ! हळू हळू ती पारदर्शक शरीराची आकृती वर वर सरकत जाऊन त्या आकाशातील फिरकणाऱ्या यू. एफ्. ओ.सारख्या दिसणाऱ्या प्रकाशमान आकृती-

जवळ जाऊन उभी राहिली व क्षणात अदृश्य झाली! दुसऱ्या क्षणाला ती यू. एफ्. ओ सारखी दिसणारी वस्तू अतिशय वेगाने क्षितिजापलीकडे नाहिशी झाली! माझ्या मित्राची कार लगेच पूर्ववत् वेगाने चालू होऊन लॅकेशायर विमानतळावर ठरलेल्या वेळेस येऊन पोहोचली. त्याचे मनगटावरील बंद पडलेले घड्याळ वरील प्रकारानंतर आपोआप चालू झालेले होते. लॅकेशायर विमानतळावर त्याची व माझी भेट झाली तेव्हा माझ्या व त्याच्या मनगटांवरील घड्याळात सुमारे आठ मिनिटांचा असलेला फरक मी त्याच्या निदर्शनास आणून दिला. विमानतळावरील ब्रिटिश स्टॅन्डर्ड टाइम-प्रमाणे माझे घड्याळ अगदी अचूक वेळ दाखवित होते. माझ्या इंग्रज मित्राचे घड्याळ मात्र आठ मिनिटे मागे पडलेले होते. त्याच्या घड्याळाकडे पाहात मी त्याला थट्टेने इंग्रजीतून म्हणालो– 'पाहिलंत, आम्ही भारतीय नागरिक ब्रिटिश नागरिकांपेक्षा अधिक वक्तशीर असतो बरं!' ते ऐकून आपले घड्याळ आठ मिनिटे का




मागे पडले त्याचा त्याने-वरीलप्रमाणे खुलासा केला. त्याचा तो अनुभव ऐकून मीसुद्धा प्रथम चकीतच झालो '

सचिन व सलमा कर्नलसाहेब सांगत असलेल्या त्या गोष्टीत एवढी रंगली होती की, ते गोष्ट सांगण्याचे थांबले तरी कुणाच्याच ते लक्षात आले नाही. नंतर बऱ्याच वेळाने भानावर आलेल्या सलमाने प्रश्न केला–


' पण अंकल, अगदी प्रथम उडती तबकडी कुणी पाहिली ? '

' २४ जून १९४७ रोजी अमेरिकन वैमानिक उद्योगपती केनेथ अर्नाल्ड ह्याला कॅस्केड पर्वत रांगात स्वत:चे हरविलेले विमान शोधत असताना एकदम नऊ उडत्या तबकड्या दिसल्या ! त्याचा आकार बशीसारखा होता व त्या दर ताशी सुमारे बाराशे मैल वेगाने उडत होत्या ! त्यामधून तीव्र प्रकाशझोत बाहेर पडत होते, अर्नाल्ड ह्याने त्या प्रकाशमान वस्तूंना ' फ्लाइंग सॉसर्स ' म्हणजे उडत्या तबकड्या असे संबोधले व हेच नाव मग रूढ झाले. त्यानंतर १९४८, १९५२, १९६८ तसेच १९६९ व १९७० साली अनुक्रमे अमेरिका, फिनलंड, ब्राझिल, नॉर्वे, श्रीलंका वगैरे देशांत वैमानिक व बोटीवरील कप्तान ह्यांनी विविध आकाराच्या उडत्या तबकड्या ठिकठिकाणी पाहिल्याचे ते सर्व खात्रीपूर्वक सांगतात. '



' अंकल, यू एफ्. ओज्मधून परग्रहांवरील फार हुशार माणसे पृथ्वीवर उतरून पृथ्वीचे फोटो घेऊन जातात असं माझा मित्र समीर सांगत होता. खरं का हो ते ? ' सचिनने प्रश्न केला.


'हे बघ सचू, तू ह्या विषयावरचे आपल्या पुण्यात झालेले सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर ह्यांचे भाषण ऐकायला हवे होतेस! बहुतेक सर्व शास्त्रज्ञांच्या मते हे सर्व दृष्टिभ्रम आहेत. अशातऱ्हेचे भ्रम होण्याची बरीच कारणे संभवतात. सूर्यकिरणांचे बर्फावरून होणारे परावर्तन, अग्निबाण प्रक्षेपणामुळे आकाशात दिसणारे प्रकाशमान चकचकीत लोळ, स्थलांतर करणारे पक्षी, शोधक दिव्यांचा प्रकाश, अंतराळात फिरणारे मानवनिर्मित उपग्रह, अग्निबाण, तसेच अवकाशयाने इत्यादींचे फुटूनतुटून गेलेले पृथ्वीच्या कक्षेत फिरत असलेले भंगार ह्या सर्व वस्तू उडत्या तबकड्या असल्याचाच भास निर्माण करतात. मानवनिर्मित सुमारे चार हजार लहान-मोठे उपग्रह अवकाशात आजपावेतो सोडले गेले असतील. त्यांपैकी बरेचसे कालांतराने नष्ट झाले. त्यांचे छोटे-मोठे भाग व त्यांच्यामधील यंत्रे अजूनही पृथ्वीच्या कक्षेत फिरत आहेत. हे सर्व भंगार जेव्हा वेळोवेळी प्रचंड वेगाने पृथ्वीच्या वातावरणात शिरते तेव्हा वातावरणाशी त्याचे घर्षण होते. ह्यामुळे प्रचंड उष्णता व प्रकाशनिर्मिती होते. परिणामी अशा वस्तूंचे रूपांतर वेगवेगळ्या आकाराच्या भासमान उडत्या



तबकड्यात होऊ शकते. वाळवंटातील प्रवाशाला मृगजळाचा भास नाही का होत ? तसलाच हा अवकाशातील मृगजळाचा प्रकार होय.'

'कर्नलसाहेब, आपण एरिच व्हॉन डेनिकन ह्या अमेरिकन लेखकाची 'चॅरियेटस् ऑफ गॉड ' ही गाजलेली कादंबरी वाचली आहे का ?' मुले व कर्नल शेख ह्यांच्यातील माहितीपूर्ण संभाषणाला डॉ. प्रसन्न ह्यांनी विचारलेल्या प्रश्नामुळे मध्येच खंड पडला.

कर्नलसाहेबांनी थोडा विचार केला व नकारार्थी मान हलविली.



'प्रसन्नकाका, काय लिहिलंय् त्या पुस्तकात ? आम्हालाही सांगा ना जरा ! ' सलमाने उत्सुकता दाखविली.

'बाळ, डेनिकन हे पुराणवस्तू अभ्यासक व जगभर प्रवास केलेले एक सुप्रसिद्ध विज्ञानकथा लेखक आहेत. ते अमेरिकन नागरिक आहेत. प्राचीन भारतीय ग्रंथ व वास्तू ह्यांचासुद्धा डेनिकनसाहेबांनी अभ्यास केलेला आहे. त्यांची गाजलेली कादबरी म्हणजे 'चॅरियेटस् ऑफ गॉड ' आपण तिला देवांचे रथ म्हणू या. ह्या कादंबरीत डेनिकन ह्यांनी डार्विनचा वर्षानुवर्षे पुस्तकांमधून मुलांना शिकविला जाणारा उत्क्रान्तिवाद सिद्धांत संशयास्पद असल्याचे म्हटले आहे !'

'पण अंकलनी परवा सायन्स शिकवताना आम्हाला मनुष्यप्राणी हा उत्क्रांती होत होत माकडापासून निर्माण झाला असेच सांगितले. हो की, नाही अंकल?' सचिन व सलमा एकदम उद्गारली!

'अरे, अंकल काय किंवा मी काय, वर्षानुवर्षे जे पुस्तकातून शिकत आलो, तेच तुम्हाला सांगणार! परंतु डेनिकनसारखे काही विचारवंत शास्त्रज्ञ डार्विनच्या ह्या सिद्धांताचा पुनः एकदा नवीन पद्धतीने अभ्यास करून त्यात सुधारणा करण्याची गरज आहे असे म्हणू लागले आहेत!'

'अलीकडेच काही वर्षांपूर्वी भारतीय दूरदर्शनने सुप्रसिद्ध अवकाश-शास्त्रज्ञ व बाह्य अवकाश जीवशास्त्राचे अभ्यासक (एक्झोबायालॉजिस्ट) फिलिप् मॉरिसन यांची दूरदर्शनसाठी एक खास मुलाखत घेतली होती. त्यावेळी बोलताना ते म्हणाले होते–

'डार्विनच्या उत्क्रांतिवादाच्या सिद्धांताची गती एवढी मंद आहे की, त्यानुसार अमिबा ह्या एकपेशीय सजीवापासून उत्क्रांती होत होत आजचा बुद्धिवान प्राणी, मानव तयार होण्यास अजूनही कित्येक अब्ज वर्षे जावी लागतील! माकडे जर माणसाची पूर्वज मानली, तर माकडांमध्ये आज इतकी वर्षे प्रजनन होऊन एकही माकड–मानवाइतके किंवा त्याजवळपास बुद्धिमान कसे काय निपजले नाही? माकडे अजूनही त्यांच्या पूर्वजांइतकीच बुद्धिमंद राहिली! कुत्रा, मांजर, घोडा, गाय इत्यादी पाळीव प्राण्यांतही आज अब्जावधी वर्षांच्या कालावधीनंतर शरीररचना व बुद्धिमत्ता ह्यांमध्ये विशेष फरक पडल्याचे आढळत नाही! ह्याचाच अर्थ, केवळ 'डार्विनचा उत्क्रांतिवाद सिद्धांत' हेच मानवप्राण्याच्या पृथ्वीतला-वरील अस्तित्वाचे उत्तर नव्हे! तर त्यासाठी आपल्याला आता बाह्य अवकाशाचाही शोध घ्यावा लागेल!'

'प्रसन्नकाका, म्हणजे आपला पूर्वज माकड नव्हे तर! मग आता आम्ही मुलांनी मस्ती केली तर आमच्या चेष्टांना तुम्ही माकडचेष्टा म्हणायचं नाही हं!' सलमा म्हणाली.

'नाहीच मुळी! मी त्यांना पोरखेळ म्हणेन हो!' डॉ. प्रसन्न हसून म्हणाले.

'पण त्या डेनिकनच्या पुस्तकात यू. एफ्. ओज्‌बद्दल काय म्हटलेलं आहे, ते नाही सांगितलंत!' सचिनने पुन्हा मूळ विषय पकडला.

'डेनिकन आपल्या 'चॅरियटस् ऑफ् गॉड' या पुस्तकात म्हणतो– 'आपल्या ग्रहावर हजारो वर्षांपूर्वी उडत्या तबकड्या किंवा तशाच प्रकारच्या काही अतिवेगवान अंतरिक्षयानांमधून बाह्य अवकाशामधील काही प्रगत मानव सदृश्य सजीव उतरले. त्यांपैकी काही प्रगत सजीवांनी त्यांच्या ग्रहावरून आणलेल्या प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर पृथ्वीवर ठिकठिकाणी वसाहतीही स्थापन केल्या! द. अमेरिकेमधील पेरू, ब्राझिल, युराग्वे या देशातील जंगलात व डोंगरपठारांवर काही अतिप्राचीन वास्तू, अज्ञात व अगम्य भाषेमधील शिलालेख व शिलाचित्रे अलीकडे काही संशोधकांना सापडल्या. एका डोंगरपठारावर हुबेहूब आधुनिक विमानांच्या धावपट्ट्यांप्रमाणे बांधलेले रस्ते दिसून आले. शिलाचित्रांमधील काही चित्रातील आकृत्या तर हुबेहूब आजकालच्या अंतरिक्षवीराप्रमाणे पोषाख घातलेल्या दिसतात!

'इजिप्तमधील निर्जन वाळवंटात उंच डोंगरावर उभारलेले चारचारशे फूट उंचीचे दगडी पिरॅमिडस् म्हणजे जगातील स्थापत्यशास्त्रज्ञांना अजूनही न सुटलेले एक कोडे मानले जाते! शेकडो टन वजनाचे प्रचंड दगड एवढ्या उंच जागी नेऊन ठेवण्याइतके

प्रगत तंत्रज्ञान आजही उपलब्ध नाही तर हजारो वर्षांपूर्वीच्या पृथ्वीवरील अप्रगत मानवास ते कसे बरे उपलब्ध होते? मग ह्या पिरॅमिडस्‌चा जनक कोण?

'कोलंबस ह्या खलाशाने फक्त पाचशे वर्षांपूर्वी अमेरिका खंडाचा शोध लावला. तत्पूर्वी हजारो वर्षे हे खंड पृथ्वीवरील इतर खंडापासून अलग पडलेले होते. रेड इंडियन्स हे रानटी आदिवासीच फक्त ह्या भूभागात तुरळक वस्ती करून राहिलेले आढळले, सध्याची अमेरिकेतील लोकवस्ती ही अमेरिकेत युरोपखंडातून स्थलांतरीत झालेली आहे.

' अशा या अप्रगत खंडात हजारो वर्षांपूर्वी उंच पर्वत पठारावर हे शिलालेख, प्रचंड मोठ्या वास्तू व शिल्पे कुणी बरं बांधलीत? एवढे मोठे दगड एवढ्या उंच जागी नेण्याएवढं विज्ञान व तंत्रज्ञान त्याकाळी पृथ्वीवर कुठं प्रगत झालं होतं का? ह्या शिल्पांवरील चित्रातील मानव तर आजच्या युगामधील अंतराळ वीरांप्रमाणे खास–पोषाख केलेले दिसतात! कुणी बरं ह्या पर्वतपठारावर धावपट्ट्या–बांधल्या? बाळांनो, ह्या प्रश्नांची उत्तरं आजही शास्त्रज्ञांना मिळालेली नाहीत!' डॉ. प्रसन्न बोलता बोलता मध्येच थांबले. त्यांना कुठेतरी दूर एकादी गाडी थांबल्याचा भास झाला. परंतु ह्या वेळेस ह्या जंगलात मोटार कुठून येणार असा विचार मनात येऊन ते पुन्हा बोलू लागले. ' तर मुलांनो, मी तुम्हाला काय सांगत होतो?' त्यांनी मुलांकडे पाहात प्रश्न केला.

' अंकल, दहा हजार वर्षांपूर्वी अमेरिकेत सुपरमॅन, स्पायडरमॅन-सारखे ताकदवान लोक राहात असतील, त्यांनीच तर हे दगड व शिला उचलून उंच डोंगरपठारावर नेऊन ठेवल्या नसतील ना?' सचिनच्या डोक्यात ह्यावेळी दूरदर्शनवरील सुपरमॅन होता.सचिनच्या

प्रश्नाने डॉ. प्रसन्नांची गाडी पुन्हा रुळावर आली व ते म्हणाले,

'बरोबर आहे तुझं म्हणणं, सुपरमॅनचंच हे काम आहे, परंतु पृथ्वीवरल्या नव्हे! डेनिकनच्या मते आपल्या आकाशगंगेतील दुसऱ्या एकाद्या ताऱ्याच्या प्रगत ग्रहावरून पृथ्वीवर आलेले ते सुपरमॅन असावेत! सध्या दिसत असलेल्या सजीवश्रेष्ठ मानव प्राण्यांची अनुवंशबीजं त्यांनीच पृथ्वीवर पेरलीत! आजचा मानव त्या बाह्य अवकाशामधून पृथ्वीवर आलेल्या सुपरमॅनचा वंशज असावा! डार्विन म्हणतो त्या माकडाचा नव्हे!' सचिन, सलमाला हे नवीन विज्ञान स्तिमित करणारे होते.

'प्रसन्नकाका, आपल्या सूर्यमालेतील पृथ्वी सोडल्यास इतर कोणत्याही ग्रहावर सजीवास पोषक असं वातावरण नाही. म्हणून आपल्या सूर्यमालेत जरी इतरत्र ग्रहांवर सजीव नसले तरी आपल्या मिल्कि आकाशगंगेमध्ये आपल्यापेक्षा हुशार व प्रगत सजीव कुठं ना कुठं असतीलच, नाही का हो?' सलमाने प्रश्न केला.

'का असू नयेत? असूही शकतील कदाचित्! एक लक्ष प्रकाश-वर्षे रुंदीच्या व दोन हजार प्रकाश वर्षे जाडीच्या आपल्या आकाश-गंगेत किमान दीड अब्ज तरी सूर्यासमान, व सूर्याहून लहान मोठे तारे असतील. त्यांपैकी निदान शंभर कोटीताऱ्यांना ग्रहमंडळे असावीत. त्यापैकी निदान ६४ कोटी ग्रहांवर पृथ्वी प्रमाणे सजीव असावेत असे शास्त्रज्ञ मानतात. समजा दर दहा लाख ग्रहांपैकी एकावर जर मानवप्राण्यासारखा बुद्धिवान सजीव असावा असं मानून चाललं तरी ६४० ग्रहांवर मानवासामन बुद्धिवान सजीव असतीलच! त्यांमधील निम्म्या म्हणजे ३२० ग्रहांवरील सजीव पृथ्वी-वरील मनुष्यप्राण्यांहून अधिक हुशार व प्रगत निश्चितच असावेत असं शास्त्रज्ञांचं मत आहे.'

'पण ते सर्व पृथ्वीवरील मानवासारखेच दिसत असतील का ?' सचिनने प्रश्न केला.

'ते कसं शक्य आहे ? प्रत्येक ग्रहावरील सजीवाची जीवप्रणाली तेथील वातावरणावर अवलंबून असते. कदाचित् प्राणवायुऐवजी ते जीवन जगण्यासाठी नैट्रोजन वायूही वापरत असतील. त्यांच्या शरीरात कार्बनऐवजी सिलिकॉन मूलद्रव्य असणाऱ्या अणूंच्या साखळ्यांनी युक्त स्नायू व हाडं बनलेली असतील. द्रवरूप अमोनिया अवस्थेत त्यांचं रक्त असणंही अशक्य नाही ! एकूण काय, ते पृथ्वीवरील मानवासारखे शरीरानं दिसत नसतील तरी बुद्धिवान व प्रगत मात्र निश्चितच असू शकतील !' डॉक्टर उत्तरले.

'तर ते आपल्या पृथ्वीवरील वातावरणात जगूच शकणार नाहीत मग उडत्या तबकड्यांमधून पृथ्वीवर येऊन वस्ती कशी करू शकणार ?' सलमाने आपल्या मनामधील शंका बोलून दाखवली.

'चंद्रावर वातावरण नाही तरीदेखील कृत्रिम ऑक्सिजनच्या साह्यानं नील आर्मस्ट्रॉंग व एडविन ऑल्ड्रीन हे दोन अमेरिकन अंतराळवीर नाही का चंद्रावर जाऊन राहिले ? नव्हे तेथील मातीचा नमुना घेऊन पृथ्वीवर परतही आले !' सलमाच्या शंकेचे जणू आपण निरसन केले अशा थाटात सचिनने उत्तर दिले.

'सचिन म्हणतो तेही खरंच आहे, परंतु असे प्रगत जीव जर का कुठं बाह्य अवकाशात असलेच तर ते आपल्यामधील प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर पृथ्वीपर्यंत पोहोचायला बरीच वर्षे जायला हवीत, हे काम त्यांनी कित्येक लक्ष वर्षांपूर्वीपासून सुरू केलेले असेल तरच त्यांना आतापावेतो पृथ्वीचं दर्शन घेणं शक्य आहे ! इतकी प्रचंड अंतरं आपण व अवकाशामधील ताऱ्यात आहेत. ते मोजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मापास प्रकाशवर्ष म्हणतात.' डॉ प्रसन्न म्हणाले.

'हो, ठाऊक आहे. प्रकाश किरण एक वर्षात ५८८ ह्या आकड्यावर दहा शून्ये एवढे मैल अंतर चालतो! तेवढं अंतर म्हणजे एक प्रकाशवर्ष!' सचिन म्हणाला.

'वा, वा, म्हणजे बरीच माहिती आहे की रे तुला! मग सांग पाहू आपल्या सूर्यमालेसारखी ग्रहमाला असणारा आपल्याला जवळचा तारा कोणता ?'

'नाही बुवा ठाऊक! अल्फा सेंटारी हा ४.३ प्रकाशवर्षे दूर अंतरावरील सूर्यमालेस सर्वात जवळ असणारा तारा एवढंच आम्हाला ठाऊक आहे!' सचिन व सलमा एकदम म्हणाली.

'नाही ना ठाऊक! बर्नार्ड हे त्या ताऱ्याचे नाव आहे. त्याला सूर्यासारखंच ग्रहमंडळ असल्याचं आता सिद्ध झालेलं आहे. हा तारा आपल्यापासून फक्त सहा प्रकाशवर्षे दूर आहे! ह्या ताऱ्याच्या दिशेनं इसवी सन २०५० साली ब्रिटिश इन्टर प्लानेटरी सोसायटी ही इंग्लंडमधील संस्था एक अति वेगवान यान पाठवणार आहे.' डॉ. प्रसन्नांनी मुलांना बरीच नवीन माहिती पुरविली.

'अरे, सात वाजून गेले! साडेसातपर्यंत आपण रेस्ट हाऊसवर पोहोचायलाच हवं! जॉन एकटा बिचारा आपली वाट पाहात असेल!' कर्नलसाहेब म्हणाले.

मुले झपझप चालत होती. प्रसन्नकाकांकडून बरीच माहिती मिळाल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसत होता. अर्धी वाट चालून झाली असेल नसेल तोच, एकाएकी बंटी भुंकू लागला. त्याला झुडुपाआड काहीतरी चाहूल लागलेली दिसली. कर्नलसाहेबांनी बंटीला चुचकारले. तो गप्प झाल्यावर कर्नल त्या झुडुपाकडे गेले. तेवढ्यात कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज ऐकून झुडुपाआड काळोखात बसून कसली तरी चर्चा करीत बसलेले चार परकीय

नागरिक लगेच उठून जाण्याच्या तयारीस लागलेले कर्नलनी पाहिले. ते सर्व आपापसात पोर्तुगीज भाषेत बोलत होते. त्यांच्यापैकी एकाचा चेहरा कर्नलसाहेबांना ओळखीचा वाटला.

' अरे ! हा तर संध्याकाळी रेस्ट हाऊसच्या फाटकापाशी मुलांकडे दाणोलीकडील रस्त्याची चौकशी करीत असलेला इसम ! ' कर्नल स्वतःशीच पुटपुटले. ते सर्व तस्करी व्यवसायाशी संबंधित असावेत व त्यांचा इथेच कुठेतरी डोंगरात अड्डा असावा असा कर्नलसाहेबांनी तर्क बांधला. सर्व युरोपभर फिरल्यामुळें कर्नलना फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश व पोर्तुगीज ह्या भाषा चांगल्या समजत होत्या. त्यामुळे बदमाश बोलत असलेल्या पोर्तुगीज भाषेमधील मेडिसिन्स्, पेथिडीन, ज्वेलरी व डेन या शब्दांवरून त्यांनी जवळच कुठच्यातरी गुहेत हिरे, मादक औषधे वगैरे तस्करी मालाचा साठा केलेला असावा असाही एक अंदाज कर्नलसाहेबांनी केला. मग ह्याचा छडा आपण लवकर हालचाल केल्यास लागू शकेल हे त्यांनी जाणले. मन त्या चौकडीला न समजेल अशारीतीने हळूच त्यांचे संभाषण ऐकून कर्नलसाहेब सचिन, सलमा, डॉ. प्रसन्न, बंटीसह रस्त्याच्या ज्या कडेला उभे होते, तेथे पुन्हा येऊन पोचले. त्यांना पाहून मुले म्हणाली,

' अंकल, मध्येच आम्हाला सोडून इतका वेळ कुठं गेला होता ? '

' अरे, तिकडे कुठं आडोसा आहे का पाहात होतो, येताना— काळोखात वाट चुकलो, म्हणून उशीर लागला ! ' कर्नलसाहेबांनी हाताची करांगुली उंचावीत म्हटले.

' अरे, ते शिशुवर्गात बसून आले ! ' डॉ. प्रसन्न म्हणाले; त्यावर सर्वजण खळखळून हसली.

सर्व मंडळी रेस्ट हाऊसवर येऊन पोचली तेव्हा ठीक आठ वाजलेले होते. रेस्ट हाऊस जवळपासचे सर्व दिवे गेलेले होते. सर्वत्र अंधाराचंच साम्राज्य पसरलेलं होतं. 'बरं झालं, आपण निघताना टॉर्च घेतली सोबत!' डॉ. प्रसन्न म्हणाले.

●

...३

२२२८ ९२।६।८८
पाच :

# फिरून पुन्हा विश्रामधामात

‘हे दिवे कधी येतील कुणास ठाऊक ! आपण आज रात्री सावन्तवाडीस येऊ शकत नाही हे निदान फोनवरून डॅडीला कळवू या. नाहीतर उगाच तो रात्रभर आपली वाट पहात काळजी करीत बसायचा !’ असे म्हणत कर्नलनी डॅडींना फोन लावला. डॅडी नुकतेच कुठेतरी बाहेर गेलेले होते. फोन घरगडी शंकरने घेतला.

‘आम्ही सर्व मंडळी आता सकाळीच ब्रेकफास्टला सावंतवाडीस येऊ.’ कर्नल शंकरला म्हणाले व त्यांनी फोन खाली ठेवला.

आजचा दिवस मेटॅडोर बिघडल्यामुळे जरी आंबोलीत काढावा लागला तरी कमिशनरसाहेबांनी ज्या कामगिरीवर आपल्याला इकडे पाठविले त्यासंबधी काहीतरी धागेदोरे लवकरच

आपल्या हाती लागतील असे विचार कर्नलसाहेबांच्या मनात आले. एकपरी मेटॅडोर आंबोलीत बिघडल्याचा हा मोठा फायदाच होय असं वाटून कर्नलसाहेबांना समाधान वाटत होतं.

कर्नलसाहेबांनी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आपल्या खिशातून सिगारेटच पाकीट काढल. दिवे नसल्यामुळे काळोखातच त्यानी आपली सिगारेट पेटविली व ते तोंडातून धुराची वलये काढीत मनातल्या मनात आतापर्यंत घडलेल्या घटनांचा कुठे अन्वयार्थ लागतो का पाहू लागले. इतक्यात वीज आली. विश्रामधामातील दिवे पेटले.

डॉ. प्रसन्नांनी ट्रान्झिटर सुरू केला, तेव्हां रात्रौ नऊच्या इंग्रजी बातम्या संपत आलेल्या होत्या. ' काहीतरी चांगला कार्यक्रम असेल म्हणून रेडिओ ऑन् करावा तर खत्रुड बातम्या नेहमीच्याच!' डॉ. प्रसन्न स्वतःशीच पुटपुटले. इतक्यात शेवटच्या बातमीत ' संपता संपता एक महत्त्वाची बातमी ऐका ' असे जाहीर करून रेडिओवरून पुढील बातमी ऐकविण्यात आली. ' दिल्ली येथील तिहार जेलमधून दोनच दिवसांपूर्वी आंतरराष्ट्रीय तस्करी जगातील एक भयंकर खतरनाक खुनी गुन्हेगार चार्लस् सालाझार पळालेला आहे. ह्या गुन्हेगारास पकडून देणाऱ्यास भारत सरकारनं एक लक्ष रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केलेलं आहे. सालाझार बहुधा दक्षिण भारतात गेलेला असावा. तेथून तो परदेशी पळून जाण्याचा प्रयत्न करील म्हणून देशातील सर्व समुद्रमार्ग व हवाईमार्ग ह्यावर कडे-कोट बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. सर्व नागरिकांनी सतर्क व सावध राहावं आणि सालाझार व त्याचे तुरुंगातून पळालेले चार परदेशी साथीदार ह्यांना पकडून देण्यास भारत सरकारला संपूर्ण सहाय्य करावं. ' बातमी संपताच डॉ. प्रसन्नांनी विविध भारती-

वरील आपकी फर्माइश् लावली. त्यातील ' फूलोंके शहरमें घर अपना ऽ ऽ ' या गाण्यावर ते आरामखुर्चीत बसून डोलू लागले.

इकडे आकाशवाणीवरील ती बातमी ऐकून कर्नलसाहेबांच्या डोक्यात काहीतरी निराळेच विचार घोळू लागले.

संध्याकाळी झुडुपात बसून पोर्तुगीजमध्ये चर्चा करीत असलेले ते चार तस्कर एव्हाना कुठे असतील ? काय करीत असतील ? श्रीसमर्थ साटममहाराजांच्या कृपेने जर आपण रात्रौ जीप घेऊन निघालो व आंबोलीच्या डोंगर परिसारामधील त्यांचे गुप्त निवास-शोधून काढू शकलो तर !—कर्नलसाहेबांच्या डोक्यामधील विचार-चक्र एकाएकी थांबले.

' शुभस्य शीघ्रम् ' म्हणतात त्यानुसार कर्नलसाहेबांनी आपल्या मनाशी काहीतरी बेत पक्का केला. रात्रीचे साडेनऊ वाजलेले होते. दोन मैल पायपीट करून आलेल्या मुलांसह सर्वांना भूक लागली होती.

' जारे, कुणीतरी जाऊन बाहेर मेटॅडोरमध्ये झोपलेल्या जॉनला उठवा, आपण त्याला जेवण घेऊन यायला सांगू या ! ' कर्नलनी फर्मावले.

सचिन बाहेर येऊन पाहतो तर जॉन सर्व गडबड ऐकून उठलाच होता. त्याला घेऊन सचिन कर्नलसाहेबाकडे आला.

जॉन सावंतवाडीकडचाच. फास्कू फर्नांडिसचा मुलगा. फास्कू नाविक दलात एका बोटीवर आचारी म्हणून होता. कर्नलसाहेबांची व त्याची जिगर दोस्ती. जॉन लहानपणापासून कर्नलसाहेबांच्याच घरी वाढला. फास्कुच्या हातची खास बनवलेली ' फिश–करी ' कर्नलना फार आवडे. म्हणून ज्या ज्या बोटीवर जॉनचे पप्पा असत, त्या त्या बोटीला कर्नलसाहेब नेहमी भेट देत. बिचारा फास्कू दोन

वर्षांपूर्वी एकाएकी ख्रिस्तवासी झाला. त्याचे वय तसे फार नव्हते: असेल पन्नास पंचावन्नच्या आसपास. दिसायलाही मोठा राजबिंडा. " शेफ् व्हायचा चान्स् हुकवलान लेकानं ! " कर्नल नेहमी हळहळत.

" जॉन, बाबा, बाहेरून कुठून तरी जेवण मिळतं तर घेऊन ये जा पाहू लवकर ! पोरांना फार भूक लागलेली आहे ! " कर्नल म्हणाले.

जॉन थोड्याच वेळात कुठून तरी जेवण घेऊन आला. सर्वांची जेवणे आटपली. मुले व डॉ. प्रसन्न झोपलेले पाहून कर्नलनी जॉनला हाक मारली. ' जॉन, आपल्याला आता लगेच एका खास कामासाठी बाहेर जायचं आहे ! आपली जीप काढ बघू बाहेर ! सोबत टॉर्च व काठ्या घेच. मी एक रिव्हॉल्व्हर घेतलेले आहे सोबत ! तूही बरोबर एक चाकू घे. घाबरू नकोस, आपण कुठं मारामारी, दंगल करण्यासाठी बाहेर पडत नाही आहोत ! आज संध्याकाळी फिरून परत येताना मी चार परकीय नागरिक बागेत झुडुपाआड दडून काही बातचीत करीत असताना पाहिलेले होते. ते सर्वजण स्मगलर्स असून इथंच जवळपास कुठंतरी डोंगरामधील गुहेत त्यांचं वास्तव्य असावं, असा मला दाट संशय आहे. ' डेन ' म्हणजे गुहा हा शब्द त्यांच्या बोलण्यात सतत येत होता. ती गुहा आपल्याला शोधून काढायची आहे. सावधगिरी म्हणून काठ्या, चाकू, पिस्तुल आणि टॉर्च बरोबर घेतलेल्या बऱ्या !" कर्नल जॉनकडे पाहात म्हणाले, कर्नल व जॉन जीप घेऊन डोंगराच्या दिशेने निघाले.

सहा :

# तस्करांच्या गुहेत

सॅन्डी, पीटर, रॉबर्ट व डेनिझ ह्या चौघांनी गेले दोन दिवस तिहार तुरुंगामधून सुं बाल्या केल्यावर आंबोलीतील त्या गुहेतच आपला मुक्काम ठोकलेला होता. चार्लस् तुरुंगातून पळण्यापूर्वी एक आठवडा अगोदरच त्यांनी तुरुंगाधिकाऱ्याच्या हातावर तुरी देऊन तुरुंगातून पलायन केलेले होते. चार्लस् तुरुंगातून पळाल्यावर कुठेतरी त्याची सोय करावी व नंतर भारतातून लगेच परदेशी पलायन करावे यासाठी ही चौकडी आधीच तुरुंगाबाहेर पळालेलीहोती.चार्लस्ची त्यांनी गोव्यातील एका पंचतारांकित हॉटेलात सोय केली, व ते स्वतः त्याच्या पुढील पलायनाच्या तयारीसाठी आंबोलीत मुक्काम ठोकून राहिलेले होते. दोन दिवसानंतर चार्लस् धनगराच्या वेषात

गोव्यातील हॉटेलमधून निघून केरी, पाली, तेरेखोल. शिरोडा, सावंतवाडी करीत अमावास्येला रात्रौ दाणोलीस येऊन बॉबी ऊर्फ बाबी तेली ह्या त्याच्या साथीदाराच्या मदतीने कुणालाही न दिसता एका गुप्तमार्गाने दाणोलीहून आंबोलीच्या ठरलेल्या गुहेत पहाटे ४ च्या सुमारास येणार होता, इथून पुढे ग्लायडरने तो दूर अरबी समुद्रात आधीच उभे असणाऱ्या स्ट्राथडन ह्या मालवाहू जहाजाच्या डेकवर उतरणार होता. तेथून हे मालवाहू "जहाज श्रीलंकेस जाणार होते. श्रीलंकेहून खोटा पासपोर्ट मिळवून हवाईमार्गे स्पेनची राजधानी माद्रिद येथे जायचे असा सर्व बदमाशाचा पूर्वनियोजित बेत ठरलेला होता. माद्रिदला एका पंचतारांकित हॉटेलमध्ये जागतिक जवाहिऱ्यांची परिषद होती. तिथे उत्तमोत्तम उंची हिऱ्यांचे एक खास प्रदर्शन भरणार होते. त्या प्रदर्शनाला चार्लस् एका जवाहिऱ्याचे सोंग घेऊन भेट देणार होता. त्या प्रदर्शनामधील किमती हिऱ्यांचे अपहरण करण्याचा त्याचा बेत होता. हे हिरे नंतर हाँगकाँगच्या बाजारात विकून भरपूर पैसे कमविण्याचा त्याने बेत आखलेला होता.

'चार्लस्‌बद्दल काही बातमी कळली का रे ?' सॅन्डीने पीटरना प्रश्न केला.

'चार्लस् ! चार्लस् ! चार्लस ! तो तिकडे गोव्यात फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये मोनिकाबरोबर मजा करतोय लेकाचा ! आणि आपण इकडे या गुहेत बसून पावभाजी खाऊन लपत छपत कुणाला संशय येऊ नये म्हणून कसेबसे दिवस कंठतोय !" पीटर वैतागून म्हणाला.

'आपण काय बॉसच्या हुकूमाची ताबेदार माणसं !' डेनिझ बोलला.

'म्हणून काय झालं ! आपण काय जनावरं आहोत ? आम्हालाही काही आयुष्य आहे की, नाही ? बॉस, बॉस म्हणून त्याच्या-

साठी आपण किती त्याग करायचा !' पीटर बोलतच होता.

'अरे यार, माय डियर पीटर, वैतागू नकोस रे असा ! गेली चार-पाच वर्षे तुरुंगात बसून मस्त जेवण आणि वर आइस्क्रिमही खात होतास ! आता तुरुंगाबाहेर गोरगरीब लोक नेहमीच खातात त्या पावभाजी आणि उसळीची चव नको का चाखायला जरा !' रॉबर्ट वैतागलेल्या पीटरला समजावीत विनोदी भाषेत बोलला.

रॉबर्ट हा जरा त्यांच्यातील तरुण व तगडा गडी, असेल सुमारे सत्तावीस अठ्ठावीस वर्षांचा. दिसायला जरा उग्र, पण बोलायला फार विनोदी होता.

पीटर व डेनिझ चाळीसच्या पुढचे आणि सँडी साधारण पस्तीसच्या जवळपासचा असे असावेत. प्रत्येकाच्या नावावर देशोदेशी मिळून पाच ते सहा खून तरी होतेच ! खोटे पासपोर्ट व व्हिसा बनविणे, मादक पदार्थांची ने-आण करणे, बेमालूम वेषांतर करणे. एखाद्यास भूल देऊन फसविणे, खोट्या नोटा वटविणे हा तर त्यांचा डाव्या हाताचा खेळ होता ! परकीय चलन कायद्याखाली अनेक वेळा त्यांच्या-वर खटले होऊन ते त्यातून सहीसलामत सुटलेले होते, विमाने व इतर वहाने पळविणे हा तर त्यांचा आवडता छंद होता. देशोदेशीचे जवाहिरे आणि तस्कर त्यांचे मित्र होते. ते सर्व त्यांचा खर्च तुरुं-गात असतानाही चालवत. चार वर्षांपूर्वी भारतामध्ये दोन खून व लूटालूट करुन पळून जात असता चार्लस् सालाझार व त्याचे साथीदार मुंबई विमानतळावर पकडले गेले. तेथून त्यांची रवानगी दिल्लीच्या कुप्रसिद्ध तिहार जेलमध्ये झाली. गेली चार वर्षे ते सर्व तिहारच्याच तुरुंगात होते. गेल्या आठवड्यात ते सर्व बदमाश तुरुं-गाधिकारी व तेथील पहाऱ्यावरचे शिपाई ह्यांच्या डोळ्यात धूळ फेकून जे पळाले ते आंबोली भागात आले. लवकरच येथून परदेशी

प्रयाण करण्याचा त्यांचा बेत होता. संपूर्ण भारतभर त्यांनी तुरुंगातून पलायन केल्याची बातमी पसरलेली होती. देशभरचे सर्व पोलिस डोळ्यात तेल घालून सर्वत्र रात्रंदिवस जागता पहारा देत होते, अशा परिस्थितीत कुठेही हिंडणे ह्या बदमाशांना सोयीस्कर वाटत नव्हते. चार्लसने तुरुंगामधून पलायन करण्यासाठी आपल्या सुपीक मेंदूतून एक नामी शक्कल शोधून काढली. आपला वाढदिवस आहे अशी बतावणी करून त्यांने तुरुंगाबाहेरुन खाद्य–पेये व मिठाई मागवून घेतली. तुरुंगातील सर्व कैदी, तुरुंगाधिकारी व पहाऱ्यावरील शिपाई ह्या सर्वांना त्याने त्या दिवशी मोठी मेजवानी दिली. ह्यावेळी त्याने खाद्यपदार्थांत तुरुंगाबाहेरील आपल्या साथीदारांकरवी भरपूर मादक द्रव्ये घातलेली होती. त्यामुळे हे पदार्थ खाऊन मेजवानीतील सर्व मंडळी गुंगीत असतानाच चार्लसने बाहेर उभ्या असलेल्या मोटारीतून वेषांतर करून पलायन केले. चार्लस अशा मेजवान्या तुरुंगात अधूनमधून नेहमीच देत असे. त्यामुळे कुणालाही ह्यावेळी संशय आला नाही. चार्लसचे साथीदार तत्पूर्वी आठ दिवस शौचास जाण्याचे निमित्त करून तुरुंगाबाहेर पळून गेले होते. त्यांच्याशी चार्लसने लगेच संपर्क साधला व भारताबाहेर पळून जायचा बेत आखला.

मजल दरमजल करीत ते सर्वजण पर्यटक बनून गोवामार्गे कोकणात आले. कोकणात येताच तेथील तस्करसम्राट बाबी तेली ऊर्फ बॉबी ह्याच्याशी त्यानी संधान बांधून आंबोली घाटामधून भारताबाहेर पलायन करण्याचा बेत केला. गुहेतील चारही बदमाश आता पत्त्यांचा डाव मांडन हळूहळू दारू पीत गप्पागोष्टी करू लागले.

सात :

# यू. एफ्. ओ. दृष्टिपथात

रात्रीचे अकरा वाजले होते. जीप निघून गेल्याचा आवाज ऐकून सचिन व सलमा बिछान्यातून उठली व हळू दरवाजा लोटून रेस्टहाऊसच्या आवाराबाहेर आली. दुपारी भरपूर झोप झाल्यामुळे ती जागीच होती. फक्त डोळे मिटून बिछान्यात झोपेची आराधना करीत होती. कर्नल व जॉन यांच्यातील बोलणे त्यांच्या कानी पडले. ते ऐकून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. कुठची गुहा? कुठचे तस्कर? ही सर्व मंडळी आपल्याला संध्याकाळी बागेत कधी भेटली? अंकल व जॉन पिस्तुले, काठ्या व चाकू घेऊन कुठची गुहा शोधून काढायला चालले असतील? 'अलिबाबा व चाळीस चोर' गोष्टीत आपण वाचलेले डाकू आणि त्या गुहा ह्याच

आंबोलीच्या डोंगरामध्ये कुठेतरी असतील का? त्यांच्याच शोधात अंकल जॉनला घेऊन निघालेले नसतील ना? मग त्यांनी आपल्याला सोबत नेले असते तर किती मजा आली असती! आम्हीसुद्धा डाकूंना पकडून देण्यास अंकलना मदत केली असती! असे असंख्य विचार त्यांच्या छोट्या मेंदूत येऊ लागले.

ही कसलीतरी साहसी व गुप्त योजना आहे हे आता त्यांच्या लक्षात आले व ह्या बाबतीतले त्यांचे कुतूहल अधिकच वाढले.

मुलांना झोप येत नव्हतीच, उन्हाळ्यामुळे हवेत उष्माही होता. म्हणून अंकल व जॉन परतेपर्यंत्त इथेच बाहेरील थंड हवेत गप्पा मारीत बसावे असा मुलांनी बेत केला.

प्रथम गाण्याच्या मग इंग्रजी स्पेलिंगच्या भेंड्या लावण्यात वेळ गेला. मग सचिन व सलमा एकमेकांना सामान्यज्ञान चाचणीचे प्रश्न विचारून खेळू लागली.

' 'गूगॉल' म्हणजे काय सांग पाहूं?' सचिनने सलमाला प्रश्न केला.

'गुग्गुळ असेल! हे एक सांधेदुखीवरचे आयुर्वेदिक रामबाण औषध आहे.' सलमा उत्तरली.

'गुग्गुळ नव्हे काही! गूगॉल GOOGOL' सचिन म्हणाला.

'हरलीस? GOOGOL ही इंग्रजीमधील सर्वांत मोठी आंकड्याची संख्या! जसे 'मिलियन' म्हणजे दशलक्ष, 'बिलियन' म्हणजे अब्ज त्याप्रमाणे 'गूगॉल' म्हणजे एक या अंकावर शंभर शून्ये दिली असता होणारी प्रचंड मोठी संख्या! समजलं, बाईसाहेब!' सचिन पुन्हा म्हणाला.

हे सर्व चाललेले असताना संध्याकाळी बागेत फिरताना झालेल्या

यू. एफ्. ओ.संबंधीच्या गप्पांचा विषय मुलांच्या डोक्यातून गेलेला नव्हता. यू. एफ्. ओज् जर आपल्याला दिसल्या तर किती मजा येईल !

अंकलच्या गोष्टीमधील ब्रिटिश मित्राच्या मोटारीसमोर अचानक येऊन उभा राहिलेला तो प्रखर तेज डोळ्यातून फेकणारा पारदर्शक मनुष्य ! ती थरथरणारी गाडी ! तिच्यावर फिरणारे चिरुटाप्रमाणे लांब प्रकाशमान असे ते यू. एफ्. ओ ! सर्वच गोष्टी ' अल्लाउद्दीन व जादूचा दिवा ' या गोष्टीमधील राक्षसाच्या ' प्रकट होणे ' व 'अदृश्य होणे' ह्याप्रमाणे अद्‌भुत, चमत्कारिक होत्या. ' असा काहीतरी रक्त गोठविणारा अनुभव आपल्याला का येऊ नये ? किती किती मजा आली असती सर्व मित्रमंडळींना सांगायला !' सचिन-सलमाच्या डोक्यात अजूनहीं तेच विचार चालू होते. रेस्टहाऊस समोरच्या खडकावरून दूरवर पसरलेल्या अथांग निळ्या अरबी समुद्रात दिसणारे कोचऱ्याचे दीपगृह ! एकीकडे उंच उंच आकाशाला भिडणारी पर्वत शिखरे तर दुसरीकडे फेसाळणारा सागर ! एवढ्यात मुलांना दूर हवेत तरंगणाऱ्या कसल्यातरी प्रकाशमान वस्तू वेगाने खाली येताना दिसू लागल्या ! दहा ते पंधरा मिनिटांत ४० ते ५० चकचकीत प्रकाशमान बलून्स समुद्रकिनाऱ्याकडे उतरत असतांना पाहून मुलांच्या आश्चर्यास पारावार राहिला नाही ! हळूहळू त्या सर्व वस्तू किनाऱ्याच्या दिशेने अदृश्य झाल्या.

' आपण पाहिलेल्या ह्या वस्तू म्हणजे उडत्या तबकड्या तर नाहीत ? ' सचिनने सलमाला म्हटले.

' अशावेळी आपण आपल्याजवळ आपली दुर्बिण ठेवायला हवी होती ! दुर्बिण नसली की; किती बेरंग होतो !' सलमा सचिनला म्हणाली.

रात्रौ एक वाजला. अंकल व जॉन ह्यांना जाऊन आता जवळ

जवळ दोन तास उलटून गेले होते. पण कुणाचाच पत्ता नव्हता. एवढा वेळ ते गुहाच शोधीत बसले असतील का?

त्यांना बदमाश व डाकूंनी काही दगाफटका तर केला नसेल ना? कीं, त्यांची जीप सकाळी बिघडलेल्या आपल्या मेटॅडोर-प्रमाणे डोंगरातच कुठेतरी बिघडून पडली? एक ना अनेक शंका-कुशंकानी मुलांच्या डोक्यात गर्दी केली.

तशात प्रसन्नकाकांना उठवून त्यांच्या कानावर हा प्रकार घालावा तर त्यांना हा कोकण परिसर अगदीच नवखा. प्रथमच तर ते अंकलसोबत या भागात आले होते. त्यांना उठवून तरी काय फायदा? फुकट आपल्याबरोबर त्यांचीही झोपमोड व नसती काळजी निर्माण व्हायची. त्यापेक्षा प्रसन्नकाकांना झोपू द्यावे व अंकल आणि जॉनची वाट पाहात इथेच खडकावर बसून राहावे. भले पहाट का होईना! असा त्या दोघा मुलांनी विचार केला व ती तेथेच बसून राहिली.

●

आठ :

# मध्यरात्रीचे साहस

कर्नलसाहेब अत्यंत सावधपणे डोंगराच्या दिशेने मांजर पावलाने जीप हाकीत नेत होते. वळणावरील एक फाटा चौकूळ गावी जातो. पौर्णिमेस चौकूळ गावच्या ग्रामदेवीचा उत्सव असतो. त्या निमित्ताने जत्राही भरते. कोकणात तशा उत्सव, जत्रा वर्षभर चालूच असतात. विशेषत: दसरा संपल्यावर कोकणातील शेत-करी पिके हातात आल्यावर रिकामाच असतो. चार पैसेही हातात खुळखुळत असतात. मग थंडीत गावोगावी विविध देवादिकांच्या देवळासमोरील परि-सरात जत्रा भरू लागतात. अलीकडे या जत्रांमधून इलेक्ट्रॉनिकची चमचम करणारी घड्याळे, विविध प्रकारची परदेशी खेळणी व कपडेही विक्रीस ठेवलेले दिसू लागलेले होते. पुण्या-

मुंबईपेक्षा कोकणातील जत्रांमध्ये हा परदेशी बनावटीचा माल जास्त स्वस्त मिळतो असे कुणीतरी कर्नलसाहेबांना म्हणाले होते. चौकुळच्या जत्रेला अजून पंधरा दिवस होते.

कर्नलसाहेबांची जीप हळूहळू चढण चढत असता अचानक डोंगरामधून खाली काहीतरी कांचेची वस्तू फेकावी तसा खळ्कन आवाज त्यांच्या कानी पडला. कर्नलनी लगेच एका बाजूस नेऊन जीप थांबविली. ते टॉर्च, काठी व रिव्हॉल्व्हर घेऊन जीपमधून खाली उतरले. जॉनला त्यानी जीपमध्येच बसवून आपण परत येईस्तोवर काहीही हालचाल न करण्यासंबंधी सूचना दिल्या. मग ते डोंगर कपारीत वर चढू लागले. थोडे अंतर चालून जातात तोच त्यांच्या पायाला एक फुटलेली बाटली लागली. बाटलीवरील परदेशी दारूचे लेबल पाहून त्यांची खात्री झाली की, इथेच जवळपास कुठेतरी बदमाश दडी मारून बसलेले असावेत! नाहीतर अशा रात्रीच्या वेळी ही दारूची बाटली इथे कुणी बरे फेकली ?

कर्नलना झाडावर अंधारात दोन डोळे चकाकताना दिसले.

आंबोलीच्या डोंगरात बऱ्याचवेळा रात्रौ वाघोबांची स्वारी भटकत असते. एकादेवेळी रानात चरायला गेलेले गाईचे वासरू अगर म्हशीचा पाडा वाट चुकलेला असता वाघोबाच्या तावडीत सापडतो. वाघोबांना आयतीच मेजवानी मिळते ! तरस व वाघूट यांसारखी निशाचर श्वापदेदेखील डोंगरात रात्रौ शिकारीस बाहेर पडलेली असतात. तरसाला कोकणात येऊल म्हणतात, हे आपली मागची तंगडी आखूड पायामुळे खेचत चालते; त्यामुळे तरसाचा माग जमिनीवरील त्याने तंगडी खेचत नेतेवेळी काढलेल्या मातीमधील खुणांच्या सहाय्याने शिकारी लोक काढू शकतात. तरसाचा जबडा वाघाच्या जबड्यापेक्षांही बळकट असतो. एकादे जनावर ठार मारल्या-

वर तरस त्याची हाडे चघळत, दूर ऐकू जाईल असा मचमच आवाज करीत एकाद्या घळणीत बसलेले असते. अशा आवाजामुळे तरसाचा माग काढणे सोपे जाते.

कर्नलसाहेबांना झाडावर दिसलेले दोन डोळे रानमांजराचे होते. ही शिकारी मांजरे कोकणपट्टीत 'कटिंदर' या नावाने ओळखली जातात. ती रात्री झाडावरील पक्षी, घुशी वगैरेची शिकार करून आपले पोट भरतात. इंग्रजीत यांना 'कॅरॅकल्' म्हणतात व त्यावरूनच 'कटिंदर' हा शब्द आला असावा. कर्नलसाहेबांना अमेरिकेतील जंगलात पाहिलेल्या 'ऑसेलॉट' जातीच्या रानमांजराची ह्यावेळी आठवण झाली. ही मांजरे एवढी बळकट असतात कीं; ती माकडांनाही मारून खातात! कुत्र्याप्रमाणे मांजर हादेखील माणसाचा हजारो वर्षांपासूनचा जुना मित्र आहे. चिंचिला जातीची सुंदर मांजरे पर्शियात व इराणात सापडतात, कासवरंगी (Tortoise shell), ॲबिसिनियन, टॅबी अशा काही मांजरांच्या सुरेख व देखण्या जाती आहेत. कर्नलसाहेबांना कॅप्टन वागळे कधीतरी थट्टेत म्हणाले होते 'आमचा कोकण प्रदेश देखण्या मांजरांसाठी अन् बुद्धिवान लोकांसाठी प्रसिद्ध आहे!' त्याची कर्नलना ह्यावेळी सहज आठवण झाली.

कर्नल तसेच हळू हळू अत्यंत सावधपणे टॉर्चच्या अंधुक प्रकाशात पुढे जात होते. इतक्यात कुठूनतरी त्यांना मोठमोठ्याने हंसण्या-खिदळण्याचा आवाज कानी येऊ लागला. इथेच कुठेतरी ते परदेशी बाबू गुहेत आपले बस्तान ठोकून असावेत, याबद्दल कर्नलना आता खात्री वाटू लागली. आता ते पूर्ण सावधगिरीने तेथेच उभे राहून कानोसा घेऊ लागले. तोच त्यांच्यापासून दहा–बारा पावलांवर एक सिगारेटचे जळके थोटूक येऊन पडले. ते टाकणारा

हात ते उभे असलेल्या डोंगर कपारीतूनच बाहेर आलेला त्यांनी पाहिला.

'अरेच्या ! म्हणजे आपण त्या गुहेशेजारीच उभे आहोत तर !' असे म्हणून कर्नलसाहेबानी कपारीमधील एका मोठ्या भगदाडातून वाकून आत डोकावले. तो काय ? चार गोरे लोक हाफ् पँटवर उघडेच पत्ते खेळत, अधून मधून दारू पीत व धूम्रपान करीत हसत खिदळत मोठमोठ्याने गप्पा मारीत होते. हेच ते संध्याकाळी आपण बागेंत पाहिलेले चार बदमाश, ह्याची कर्नलना आता खात्री पटली. कर्नल बदमाशांचे बोलणे लक्षपूर्वक कान देऊन ऐकू लागले. ते सर्व पोर्तुगीजमध्ये आपापसात बोलत होते व कर्नलसाहेबांना ती भाषा अवगत असल्यामुळे त्यांचे संभाषण कर्नलना कळत होते.

'मला वाटतं, चार्लस् बहुधा परवा रात्री गोव्याहून निघेल आणि पहाटे तो बॉबीबरोबर इथे येईल. इथून त्यानं एकदाचं स्ट्राथडन जहाजावर उड्डाण केलं की, मोकळे झालो बुवा आपण एकदाचे !' पीटर खेळता खेळता सहकाऱ्यांशी बोलत होता.

'चार्लस् निघून गेल्यावर आपलं इथं काय काम ?' सॅन्डी व रॉबर्ट दोघे एकदमच उद्गारले !

'मग आपण सर्वांनी मिळून गोव्यातील त्या रम्य हॉटेल मिरामारमध्ये जायचं ! चार दिवस दे धमाल करायची नुसती ! गोव्याहून बॉबीच्या जहाजातून पुढं सिंगापूरला जाऊ आणि तेथून मग विमानानं युरोपात जायचं ! सर्व बुकींगची सोय बॉबीनं आधीच ठेवलीय करून ! आपल्याला कसली म्हणून कसलीच काळजी आता करायला नको ! हे पहा, ते मिरामार हॉटेलचं चार दिवसांचं ॲडव्हान्स् बुकींग !' असे म्हणून पीटरने सॅन्डी व रॉबर्ट यांच्याकडे तो कागद दिला.

'पण इंडियन करन्सीची काय व्यवस्था? आपल्याकडील रोकड तर आता संपलेली आहे!' रॉबर्टने शंका काढली.

'त्याची नको काळजी करूस! बॉबी आपल्या विकल्या गेलेल्या मालाचे सर्व पैसे दापोलीहून येताना घेऊन येईल. सुमारे साठ ते सत्तर हजार रुपये घेऊन येणार आहे तो आपल्यासाठी!' पीटरने शंकानिरसन केले.

'मग ठीक आहे तर! एकदा का उद्याचा व परवाचा दिवस गेला की सुटलो बुवा आपण!' सॅन्डी म्हणाला.

पीटर व डेनिझ हे चार्लस्चे दोन उजवे हात होते. सर्व स्थानिक हालचालींबद्दलच्या योजना चार्लस्शी सल्लामसलत करून तेच ठरवीत.

सॅन्डी व रॉबर्ट हे तगडे जवान त्यांचे संरक्षक म्हणून काम पहात. एरवी बुद्धिजन्य अशी काही विशेष कामे त्यांच्याकडे नसतच! कर्नलसाहेबांनी कानात जीव आणून सर्व बोलणे ऐकले. आता जास्त वेळ इथे थांबण्यात अर्थ नव्हता. ते आल्या पावली सरपटत डोंगर-कडा उतरून जीपपाशी आले. वाटेत एका काटेरी झुडुपाला अडकून त्यांचा शर्ट फाटल्याचे त्यांच्या लक्षात आले. 'आपलं नशीब चांगलं म्हणून सर्व गोष्टी कशा सुरळीत पार पडत आहेत! खरोखर आज अल्लाची खैर म्हणूनच आपण यातून सुरळीतपणे निभावलो!' कर्नल शेख स्वतःशीच पुटपुटले व त्यांची स्वारी जीपकडे सरकली. गर्द अंधारात घुबडाच्या घुत्काराच्या दरबारी रागातील संगीताचे स्वर ऐकत डोळ्यात जीव ओतून जॉन कर्नलची वाट पहात होता. कर्नलना सुखरूप परतलेले पाहून त्याच्या जीवात जीव आला!

'जॉन, चल लवकर, जीप स्टार्ट कर! काम फत्ते झालं आहे! आता उशीर नको. लगेच जोगसाहेबांना वायरलेसवरून घरी संदेश द्यायला हवा!" कर्नल म्हणाले.

कर्नलनी वाटेत जॉनला सर्व माहिती देऊन त्याबद्दल चुकूनही कुठे जरासुद्धा वाच्यता न करण्याबद्दल इशारा दिला.

रात्रीचे दोन वाजले होते, गाडी रेस्टहाऊसच्या दिशेने चाललेली होती. गाडीपुढून चटकन् एक गुबगुबीत लाललाल डोळ्यांचा ससा पळाला.

आंबोली घाटात सर्वत्र रात्रीच्यावेळी ससे, हरणे, साळींदर, कटिंदर असे प्राणी इतस्तत: भटकताना गाडीपुढून जातात. क्वचित कधीकधी सुंदर पिसारा फुलवलेले मोर व लांडोराची जोडीही दृष्टीस पडते.

दुरून कुठून तरी कुत्र्याचे भुंकणे ऐकू आले. ' चला, आपण आता वस्तीजवळ आलो !' कर्नल म्हणाले.

' आता काळजी नको !' असे म्हणत जॉनने गाडीचा वेग वाढवला.

' मुलं आणि प्रसन्नकाकांची मध्यरात्र उलटून गेली असेल !' कर्नलसाहेब म्हणाले.

पण गाडी रेस्ट हाऊस जवळ येत असताना दुरून तिथल्या खडकावर बसलेल्या दोन मुलांच्या आकृत्या जॉनला दिसल्या.

ठाणे
बा. क्र. २२२२८ दिनांक १२।४।८८
पावा.

नऊ :

# सुखरूप परत

रेस्टहाऊस समोरील शिळेवर बसून सचिन–सलमा अंकल व जॉन यांच्या वाटेकडे चातकासारखी डोळे लावून बसलेली होती. इतक्यात जमिनीवरून झरकन् एक सरडा झाडावर चढला. मुलांच्या अंगावर भीतीने सरकन् काटा आला.

एवढ्यात मुलांना दुरून येत असलेली जीप दिसली. 'नक्कीच ह्या जीपमध्ये अंकल व जॉन असणार !' सलमा सचिनला म्हणाली; आणि मुलांचा तो तर्क खराच ठरला. जीप रेस्टहाऊसजवळ थांबली. सचिन–सलमा ह्या जोड गोळीला मध्यरात्री तिथे पाहून कर्नल व जॉन दोघांनाही मोठे आश्चर्य वाटले, 'अरे, एवढ्या रात्री काळोखात इथं एकटं बसून तुम्ही काय बरं करता आहात?

तुम्हाला झोप–बिप काही नाही का ? ' कर्नलसाहेब उद्‌गारले.

'अंकल, आम्ही ना, आज यू. एफ्. ओज् पाहिलेत !' सलमाला कधी एकदा ही गोष्ट अंकलना सांगतो असे झालेले होते.

" यू. एफ्. ओज् व इथं आंबोलीत ? वेडी कुठची ? झोपेत स्वप्न पडलं असेल झालं तुला ! इथं या आंबोलीच्या डोंगरात ग कुठे–येणार आहेत यू. एफ् ओज !' कर्नल म्हणाले.

'शपथ, या सचिनला विचारा पाहिजे तर ! स्वप्नात नाही हो, चांगलं जागेपणी ! मी व सचिननं खरोखर समोरच्या त्या--समुद्रा· वरच्या आकाशात पाहिलेत यू. एफ्. ओज् उतरताना ! तुम्ही गुहेत गेलात ना तेव्हा !' सलमा म्हणाली.

'गुहेत ? कुठच्या गुहेत ?' कर्नल आश्चर्याने मुलांकडे पहात म्हणाले.

· म्हणजे ! मुले जागीच होतीत तर ! ह्यांनी आपले सर्व संभाषण ऐकलेले असणार !' कर्नल स्वत:शीच पुटपुटले व मग मुलांना उद्देशून म्हणाले--

'अरे लबाडांनो ! म्हणजे तुम्ही जागेच होतात तर आम्ही इथून निघतेवेळी !'

'पण अंकल, तुम्ही असे एकटे गेलात आणि आम्ही दोघं किती काळजीत पडलो होतो म्हणून सांगू ! तुम्हा दोघांवर गुहेतील गुंडांनी हल्ला केला असता तर ! खरंच सांगा, आम्हाला, कुठं आहे ती गुहा ?' सचिन म्हणाला.

'तुम्हाला परत आलेले पाहून खरोखर आमचा जीव भांड्यात पडला !' सलमा म्हणाली.

'बरं, बरं, आता मध्यरात्र उलटून गेली. उद्या सकाळी सांगेन

सर्व माहिती तुम्हाला. मात्र ती फारच गुप्त आहे. 'कुणाजवळ त्या-बद्दल चकारही शब्द काढणार नाही'-- असं वचन द्यावं लागेल तुम्हाला!' कर्नल बोलले.

एवढे बोलल्यावर मुले आत जाऊन लगेच झोपली. कर्नल-साहेबांनी कमिशनरसाहेबांनी त्यांना दिलेला बिनतारी संदेश-वाहक बाहेर काढला. झोपलेल्या जोगसाहेबांना झोपेतून उठवून एका दिवसात आंबोलीत येताच लगेच आपण ज्या ज्या हालचाली केल्या व माहिती मिळविली तिचा इत्थंभूत वृत्तांत त्यांनी त्याना पेश केला. कमिशनरसाहेबांनादेखील पोहोचल्या पोहोचल्याच कर्नल शेख ह्यांनी एवढी प्रगती केली हे ऐकून त्यांचे फारच कौतुक वाटले.

कर्नलसाहेब आता फारच दमलेले होते. रात्रीचे तीन वाजलेले होते. कर्नलसाहेबांना कॉफी पिण्याची लहर आलेली होती. परंतु त्या आंबोलीच्या जंगलात कॉफीची तहान फक्त पाण्यावरच भागवणे त्यांना प्राप्त होते! भरपूर पाणी पिऊन कर्नलनी बिछान्यावर अंग टाकले आणि लगेच ते झोपेच्या आधीन झाले! आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना सतत खणखणाऱ्या फोनने आठच्या-सुमारास जाग आली! फोनवर डॅडींचा आवाज आला 'गुड मॉर्निंग! इकडं कधी येणार?' 'आम्ही सावंतवाडीस साडे नऊपर्यंत पोचतोच.' कर्नलनी डॅडींना उत्तर दिले.

दहा :

# परशुरामभूमीवर गुप्तचरांचे जाळे

शनिवार. पहाटे साधारण चारचा सुमार. पुणे येथील पोलिस कमिशनर जोगसाहेबांच्या बेडरूममधील बिन-तारी संदेशवाहक यंत्र पुन्हा काहीतरी सांकेतिक भाषेत संदेश देऊ लागले. कुणी, कुणाला व कुठून हा संदेश देत आहे हे फक्त त्या दोन परस्परांशी संपर्क साधणाऱ्या व्यक्तींशिवाय कुणाही तिसऱ्या व्यक्तीला समजणे शक्य नव्हते !

चार्लस् तुरुंगामधून पळाल्यापासून तो सदैव असा एक बिनतारी संदेश यंत्राचा सेट स्वतःच्या खिशात घालून फिरत असे. कुठे जरा खुट्ट व्हायचा अवकाश, की; त्याला ह्या यंत्राद्वारे तस्करी जगतामधून कुठूनही संदेश मिळे. तक्षणी तो आपली पूर्वनियोजित राहाण्याची जागा व हालचालीच्या

सर्व पूर्वनियोजित योजना एकदम बदलून टाकी. म्हणूनच आजपर्यंत एवढे गुन्हे करूनही तो क्वचितच पोलिसांच्या हाती सांपडू शकलेला होता. अशाच तऱ्हेने तो आजपर्यंत दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत सर्व ठिकाणच्या पोलिसांना गुंगारे देत देत गोव्यातील हॉटेल लव्हबर्डस मध्ये येऊन पोचला. तेथील प्रशस्त अशा एअरकंडीशन्ड दालनात तो आता निवान्तपणे मोनिकासह रमचे घुटके घेत होता व आपल्या पुढील हालचालींबद्दलच्या योजना बांधीत होता. चार्लस्‌च्या चेहऱ्यावर एक प्रकारचा बेदरकारपणा व सर्व जगाबद्दल तुच्छभाव दिसत होता. जणू त्याला पकडणारा कोणी अजून जन्माला यायचा आहे ! आज पहाटे जोगसाहेबांना जो बिनतारी संदेश मिळालेला होता, तसेच संदेश केंद्रिय गृहखात्याकडून कस्टम्सच्या सागरी तस्करी प्रतिबंधक खात्यास व गोवा पोलिस–प्रमुखांनाही मिळालेले होते. मुंबई येथील गुप्तचर खात्यासही कार्यान्वित करण्यात आलेले होते. मुंबई गुप्तहेर खात्याचे सिंधुदुर्ग जिल्ह्याची खडान्‌खडा माहिती असणारे एक अतिशय निष्णात इन्स्पेक्टर भेंडे ह्यांनी आपल्या प्रशिक्षित पोलिस पथकासह गुप्त पोलिसांना घेऊन मुंबईहून सिंधुदुर्ग जिल्ह्याकडे कधीच प्रयाण केले होते. इंटरपोल ह्या जागतिक गुप्तहेर संघटनेकडून इन्सॅट्–बी उपग्रहाच्या सहाय्याने केंद्रिय गृहखात्याला मिळालेली माहिती मुंबई, पुणे, गोवा येथील गुप्त पोलिस प्रमुखांना व कस्टम्स तसेच नाविक दलालाही पुरविण्यात आलेली होती, त्यानुसार कर्नलसाहेबांनी काढलेल्या माहितीस दुजोराच मिळत होता. स्ट्राथडन ह्या मालवाहू जहाजावर बराच चोरटा माल भरलेला होता. ते जहाज कस्टमला कारवाई करता येऊ नये ह्यासाठी समुद्रकिनाऱ्यापासून पन्नास नॉटिकल मैल दूर सागरी सरहद्दीच्या बाहेर उभे करण्यात आले होते. ही सर्व माहिती इंटर-

पोलने केंद्रिय गृहखात्यास दिलेली होती. हे जहाज दोन–तीन दिवसांत किनारा सोडून श्रीलंकेच्या दिशेने प्रयाण करणार असल्या-मुळे तत्पूर्वीच त्या जहाजास गराडा घालून भारतीय सागरी किनाऱ्यावर अडकवून ठेवावे अशीही सूचना भारतीय नौदलास भारत सरकारकडून मिळालेली होती.

पोलिस कमिशनर जोग ह्यानी पुढील तीन दिवसांसाठी आपले सर्व पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द करून कधीही गरज लागल्यास सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रवेश करण्याची संपूर्ण तयारी ठेवलेली होती. शनिवारची सकाळ उजाडली. उद्या रविवार, १ मे, अमावास्या ! त्या रात्री श्रीसमर्थ साटममहाराज उडत्या तबकडीवरून बाह्य अवकाशातून आंबोलीस येणार व तेथून सरळ दाणोलीस आपल्या समाधीजवळ येऊन आपल्या भक्तगणांना दर्शन देणार होते ! त्यामुळे भक्तमंडळी हळू हळू शनिवारपासूनच दाणोलीस जमा होऊ लाग-णार होती. शिवाय आज रात्रौ महाराजांच्या पादुकांची पालखीसुद्धा निघणार होती.

रविवारी होणाऱ्या जत्रेसाठी दुकाने लावणे, मंडप घालणे, दिवा-बत्ती, सजावट ही सर्व कामे शनिवारीच व्हायची असतात.

महाराज दाणोलीस कुठच्या मार्गाने येतात व कुठच्या मार्गाने झट्कन् अदृश्य होतात ते कुणालाच ठाऊक नव्हते ! ते उतरतात ती अवकाशातून उतरणारी उडती तबकडीदेखील आजवर कुणी प्रत्यक्ष पाहिलेली नव्हती ! जो तो फक्त दुसऱ्याचा निर्वाळा देत असे !

साबा अण्णा हा गावचा सरपंच. त्यानेच साटममहाराजांचे उडत्या तबकडीतून आगमन होते ही कल्पना हवेत सोडून दिली. इतरांनी ती वाऱ्यावर जसजसी पसरत जाईल तसतसी पुढे पुढे

पसरू दिली.

एक गोष्ट मात्र खरी की, उडत्या तबकड्या व पॅराशूटसारखे प्रकाशमान गोल अधूनमधून रात्रीच्या वेळेस आंबोली–दाणोली परिसरामधील नागरिकांनी पाहिलेले असत; त्यामुळे या कल्पनेवर लोकांचा विश्वास हळूहळू बसत चालला होता. दाणोली परिसर अशात-हेने शनिवारपासूनच गजबजू लागलेला होता. त्यात भाविक, भक्तगण, दीनदु:खी, औत्सुक्य असलेले असे काही नागरिक व परदेशी पर्यटकसुद्धा होते.

स्थानिक लोकांना त्यामुळे कोण, कुठचा हे कळायला बिलकूल वाव नव्हता. बंदोबस्तासाठी सावंतवाडीहून खास पोलिसपार्टीही गावात येऊन नेहमीप्रमाणे आदल्या रात्रीच दाखल झालेली होती एरवी दाणोलीसारख्या गावात पोलिस ही चीज क्वचित्‌च दृष्टीस पडे!

इंटरपोलकडून व पोलिस कमिशनर जोगसाहेबांच्याकडून मिळालेल्या खास संदेशांमुळे, मुंबईहून एक खास प्रशिक्षित गुप्तचराची तुकडी इन्स्पेक्टर भेंडे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी मध्यरात्री दाणोलीत येऊन दाखल झाली. त्यांनी सर्व गावाची पाहाणी केली. ठिकठिकाणी लोकांमध्ये मिसळून त्यांच्यातील चर्चा ऐकल्या. आपण मुंबईहून दाणोलीस येण्याचे कारण अशा प्रकारच्या आगळ्या उत्सवात स्वत:ला सहभागी होता यावे हाच असल्याचा सर्वत्र समज करून दिला.

कर्नलसाहेबांनी शुक्रवारी मध्यरात्री आंबोलीतील विश्रामधामातून बिनतारी संदेशाद्वारे जी माहिती पुण्याच्या पोलिस कमिशनरना पुरविली होती, ती त्यांनी मुंबई गुप्तचर विभागास दिली. ह्या बातमीमुळे एक गोष्ट नक्की झाली की, तिहार तुरुंगामधून पळालेला चार्लस्‌ सालाझार व त्याचे चार साथीदार त्या भागातच कुठेतरी

दडी मारून बसलेले असून त्यांचा श्रीसमर्थ साटममहाराज प्रकट होण्याशी काहीतरी निकटचा संबंध होता ! पोलिस खात्याच्या मते ही सर्व तस्कर मंडळी दाणोलीस या उत्सवप्रसंगी एकत्र येऊन पुढील बेत ठरविणार होती म्हणूनच लगेच मुंबईहून त्यांचे खास गुप्तहेर पथक दाणोलीत येऊन दाखल झाले होते. शिवाय मुंबई-गोवा–कोकणकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर ठिकठिकाणी गुप्तहेरांचे एक जाळे विणण्यात आलेले होते. सामान्य नागरिकांना मात्र ह्याची काहीच कल्पना नव्हती !

अकरा :

# हवामहल बंगलीत

सर्व मंडळी कर्नलसाहेबांअगोदरच उठून सावंतवाडीस जाण्यास तयार झालेली होती. सर्वांनी मग आपापले सामान कारवोटीस मारून मेटॅडोर गाडीत नेऊन ठेवले आणि लगेच रेस्टहाऊसवरील कर्मचाऱ्यांचे आभार मानून सर्व मंडळी डॅडींच्या ' हवा-महल'ची हवा चाखायला निघाली.

ठीक साडेनऊ वाजता सर्वजण बंगलीत येऊन पोहोचले. डॅडींचे नोकर ज्ञानु व शंकर याच्या मदतीने सर्वांनी आपापले सामान-सुमान आपापल्या खोल्यांमध्ये लावले.

सचिन–सलमा बंगली फिरून व आजूबाजूचे सर्व गार्डन, स्वीमिंग पूल, बॅडमिंटन कोर्ट पाहून अगदी बेहद् खूष झाली.

ब्रेकफास्ट तयारच होता. चहा,

कॉफी, दूध, बिस्किटे, ऑम्लेट, पाव, नारळाच्या वड्या सर्व काही टेबलावर जय्यत मांडून टेवलेले होते. शिवाय ११ वाजताच्या मधल्या न्याहारीसाठी घरचे हापूस आंबेही काढून ठेवलेले होते, एका बाजूस. 'मग थाट काय तो पुसता!' अशीच सर्व व्यवस्था होती. कर्नलसाहेब तो सर्व थाट बघून हसत हसत डॅडीकडे पाहत चेष्टेने म्हणाले 'काय बाबा, तू काय आम्हाला आठ–दहा वर्षांचे एकाच दिवसात एकदम खिलवणार की, काय ?'

मग त्यांनी डॅडींना डॉ. प्रसन्नांसह सर्वांची ओळख करून दिली. नाश्ता करून मुले पोहायला गेली.

'हल्ली उन्हाळ्यात कमी झालेलं असतं पाणी आमच्या तलावाचं ! पावसाळ्यात पाणी तुडुंब भरलं की, खरी खरी मजा येते बघ पोहण्याची !' डॅडींनी माहिती दिली.

पाणी कमी असल्यामुळे मुलांना एकटं पोहायला जाऊ देण्यात काही धोका नव्हता. जॉनला मुलांवर जरा नजर ठेवायला सांगून डॅडी व कर्नल शेख आत गेले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर कर्नलनी मुख्य मुद्द्याला हात घातला. आपला कोकण दौरा अचानक कसा ठरला, आदल्या रात्री आपण कोणते धाडस केले, गुहेतल्या तस्करांमधील संभाषणावरून मिळालेली अत्यंत महत्त्वाची बातमी लगेच आपण कमिशनरसाहेबांना बिनतारी संदेशाने पुण्यास कशी कळविली वगैरे सर्व वृत्तांत त्यांनी कॅप्टन वागळे ह्यांना ऐकवला व प्रश्न केला–

'अलीकडे तुमच्या भागांत म्हण उडत्या तबकड्या दिसतात ! कालच मी वर्तमानपत्रात वाचलं. ही काय नवीन भानगड आहे बुवा ?'

त्यावर लगेच हसत डॅडी म्हणाले– 'अरे बाबा, तुमच्या पुण्या-मुंबईकडील लोकांपेक्षा कोकणातले लोक अधिक बुद्धिमान आहेत. नुसत्या उडत्या तबकड्याच नव्हेत ! आजकाल तर बाह्य अवकाशामधून परलोकवासी झालेली माणसेदेखील उतरू लागली आहेत ह्या परशुरामाच्या पुण्यभूमीत ! उद्या रविवारी मध्यरात्री इथून जवळच्याच दाणोलीमध्ये पन्नास वर्षांपूर्वी दिवंगत झालेले श्रीसमर्थ साटममहाराज पुन्हा प्रकट होऊन भक्तास दर्शन देणार आहेत. '

'असं काहीतरी माझ्या कानावर आलं होतं खरं, परंतु त्याचा ह्या माझ्या प्रकरणाशी काय संबंध ? ' कर्नलनी पुन्हा प्रश्न केला

''संबंध तर आहेच, परंतु हा समर्थ साटममहाराज म्हणून प्रकट होणारा इसम कोण आहे. तेही मला ठाऊक आहे ! ' डॅडी उत्तरले.

'कोण बरे हा इसम ? ' कर्नलनी विचारले.

'तर मग सर्वच माहिती मी तुला देतो. ह्या भागातील बाबी तेली नावाचा एक इसम पूर्वी कस्टम्समध्ये नोकरीस होता. तेथून त्याला काही वर्षांपूर्वी कमी करण्यात आले. पुढे तो समुद्रावरील चोरट्या सोन्याचा चोरटा व्यापार करून गब्बर झाला. सध्या गोव्यात त्याने 'हॉटेल लव्ह्बर्डस्' आणि 'एक्झॉटिक् रिसॉर्ट' नावाची दोन पंचतारांकित हॉटेल्स सुरू केली आहेत.

'ह्या दोन्ही हॉटेल्स्मध्ये सर्व तऱ्हेचे बेकायदेशीर धंदे कायदेशीर-रीत्या चालतात ! अलीकडे ह्या इसमाने युरोपियन स्मगलर्स लोकांबरोबर आपले संबंध वाढविले आहेत. '

'हा बाबी तेलीच साटममहाराज असावा असा माझा अंदाज असून त्याला पकडल्यास आपल्यास उडत्या तबकड्यांचे रहस्य

उलगडेल.' डॅडीनी माहिती दिली. आता कर्नलसाहेबांना आदल्या दिवशी रात्री ऐकलेल्या गुहेतील तस्करांमधील संभाषणात येणारी बॉबी ही व्यक्ती कोण ह्याचा संदर्भ लागला.

'अरे, पण मग तुझ्यासारखी माणसं अजून गप्प का ? तुम्ही लोक काहीच कशी हालचाल करीत नाही ? ' कर्नलनी डॅडींना प्रश्न केला.

त्यावर डॅडी म्हणाले–' बाबारे, हे सर्व तस्कर व त्यांचे साथीदार सशस्त्र असतात. शिवाय संघटितही असतात. सामान्य नागरिक त्यामुळे अशा गोष्टींकडे कानाडोळाच करतात. कोणी त्यांच्या भानगडीत पडलेच तर त्याला प्राणास मुकावे लागते. सरकार-दरबारीही अशा प्रकारची दाद लागत नाही. बरं लागलीच, तर हे तस्कर पुराव्याअभावी न्यायालयात सहज सुटतात. मग तूच सांग. हे काम करायला कोण एकटा–दुकटा माणूस धजेल ? अलीकडे तर साटममहाराजांबद्दल लोकांत असलेल्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन ह्या तस्कर मंडळींनी त्यांच्या नावेही धंदा सुरू केलेला आहे ! श्रद्धाळू मंडळी तर उगाच साटममहाराजांचा कोप होईल म्हणून असल्या प्रकारांबद्दल संशयही व्यक्त करण्यास घाबरतात ! न जाणो महाराजांचा कोप झाला व कुणाचे बरेवाईट झाले तर ? कशाला आपण निष्कारण त्या वाटेला जायचं ? असा विचार करून शेवटी सर्व गप्पच बसलेले आहेत. त्यामुळेच तर ह्या बदमाशांना मोकळं रान मिळालं आहे !'

'असं आहे तर एंकंदर हे प्रकरण ! मग आता तू व मी मिळून गुप्त पोलिसांच्या सहाय्यानं लवकरात लवकर ह्या बदमाशांना पकडून दिलंच पाहिजे ! मी तसं वचनच देऊन आलेलो आहे कमिशनर जोगसाहेबांना ! तुला ह्या सर्व विषयाची बरीच माहिती आहे, त्यामुळे तुझंही साह्य होईल मला ! म्हणून मुद्दाम मी तुझ्या

बंगलीत राहायला आलो. हो, म्हणजे उगाच संशय नको यायला कुणाला.' कर्नल म्हणाले.

कर्नल व डॅडी गप्पा संपवून खोलीतून बाहेर पडले. मुले पोहणं, स्नान करून संध्याकाळी सायकलवरून सावंतवाडी शहर पाहा-ण्यास जाण्याचा कार्यक्रम आखीत होती. त्यानंतर सर्वांनी मिळून एकत्र बसून आंबे खाल्ले, दुपारचे छानपैकी कोकणी पद्धतीचे मासळीचे जेवण झाले, सर्वजण आराम करीत बसलेले होते; इतक्यात कर्नलना पुण्याहून ट्रंककॉल आला, 'मला बुवा कुणाचा फोन ह्यावेळी ?' असे म्हणत कर्नलनी फोन उचलला. एवढ्या साऱ्या गडबडीमध्ये कर्नल व डॉ. प्रसन्न ह्या दोघांपैकी कुणीही पुण्याला आपापल्या घरी पोचल्याची तार अगर फोन काहीच केले नव्हते. त्यामुळे कर्नलसाहेबांच्या पत्नी रोशन ह्यांनी हा ट्रंककॉल लावलेला होता.

रोशनबाई फोनवर बोलत होत्या.

'आजपर्यंत तुमचा कुणाचा फोन नाही की, तार नाही ! तुम्ही लोक काल कोकणात पोहोचलात ! मुलं बरोबर होती, म्हणून जरा काळजी हो !' मग आळीपाळीने सचिन व सलमाचे त्यांच्या त्यांच्या ममींशी बोलणे झाले. मिसेस् प्रसन्नही रोशनबाईंच्याच घरी होत्या.

दुपारचा चहापाणी झाल्यावर डॉ. प्रसन्न व सलमा ह्या जोडी-विरुद्ध डॅडी व सचिन असा बॅडमिंटनचा दुहेरी सामना चांगलाच रंगला.

'मॉडर्न बॅडमिंटनचे नियम प्रथम पुण्यात इसवी सन १८७० मध्ये आम्ही मिलिटरीवाल्यांनीच बनविले, अजून जगभर तेच नियम चालू आहेत बरं का !' कर्नलसाहेबांनी माहिती पुरविली.

इतक्यात डॅडींच्या नोकराने येऊन बातमी दिली 'आज रातच्याक साहेब, मामा मोचेमाडकरवाल्यांचा दशावतारी नाटक आसा म्हणता दाणुलीक् ! पोरांक् दावा, दावतल्यास तर, म्हणान् इलंय् सांगाक्— हो ! तुमचे मोटारी हत, रातचो उशीर झालो तरी चलात्. मियांबी येयन् वांगडाक् !' मालवणी भाषेत हेल काढीत शंकर म्हणाला. कोकणात थंडीच्या मोसमात जत्रांचा हंगाम असतो; तेव्हा बरीच दशावतारी नाटके होतात, परंतु मे महिन्यात अशी संधी क्वचितच येते.

"मुंबय्करवाल्यांसाठी सपेशल् खेळ हा म्हन्ता ह्यो !—उद्या मध्यान् रात्रीक्--साटम म्हाराज परगटतले मा ? त्येचो हो उच्छाव् हो !" शंकरने अधिक माहिती पुरविली, खरे म्हणजे शंकरलाच इच्छा होती, ते नाटक पहाण्याची !

'आम्ही पाहिलं आहे वस्त्रहरण नावाचं दशावतारी नाटक पुण्यात !" सचिन म्हणाला.

"अरे, कोकणातल्या दहीकाल्याची सर कुठे यायला बसली आहे तुमच्या त्या पुण्यामुंबईकरवाल्यांच्या वस्त्रहरणाला !" डॅडींनी असे म्हणत शंकरची बाजू भक्कम केली.

डॉ. प्रसन्नांनादेखील कोकणी दहीकाला पाहाण्याची बरेच दिवसांपासून इच्छा होती. मग सर्वानुमते रात्रौ दाणोलीस दशावतारी दहीकाला नाटकास जाण्याचा बेत नक्की करण्यात आला.

सायंकाळी मुले, डॉ. प्रसन्न व जॉन सायकलवरून सावंतवाडी शहराचा फेरफटका करावयास निघाले असता, इकडे कर्नलसाहेब व डॅडी ह्यांनी मिळून एक वेगळाच बेत आखला. मुले, डॉ. प्रसन्न व जॉन ह्यांना नाटकाला बसवून आपण जीप घेऊन बंटीसह दाणोली

ते आंबोली असा काही गुप्त मार्ग आहे का याचे संशोधन करायचे असा त्यांनी बेत केला. मात्र त्याबाबत इतक्यात कुणाकडे वाच्यता करायला नको, असेही त्या दोघात ठरले. बाबी तेली ऊर्फ आधुनिक साटममहाराज हे दाणोलीत प्रकट कसे काय होतात व पुन्हा तेथून अदृश्य कसे होतात, ह्या गोष्टीचा त्यांना छडा लावायचा होता. सर्व मंडळी पहाटे तीन ते चारपर्यंत नाटक पाहात बसलेली असतील, तेवढ्यात आपण जीपने दाणोली ते आंबोली मार्गाची पाहाणी करून पुन्हा पहाटेपर्यंत सहज दाणोलीस येऊ शकू असा त्या दोघांनी मिळून विचार केला.

सावंतवाडी शहर पाहून आलेल्या मंडळींना डॅडी व कर्नल-साहेबांच्या ह्या नव्या बेताची काहीच कल्पना नव्हती. रात्रौ ठीक नऊ वाजता सर्वांची जेवणे आटोपली. मेटॅडॉरमध्ये डॉ. प्रसन्न, मुले व ड्रायव्हिंग चाकावर जॉनची स्वारी बसली. जीपमध्ये बंटी, कर्नलसाहेब व डॅडी अशी मंडळी बसल्यावर रात्रौ ठीक अकराला ' संगीत जयद्रथवध ' नाटक पाहाण्यासाठी शंकरसहवर्तमान सर्व लवाजमा दाणोलीकडे निघाला.

●

बारा :

# पुन्हा एकदा गुहेकडे

' जे हेते कालाचे ठायी करून, जर का, यःकदाचित्, पण परंतु, अलबत् माझ्या आवडत्या प्रिय, मम पुत्राच्या केसाला जर कुणी धक्का लावलाऽऽऽऽ, तर हे दुर्योधना ! ह्यो अर्जुन सगळी पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळ हेंकां. उलटयाचां पालटां करून टाकल्याशिवाय शेंडीची गाठ मारणार न्हाय ! काय समाजलंस !' संगीत जयद्रथामधील, वर दिलेला अर्जुन व दुर्योधन ह्यामधील विनोदी संवाद ऐकण्यात व नाटक पाहण्यात मुले व डॉ. प्रसन्न, शंकर व जॉन हे सर्व तल्लीन झालेले पाहून कर्नल-साहेब व डॅडी साटममहाराजाच्या समाधीजवळ आले. पाहतात तर त्याठिकाणी काही मंडळी महा-राजाच्या समाधीवर फुले वाहत होती.

कुणालाही वाटावे कुणीतरी भाविक लोक असावेत हे! परंतु त्यामधील एकाची कर्नलसाहेबांशी नजरानजर झाली. दोघांनी एकमेकास ओळखले. ते सी. आय्. डी. इन्स्पेक्टर भेंडे होते. कर्नलसाहेबांनी मग त्याना एका बाजूस नेऊन आपण इथे कशासाठी आलो आहोत ते सांगितले. चार्लस् सालाझारने गोव्यातील आपला मुक्काम हालविला होता. तो तेरेखोल, शिरोडा, सावंतवाडी-मार्गे कधीही दाणोलीस येण्याचा संभव होता. ही गुप्त माहिती मिळाल्यामुळे लगेच मुंबई-पणजी विमानाने व पुढे जीपने ती गुप्तचर मंडळी नुकतीच दाणोलीत आलेली होती. इन्स्पेक्टर भेंडे म्हणाले, 'कर्नलसाहेब, तुम्ही काल पाहिलेली गुहा व तिच्या आजूबाजूचा परिसर ह्यांची मला एकदा पाहणी करायची आहे!' 'मग उशीर कशाला? बसा आमच्या जीपमध्ये, आपण सर्वच तिथे जाऊ या!' कर्नल इन्स्पेक्टरना म्हणाले.

तिघेही बंटीसह दाणोलीहून पंचवीस मिनिटात आंबोलीस येऊन पोहोचले. जीप सरकारी रेस्टहाऊसच्या आवारात उभी करून व जीपमध्ये रखवालदार म्हणून बंटीची नेमणूक करून ते सर्व पाऊलवाटेने डोंगराकडे निघाले. डॅडी, कर्नलसाहेब व इन्स्पेक्टर भेंडे अशी मंडळी टॉर्चच्या मंद प्रकाशात त्या किर्र रात्री हळू हळू चालत गुहेपाशी पोचली. अमावास्येच्या आदल्या दिवशीची ती रात्र! डोळ्यात कुणी बोट घातले तरी दिसू नये असा अंधार! रात्री साडेबारा वाजून गेलेले! मात्र आज त्या गुहेमधून उजेड अगर कसलाही आवाज येत नव्हता. इन्स्पेक्टर भेंडे ह्यांना तेवढ्या काळोखातही त्या गुहेजवळच्या एका काटेरी झुडुपात अडकलेला सफेद कपड्याचा तुकडा दिसला. लगेच तो त्यानी खेचून घेतला व स्वतःच्या खिशात ठेवून दिला. सर्व पाहणी करून झाल्यावर ते

त्रिकूट मागे फिरले.

इन्स्पेक्टर भेंडे मूळचे सावंतवाडीकडचेच. काही वर्षापूर्वी ते एकदा सुट्टीत सहकुटुंब आंबोलीस राहून गेलेले होते. त्यामुळे तेथील सर्व भागाची त्याना खडान्‌खडा माहिती होती. प्राचीन हिरण्यकेशी महादेव मंदिरालाही त्यांनी त्यावेळी भेट दिलेली होती, इन्स्पेक्टर भेंडे एका ठिकाणी उभे राहिले व म्हणाले,

'हा धनगराचा वसा! ह्या शिळेवर पूर्वी येणारी जाणारी वाहने रस्त्यात थांबून नारळ वाहत. ह्याची कथा अशी सांगतात की; आंबोली डोंगरामधून कोंकणातील वेंगुर्ले बंदराकडे जाणारा एक गुप्त मार्ग अठराव्या शतकात एका इंग्रज सेनाधिकाऱ्यास इकडच्या एका धनगराने दाखवून दिला. पण त्या ब्रिटिश अधिकाऱ्याने असा विचार केला की, जर हा मार्ग आपल्या शत्रूस न जाणो या धनगराने असाच पुन्हा दाखवून दिला तर ? हा विचार मनात येताच. त्याने त्या वाटाड्या धनगरास आपले काम होताच गोळी घालून ठार केले! पुढे कुणीतरी त्या अज्ञात धनगराच्या स्मरणार्थ इथे एक शिळा उभारली. आज कित्येक वर्षे त्या अज्ञात धनगरास आदरांजली म्हणून रस्त्याने जाणारी वाहने येथे थांबवून ह्या शिळेवर एक नारळ फोडून तो प्रसाद म्हणून वाटायचा प्रघात पडला आहे!"

इतके संभाषण होत असता कर्नलसाहेब मध्येच इन्स्पेक्टर भेंडेंना म्हणाले, 'इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही आता जसा आंबोली ते वेंगुर्ला गुप्तमार्ग सांगितलात, तसाच एकादा गुप्तमार्ग या डोंगरातून थेट अगदी दाणोलीजवळील साटममहाराजांच्या समाधीपर्यंत जात असावा! उद्या आपला सर्वांचा दोस्त चार्ल्स्‌सुद्धा बॉबीला घेऊन दाणोलीहून ह्याच मार्गाने आंबोलीत येणार! मग इथून तो

कुणालाही वाटावे कुणीतरी भाविक लोक असावेत हे! परंतु त्यामधील एकाची कर्नलसाहेबांशी नजरानजर झाली. दोघांनी एकमेकास ओळखले. ते सी. आय्. डी. इन्स्पेक्टर भेंडे होते. कर्नलसाहेबांनी मग त्याना एका बाजूस नेऊन आपण इथे कशा-साठी आलो आहोत ते सांगितले. चार्लस् सालाझारने गोव्यातील आपला मुक्काम हालविला होता. तो तेरेखोल, शिरोडा, सावंतवाडी-मार्गे कधीही दाणोलीस येण्याचा संभव होता. ही गुप्त माहिती मिळाल्यामुळे लगेच मुंबई-पणजी विमानाने व पुढे जीपने ती गुप्त-चर मंडळी नुकतीच दाणोलीत आलेली होती. इन्स्पेक्टर भेंडे म्हणाले, ‘ कर्नलसाहेब, तुम्ही काल पाहिलेली गुहा व तिच्या आजू-बाजूचा परिसर ह्यांची मला एकदा पाहणी करायची आहे !’ ‘ मग उशीर कशाला ? बसा आमच्या जीपमध्ये, आपण सर्वच तिथे जाऊ या !’ कर्नल इन्स्पेक्टरना म्हणाले.

तिघेही बंटीसह दाणोलीहून पंचवीस मिनिटात आंबोलीस येऊन पोहोचले. जीप सरकारी रेस्टहाऊसच्या आवारात उभी करून व जीपमध्ये रखवालदार म्हणून बंटीची नेमणूक करून ते सर्व पाऊल-वाटेने डोंगराकडे निघाले. डॅडी, कर्नलसाहेब व इन्स्पेक्टर भेंडे अशी मंडळी टॉर्चच्या मंद प्रकाशात त्या किर्र रात्री हळू हळू चालत गुहेपाशी पोचली. अमावास्येच्या आदल्या दिवशीची ती रात्र ! डोळ्यात कुणी बोट घातले तरी दिसू नये असा अंधार ! रात्रौ साडेबारा वाजून गेलेले ! मात्र आज त्या गुहेमधून उजेड अगर कसलाही आवाज येत नव्हता. इन्स्पेक्टर भेंडे ह्यांना तेवढ्या काळोखातही त्या गुहेजवळच्या एका काटेरी झुडुपात अडकलेला सफेद कपड्याचा तुकडा दिसला. लगेच तो त्यानी खेचून घेतला व स्वतःच्या खिशात ठेवून दिला. सर्व पाहणी करून झाल्यावर ते

त्रिकूट मागे फिरले.

इन्स्पेक्टर भेंडे मूळचे सावंतवाडीकडचेच. काही वर्षांपूर्वी ते एकदा सुट्टीत सहकुटुंब आंबोलीस राहून गेलेले होते. त्यामुळे तेथील सर्व भागाची त्याना खडान्खडा माहिती होती. प्राचीन हिरण्यकेशी महादेव मंदिरालाही त्यांनी त्यावेळी भेट दिलेली होती, इन्स्पेक्टर भेंडे एका ठिकाणी उभे राहिले व म्हणाले,

' हा धनगराचा वसा ! ह्या शिळेवर पूर्वी येणारी जाणारी वाहने रस्त्यात थांबून नारळ वाहत. ह्याची कथा अशी सांगतात की; आंबोली डोंगरामधून कोंकणातील वेंगुर्ले बंदराकडे जाणारा एक गुप्त मार्ग अठराव्या शतकात एका इंग्रज सेनाधिकाऱ्यास इकडच्या एका धनगराने दाखवून दिला. पण त्या ब्रिटिश अधिकाऱ्याने असा विचार केला की, जर हा मार्ग आपल्या शत्रूस न जाणो या धनगराने असाच पुन्हा दाखवून दिला तर ? हा विचार मनात येताच. त्याने त्या वाटाड्या धनगरास आपले काम होताच गोळी घालून ठार केले ! पुढे कुणीतरी त्या अज्ञात धनगराच्या स्मरणार्थ इथे एक शिळा उभारली. आज कित्येक वर्षे त्या अज्ञात धनगरास आदरांजली म्हणून रस्त्याने जाणारी वाहने येथे थांबवून ह्या शिळेवर एक नारळ फोडून तो प्रसाद म्हणून वाटायचा प्रघात पडला आहे !"

इतके संभाषण होत असता कर्नलसाहेब मध्येच इन्स्पेक्टर भेंडेंना म्हणाले, ' इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही आता जसा आंबोली ते वेंगुर्ला गुप्तमार्ग सांगितलात, तसाच एकादा गुप्तमार्ग या डोंगरातून थेट अगदी दाणोलीजवळील साटममहाराजांच्या समाधीपर्यंत जात असावा ! उद्या आपला सर्वांचा दोस्त चार्ल्स्सुद्धा बॉबीला घेऊन दाणोलीहून ह्याच मार्गाने आंबोलीत येणार ! मग इथून तो

ग्लायडरवरून समुद्रातील 'स्ट्राथडन' जहाजावर उड्डाण करण्याचा प्रयत्न करणार ! सर्वच योगायोग आहे नाही का ?'

'पण त्यापूर्वीच कदाचित् आपण त्याला चतुर्भुजही करू शकू !" इन्स्पेक्टर भेंडे काहीशा आत्मविश्वासाने म्हणाले.

रात्रीचे दोन वाजलेले होते. रेस्ट हाऊसच्या आवारात उभ्या असलेल्या जीपवर पहारा देत बसलेला बंटी तेवढा कंटाळलेला होता. त्याला ह्या मोहिमेत अजून तरी मनाजोगते काम मिळालेले नव्हते. कर्नलसाहेबांची चाहूल लागताच तो धावत त्यांच्याजवळ आला. त्याला कुरवाळत कर्नलसाहेब म्हणाले,

'हा आमचा बंटी, बुल टेरियर जातीचा शिकारी कुत्रा. तुमच्या पोलिसच्या डॉबरमन जातीच्या कुत्र्यालाही मागे टाकेल असा आहे आमचा बंटी ! केवळ वासावरून गुन्हेगार ओळखतो !'

'हो का ? मग मी त्याची परीक्षा घेऊ का जरा ?' भेंडेने प्रश्न केला.

'द्या की, खुशाल !' कर्नल हसत म्हणाले.

मग भेंडे इन्स्पेक्टरांनी बंटीला एका कोपऱ्यात नेऊन आपल्या खिशातील कापडाचा तुकडा काढून हुंगविला व म्हटले, 'काढ पाहू ह्याचा मालक शोधून !'

बंटी धावत जाऊन कर्नलसाहेबांचे पाय चाटू लागला.

'वा ! वा ! इन्स्पेक्टरसाहेब, अहो तुम्ही तर माझ्या कुत्र्याच्या मदतीने मलाच की, हो गुन्हेगार ठरविलंत !'

कर्नलसाहेबानी मग तो कापडाचा तुकडा आदल्या रात्री गुहेजवळून घाईत परतत असतांना काटेरी झुडुपाला अडकून फाटलेल्या त्यांच्याच शर्टचा होता ही माहिती इन्स्पेक्टर भेंडे ह्यांना

दिली. संभाषण असंच पुढे चालल असत परंतु रात्रीचे तीन वाजले असल्याची डॅडीनी सर्वांना आठवण करून दिली. नाटक संपण्या-पूर्वी दाणोलीस हजर व्हायला हवं होतं. मग कर्नलनी जीप सुरू केली आणि वीस–पंचवीस मिनिटांतच ते दाणोलीस येऊन हजर झाले.

भेंडे इन्स्पेक्टरांनी कर्नलसाहेब व डॅडी ह्यांचे आभार मानून त्यांचा निरोप घेतला.

' संगीत जयद्रथ ' नाटक संपत आले होते. पावणेचारला नाटक संपले. सर्व मंडळी मामा मोचेमाडकरवाल्यांवर बेहद् खूष होती. मुलांना तर नाटकातील उखाणे फारच आवडलेले दिसले. ' अंब्यार्, जांभो आणि माडार् गाय तर समुद्रात वणवो, कसो तो सांगा ? कर्मणा गहनं गति आणि कोंबड्यान् गिळलो हत्ती, कसो तो सांगा ?' इत्यादी उखाणे मुले नाटक संपल्यावरसुद्धा एकमेकांना सांगत होती. डॉ. प्रसन्नांनादेखील हा अनुभव नवाच होता. ते म्हणाले,

' आपण सर्वांनी ह्याबद्दल शंकरचेच आभार मानायला हवेत ! त्याच्यामुळे तर आपणाला हे सुंदर नाटक पाहाता आलं '! पाहु-ण्यांनी केलेल्या प्रशंसेमुळे शंकरच्या अंगावर मूठभर मांस चढले.

पहाटे पाचला सर्वजण हवामहल बंगलीत परतले व जो तो मिळेल ती जागा पकडून घोरू लागला.

२२२८
७२।६।
वा वा

तेरावे :

## शत्रूंच्या शिबिरात

रविवार सकाळ उजाडली. मुले जागी झाली तेव्हा दिवस बराच वर आलेला होता. घरात विशेष गडबड दिसत नव्हती. बागेत एकटाच शंकर झाडांना पाणी घालीत होता. डॅडी व कर्नलसाहेब सकाळीच उठून लगबगीने नऊची एस्. टी. पकडून शिरोड्याला गेले होते. ही बातमी-सुद्धा मुलांना शंकरकडूनच मिळाली. त्यांना म्हणे सकाळी ७ वाजतां शिरोड्याहून एक खास संदेश फोनवर मिळाला. लगेच ते एस्. टी. नेच शिरो-ड्यास निघाले. भिंतीवरच्या घड्या-ळाने दहाचे ठोके देताच मात्र मुले भानावर आली. रात्रीच्या जागरणा-मुळे आपण आळशासारखं किती वेळ झोपलो आहोत असा विचार मनात येऊन सचिन व सलमा दोघा-

नाही जरा लाजल्यासारखं वाटल. डोक्यातून अद्याप रात्रीचं नाटक उतरलेलं नव्हतं ! ब्रेकफास्टची वेळ तर कधीच निघून गेलेली होती.

' ही तर लंचची वेळ झाली ! पण डॅडी व कर्नल अंकल कुठे बरे गेले असतील एवढ्या सकाळी–सकाळी ? ते बदमाशांना तर पकडायला गेलेले नसतील ? ' सचिनने सलमाला आपल्या मनातील शंका बोलून दाखवली.

' अरे, ते तर शिरोड्याला गेलेत म्हणे ! बदमाश राहिले इथं आंबोलीच्या गुहेत ! ' सलमा म्हणाली.

' अग, पण तुझ्या लक्षात आहे का ? शुक्रवारी रात्रौ आंबोलीतील रेस्टहाऊसमध्ये जेव्हा अंकल व जॉन परत आले, तेव्हाच ते आपल्याला म्हणाले होते की, त्या गुहेबद्दल त्यांना काहीतरी गुप्त माहिती आपल्याला द्यायची होती, परंतु त्यासाठी अशा माहितीची वाच्यता आपण कुठेही करणार नाही, असे त्यांना आपणा दोघांकडून प्रथम वचन हवं होतं ! ' सचिन म्हणाला.

[illegible] तर अजून आपल्याला काहीच सांगितलेलं नाही !' सलमा म्हणाली,

' अग, त्यांना कालचा संपूर्ण दिवस आपल्याशी काही बोलायला फुरसत तरी होती का ? सतत ते व डॅडी कसली तरी चर्चा करीत होते आणि आपण तरी कुठे मोकळे होतो सकाळपासून ? सतत आपलं खेळणं, फिरण, पोहणं. सायकलवरून रपेट व शेवटी रात्रौ दाणोलीला जाऊन ते दशावतारी नाटक पाहाणं ह्यातच तर आपला वेळ निघून गेला ! ' सचिन म्हणाला.

' पण रात्री तरी ते आपल्या मेटॅडोर गाडीतून आपल्याबरोबर कुठे आलेत ? ते आले जीपमधून आणि नाटकाच्या सुरुवातीस जे

उठून गेले ते पहाटे नाटक संपता संपता परत आलेत्! ' सलमा म्हणाली.

' म्हणजे मधल्या काळात निश्चितच ते कुठेतरी जाऊन आले असावेत! कुठं बरं ते गेले असतील ? बहुधा पुन्हा ते आंबोलीतील डोंगरावर असलेल्या त्या गुहेकडे तर गेले नसतील ? ' सचिनने आपल्या डोक्यातील तर्क बोलून दाखविला.

' तर मग त्यानी आपल्याला कां बरं विश्वासात घेऊ नये ? आपण दोघांनी बदमाशांना पकडून देण्यात नक्कीच काही तरी मदत केली असती !' सलमा म्हणाली.

दुपारची जेवणे आटोपली. मोठी माणसे वामकुक्षी करीत होती. मुले आपल्या खोलीत बसून काही खास कार्यक्रम आखीत होती. हा कार्यक्रम जर मोठ्या माणसांच्या कानावर पडता तर मुलांना घराबाहेर पडणेच अशक्य होते, डॉक्टरकाका व जॉन ह्यांचा जरा डोळा लागलेला आहे अस पाहून मुले बंटीसह शंकरकडे गेली व आपण जरा बंटीस बाहेर फिरवून आणतो असे शंकरला सांगून जी घराबाहेर पडली ती तडक त्यानी आंबोलीकडे जाणारी सडक पकडली ! कसेही करून आज ते ती आंबोलीच्या हिरण्यकेशी डोंगरावरील बदमाशाची गुहा शोधून काढणार होते !

दुपारचे तीन वाजून गेलेले होते. मे महिन्यातले ते रणरणते कडक ऊन ! मुले रस्ता चालतच होती. आज आंबोलीच्या वाटेवर लागणाऱ्या दाणोली गावात रात्रौ श्रीसमर्थ साटममहाराज प्रकटणार होते त्यामुळे सडकेवर माणसे व वहानांची वर्दळ व ये–जा नेहमीपेक्षा कितीतरी अधिक होती.

सुमारे दीडतास चालल्यावर मुले थकली. वाटेत लागलेली ती जांभळांनी लगडलेली झाडे पाहून दोन्ही मुलांना राहवेना. त्यांनी

झाडावरील जांभळे पाडून यथेच्छ खाल्ली.

'अशी मजा पुण्यात नाही येणार!' सचिन सलमाकडे पाहात जांभळानी रंगलेली जीभ तिला दाखवीत म्हणाला.

संध्याकाळचे पाच वाजत आले. मुले आता मात्र खरोखरच चालून दमलेली होती.

'आता आपण असं केलं तर, कुणाची तरी खाजगी मोटार हात उंचावून थांबवू व त्यातील माणसांना आपल्याला जरा वाटेत आंबोलीपर्यंत नेऊन सोडा अशी विनंती करू! पुण्यात नाही का कधी कधी शाळेला उशीर झाला व बस चुकली की, आपण लिफ्ट मागत!' सचिनने डोक्यातून शक्कल काढली.

'पण कोण देणार आहे आपल्याला आपली गाडी थांबवून लिफ्ट? तशात आपल्याबरोबर हा बंटी! ह्या एवढ्या मोठ्या कुत्र्याकडे पाहून तरी मला वाटत नाही कुणी आपली गाडी आमच्या-साठी थांबवेल!' सलमा निराशेच्या स्वरात म्हणाली.

'अशी अगदी निराश होऊ नकोस! तुझं म्हणणं काहीसं खरंही आहे, पण पाहू आपण प्रयत्न करून! 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे.' तशी मिळेलही आपल्याला एकादेवेळी लिफ्ट!' सचिन तिला धीर देत म्हणाला.

मुले अधूनमधून आंबोलीच्या दिशेने जात असलेल्या खाजगी वहानांकडे पाहून हात उंचावीत होती परंतु बराच वेळपर्यंत कुणीही त्यांच्यासाठी आपले वहान थांबविले नाही. अखेरचा प्रयत्न म्हणून दुरून येत असलेल्या एका मोठ्या इम्पाला गाडीकडे पाहात 'लिफ्ट! लिफ्ट!' असे मोठ्याने ओरडत सलमाने आपले हात हवेत उंचावले आणि काय आश्चर्य ती इम्पाला गाडी चटकन् येऊन मुलांजवळ थांबली. आत एक परकीय नागरिक एकटाच गाडी चालवीत होता.

सचिन, सलमा व बंटी कुत्र्याकडे नजर टाकताच त्याला आढळले की, या मुलांना व कुत्र्याला आपण दोनच दिवसांपूर्वी आंबोलीच्या रेस्टहाऊसमध्ये पाहिलेले आहे. मग त्या परकीय नागरिकाने आपल्या मोडक्या-तोडक्या इंग्रजीत मुलांना प्रश्न केला ' आपण इथे कसे काय आलात ? आपणाला कुठं जायचं आहे ? '

मुलांनाही त्या माणसाचा चेहरा आपण दोन दिवसांपूर्वी पाहिल्याच आठवलं. शुक्रवारी रात्रौ बदमाशाच्या गुहेला भेट देऊन आल्यानंतर जॉनशी बोलताना अंकल परकीय बदमाशांबद्दल काहीतरी बोलल्याचही मुलांना आठवलं, त्यामुळे कदाचित ह्या परकीय माणसाला जर त्या बदमाशांबद्दल काही ठाऊक असेल किंवा हाच जर त्यापैकी एक असेल, तर ह्याच्या मागावर राहिल्यास आपण ह्याच्याकडून त्या गुप्त गुहेचा पत्ता मिळवू शकू असा विचार मुलांच्या मनात डोकावला. लगेच मुलें उत्तरली–' आम्ही आंबोलीस रेस्टहाऊसवर उतरलो आहोत. आज दुपारी आम्ही आमच्या अंकलना न सांगताच फिरायला म्हणून बाहेर पडलो व वाट चुकलो. आमचे अंकल आमची वाट पाहात असतील. कृपया आम्हाला आंबोली रेस्टहाऊसपर्यंत नेऊन सोडाल का ? हा कुत्राही आहे आमच्या बरोबर, चालेल ना ?'

सचिन व सलमा दोघांचे सफाईदार इंग्लिश आणि त्यांच्या बोलण्यामधील आर्जव ह्यामुळे ही चुणचुणीत मुले त्या परकीय नागरिकास फार आवडली व त्याने बंटीसह त्यांना आपल्या मोटारीत घेतले. मोटार आंबोलीच्या दिशेने पळू लागली.

' तुम्ही काळजी करू नका. मी तुम्हाला सुखरूप नेऊन तुमच्या आईवडलांपाशी सोडतो. ह्यापुढे असं आईवडलांना न सांगता एकटं दुकटं फिरत जाऊ नका. हा भाग तुम्हाला अनोळखी

दिसतो ! तुम्ही इथे कुठून आलात ?' त्या परकीय नागरिकाचे बोलणे सुरू होते.

' आम्ही पुण्याहून इथं टुरिस्ट म्हणून आलोत ! ' सचिन म्हणाला.

' तुमचे आई वडील काय करतात ? ' त्या परकीय इसमाने पुन्हा प्रश्न केला.

' माझे वडील पुण्याच्या कॉलेजमध्ये प्राध्यापक आहेत. सलमाच्या वडिलांचे वर्कशॉप असून तिच्या आईची ट्रॅव्हल एजन्सी आहे. ' सचिन उत्तरला.

' हा कुत्रा तुमचाच का ?' त्या परकीय नागरिकाने परत विचारले.

सलमा म्हणाली, ' होय. '

असा त्यांचा संवाद चालू असताना गाडी रेस्टहाऊसजवळ येऊन थांबली. मुलांनी त्या परकीय नागरिकाचे आभार मानून त्याचा निरोप घेतला व ती त्या इम्पाला गाडीमधून खाली उतरली. गाडी मधून खाली उतरताच सचिन व सलमा दोघांनीही त्या परकीय नागरिक चालवीत असलेल्या इम्पालाच्याच दिशेने आपली वाटचाल सुरू केली.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या परकीय नागरिकाने ती इम्पाला गाडी फार पुढे न नेता तिथेच जवळ असलेल्या महाराष्ट्र पर्यटन केन्द्राच्या आवारात नेऊन उभी केली व नंतर तिला व्यवस्थित चावी करून तो डोंगराच्या दिशेने जाणाऱ्या एका छोट्या पाऊलवाटेने झपझप पावले टाकीत जात असलेला मुलांनी पाहिला. मुले बंटीसह त्याच्या मागून जाऊ लागली. त्या इसमाला सूर्यास्तापूर्वी

कुठेतरी पोहोचणे आवश्यक दिसत होते त्यामुळे तो एकदाही मागे वळून न पाहता जात होता. शेवटी डोंगरामधील एका गर्द झाडीत तो शिरला. त्याच्या हातातील टॉर्च त्याने पेटवली. नंतर तो एका खबदाडीत शिरलेला मुलांनी पाहिला. त्याचवेळी बंटी एकाएकी भूत दिसावे त्याप्रमाणे जोर जोरात भूंकू लागला. 'त्याला कसली तरी चाहूल लागली असावी!' सचिन हळू आवाजात सलमाला म्हणाला. 'बंटी, बंटी प्लिज स्टॉप माय डार्लिंग!' सलमा त्याला चुचकारत म्हणाली. पण बंटीचे भुंकणे फारच वाढले व तेथील भयाण शांततेचा भंग करू लागले. ह्या सर्वाचा परिणाम व्हायचा तोच झाला. जवळच गुहेत बसलेल्या चार परकीय बदमाशांच्या कानावर ते भुंकणे गेले. ते सर्व सावध झाले. एकाएकी रिव्हॉल्व्हर्स हातात घतलेले व डोळ्यास काळे चष्मे आणि अंगावर काळे झगे घातलेले ते चारही बदमाश गुहेबाहेर आले. त्यांनी सचिन व सलमावर एकदम झडप घातली, आणि दोघांनाही पकडून नेऊन गुहेच्या आतील भागात एकत्र दोऱ्यांनी एका खुर्चीस जखडून टाकले. मग त्यापैकी एकाने कुत्र्याच्या तोंडात बोळा कोंबून त्याचे भुंकणे बंद केले आणि त्यालाही साखळीस बांधून मुलांजवळच दुसऱ्या एका खुर्चीस बांधून ठेवले. मग त्यांनी सुमारे तासभर आजुबाजूचा परिसर धुंडाळला. तिथे कुणी नसल्याची खात्री करून घेऊनच ते गुहेत परतले.

चवदा :

# अवतार समाप्ती

कर्नलसाहेब व डॅडी ह्यांचा निरोप घेऊन दाणोली येथील पोलिस ठाण्यामध्ये मध्यरात्री तीन वाजून पस्तीस मिनिटांनी भेंडे इन्स्पेक्टरांची स्वारी प्रवेश करते न् करते तोच त्यांच्याशी एक व्यक्ती दूरध्वनीवरून बोलली– " लगेच शिरोड्यास एस. टी. स्टँडवर येऊन भेटा. तुमचा सज्जन. "

संदेश मिळताच इन्स्पेक्टर भेंडे एका खाजगी टेम्पोने शिरोड्यास पहाटे पाचच्या सुमारास येऊन दाखल झाले.

एवढ्या सकाळी शिरोडा बस स्टँडवर काही तुरळक प्रवासी होते. बहुतेक प्रवासी जवळच्या रेडी गावच्या न्यू इंडिया मॅन्गनिज् दग-डाच्या खाणीमध्ये काम करीत अस-

लेले वडारी कामगार होते, त्यातून सज्जन ही व्यक्ती हुडकून काढण्यास इन्स्पेक्टर भेंड्यांना त्या पहाटेच्या धूसर प्रकाशात जराही वेळ लागला नाही. सज्जन हा इन्स्पेक्टर भेंड्यांचा उजवा हात होता. नावाप्रमाणे खरोखरच एक सज्जन व्यक्ती; परंतु नशिबाने चुकून पोलिस खात्यासारख्या सदैव दुर्जनांच्या संगतीत व दुर्जनांशी सामना देणाऱ्या खात्यात भरती झालेली होती बिचाऱ्याची ! सज्जनला इन्स्पेक्टर भेंडे यांनी गोवा हद्दीलगत असलेल्या तेरेखोल गावी ठेवलेला होता. चार्लस् सालाझारने गोवा सोडला असल्याची खात्रीलायक बातमी त्यांना मिळाली, तेव्हा ते लगेच मुंबईहून विमानमार्गे पणजी येथील दाभोळ विमानतळावरून गोवा पोलिस खात्याच्या जीपने काही निवडक सहकाऱ्यांसह तेरेखोलला आले. इथे गोवा हद्द संपते व महाराष्ट्राची हद्द सुरू होते. तेरेखोलच्या किल्ल्यामध्ये गोवा सरकारचे पर्यटन निवास केन्द्र व हॉटेल असून मे महिन्यात तिथे बरेच प्रवासी येतात. तेरेखोल ते शिरोडा अंतर पायी एक तासात, तर मोटारीने फक्त दहा मिनिटांतच तोडता येते. चार्लस् गोव्यातून महाराष्ट्रात बहुधा याच मार्गाने प्रवेश करील अशी इ. भेंडे ह्यांची अटकळ होती. त्यासाठी त्यांनी आपला उजवा हात सज्जन ह्याची तेरेखोल पर्यटन केन्द्रात खास नेमणूक केली होती व त्याच्या सोबतीला दोन हत्यारबंद गुप्त पोलिसही ठेवलेले होते. स्वतः इ. भेंडे मात्र दाणोलीस मुक्काम ठोकून होते. कारण शेवटी कुठूनही चार्लस् दाणोलीमार्गेच आंबोलीस येणार, ह्याबद्दल त्यांना अगोदरच गुप्त बातमी मिळालेली होती. दाणोलीस आल्यावर कसेही करून त्याला आपण पकडूच पकडू ह्याबद्दल त्यांची मनोमन खात्री होती.

इ. भेंडे ह्यांचा अंदाजच शेवटी खरा ठरला. चार्लस्ने आपला

हॉटेल लव्हबर्डस्‌मधील मुक्काम शनिवारी रात्रौ आटपून केरी या खडेगावी प्रवासी म्हणून तो आला. तेथे त्याची भेट बॉबीशी झाली. बॉबीने चार्लस्‌साठी स्वतःच्या बॅगमधून धनगरवेष आणलेला होता. चार्लस्‌ व बॉबी ह्यांनी केरीत जेवण केले. मग ते लाँचने तेरेखोल खाडी ओलांडून तेरेखोल किल्ल्यातील सरकारी पर्यटनगृहात पोहोचले. ती मध्यरात्रीची वेळ होती. पर्यटनगृहामधील विश्राम-धामावर ती रात्र व दुसरा दिवस दुपारपर्यंत काढावा, तेथून पायी शिरोड्यास जावे, वाटेत चार्लस्‌ने धनगरवेष धारण करावा व एस्‌. टी.तून सावंतवाडी मार्गे दाणोलीस हजर व्हावे असा त्यांचा बेत ठरलेला होता.

मे महिन्यात तेरेखोल किल्ल्यावरच्या निवासी खोल्या प्रवाशांच्या गर्दीमुळे भरलेल्या असतात. आजही तीच स्थिती होती. सर्व सिंगल व डबल रूम्स्‌ भरलेल्या होत्या. फक्त एक मोठा तीन खोल्यांचा एकत्र संच ( सूट ) तेवढा उरलेला होता; परंतु त्या संचामधील तीन खोल्यांपैकी एका खोलीत सज्जन व त्याचे दोन सहकारी गुप्त-पोलिस राहिलेले होते.

चार्लस्‌ व बॉबीने विचार केला ' आता एवढ्या रात्री कुठं बरं जाणार ? तशात आपल्याला इथं ओळखणार तरी कोण ? उद्या संध्याकाळी तर आपण निघणार दाणोलीकडे ! जर सहप्रवासी कबूल झाले तर, राहू झाले ह्या संचातील दोन रिकाम्या खोल्यांमध्ये ! ' परंतु आपण वाघाच्या गुहेत नकळत शिरतो आहोत याची त्यांना काय बरे कल्पना !

सज्जन व मॅनेजर ह्यांच्या संमतीने ती जोडगोळी त्या संचा-मधील रिकाम्या खोलीत बस्तान ठोकती झाली ! सज्जन ही

व्यक्ती इ. भेंडे ह्यांच्या तालमीत तयार झालेली होती.

'एवढ्या रात्री एका भारतीय व्यक्तीसह एक परकीय व्यक्ती दुरून लाँचने खाडी पार करून तेरेखोलला येते, मग कदाचित् हीच ती व्यक्ती तर आपले सावज नसेल ना?" असा एक स्वप्नाळू विचार सज्जनच्या डोक्यात आला. सज्जन आता आपल्या खोलीमधून पलंगावर पडल्या पडल्या त्या दोन व्यक्तींच्या हाल-चालींवर नजर ठेवू लागला. त्यामधील भारतीय व्यक्तीने आपली बॅग उघडून त्या परकीय व्यक्तीस एक लंगोट, कुडते, मुंडासे व घोंगडी दिली. ती त्या परकीय व्यक्तीने परिधान केली व हातात काठी घेताच त्या व्यक्तीचा कायापालट एका धनगरात झाला! हे सर्व दृश्य सज्जनला विनासायास पलंगावर पडल्या पडल्या शेजा-रील खोलीमधील कपाटाच्या आरशात दिसत असले, तरी त्या दोन व्यक्तींना मात्र त्याची मुळीच कल्पना नसावी! आता त्या परकीय व्यक्तीस कुणीही एखादा धनगर म्हणूनच ओळखले असते, इतके ते बेमालूम वेषांतर होते!

सज्जनला ते दृश्य पाहताच चार्लस्‌विषयीच्या अनेक गोष्टींपैकी इन्स्पेक्टर भेंडेंकडून ठाऊक झालेली एक म्हणजे — बेमालूम वेषांतर करण्यासंबंधीची त्याची ख्याती आठवली! आता मात्र त्याचा संशय बळावला, लगेच पहाट होण्यापूर्वीच आपण ही बातमी इन्स्पे-क्टर भेंड्यांना दाणोलीस कळविणे जरूर आहे असे वाटून, त्याने हळू आवाज न करता खोलीबाहेर काढता पाय घेतला. रात्रौ तीन वाजून चाळीस मिनिटांनी तेरेखोल येथील पर्यटन केन्द्राच्या मॅने-जरला खास विनंती केली व दूरध्वनी, दाणोली पोलिस ठाण्याला जोडला. इन्स्पेक्टर भेंड्यांना तात्काळ पहाटेपर्यंत शिरोड्यास येऊन भेटावे असा संदेश दिला. इन्स्पेक्टर भेंडे सज्जनला शिरोडा

एस्. टी. स्टँडवर भेटले तेव्हा पहाटेचे सुमारे पाच वाजलेले होते. सर्वत्र सामसूम होती. फक्त एक खोपटेवजा हॉटेल तेवढे नुकतेच उघडलेले होते. त्यात काही वडारी कामगार रेडीकडे जायला सुटणाऱ्या सहा वाजताच्या पहिल्या एस्. टी.ची वाट पहात रॉके-लच्या दिव्याच्या मिणमिणत्या उजेडात तांबडा भडक चहा पीत व विड्या ओढीत गप्पा छाटीत बसलेले होते. इन्स्पेक्टर भेंडेंनी चहाच्या दुकानाच्या मालकाकडे चौकशी केल्यावर त्यांना समजले की, सात वाजल्याशिवाय तेथील प्रमुख तार ऑफिस उघडत नाही. त्याच ऑफिसमधून सावंतवाडीस ट्रंक दूरध्वनी लावता येण्याची सोय आहे. नाइलाजाने सात वाजेपर्यंत थांबून ठीक सातला इन्स्पे-क्टरसाहेबांनी सावंतवाडीस डॅडींना फोन लावला. बॉबी ऊर्फ बाबी तेली यास फक्त डॅडीच ओळखत होते. तो पूर्वी सावंतवाडीस कस्टम्स् खात्यात असताना डॅडींशी त्याचा परिचय होता. आदल्या दिवशीच्या डॅडींबरोबर झालेल्या संभाषणामधून ही माहिती इन्स्पे-क्टर भेंड्यांना कळलेली होती. आता वेळ दवडून जराही उपयोग नव्हता. सज्जनने तेरेखोलला पाहिलेले ते दोन पर्यटकच जर चार्लस् सालाझार व बॉबी असतील तर मग बॉबीची ओळख पटविण्या करता डॅडींची त्यांना निश्चित मदत होणार होती, फोनवर इन्स्पे-क्टर भेंडे डॅडींना म्हणाले, ' कर्नलनाही सोबत घेऊन आल्यास त्यांची आपणास मदतच होईल. मात्र कुणाला संशय येऊ नये अशा रीतीने साध्या प्रवाशाप्रमाणे मिळेल ती सकाळची पहिली एस्. टी. पकडून शिरोड्यास यावे. ' सुमारे साडेआठला डॅडी व कर्नल शिरोड्यात पोहोचताच सर्वजण चहापान करून भाड्याच्या मोटारने तेरेखोल किल्ल्यावरील पर्यटक केन्द्रावर पोहोचले.

ते दोघे संशयित पर्यटक अजून झोपलेलेच होते. डॅडी, कर्नल,

इन्स्पेक्टर भेंडे, सज्जन आणि त्याचे दोन सहकारी ह्यांनी स्नानादी कार्यक्रम आटपून मग दहाच्या सुमारास पर्यटन केन्द्रा-मधील 'डायनिंग हॉल' अशी मोठी पाटी असलेल्या खोलीत प्रवेश केला. डॅडींनी मुद्दाम डोकीस फेल्ट हॅट घालून ती स्वतःचा चेहरा झाकेल अशी तिरपी ओढून घेतली होती. ते सर्व आप-आपल्या जागी खुर्चीत स्थानापन्न झाले, न् झाले तोच थोड्या वेळात आदल्या दिवशी सज्जनजवळच्या शेजारच्याच खोलीत मध्यरात्री येऊन उतरलेली ती जोडगोळी डायनिंग हॉलमध्ये शिरली. डॅडींची नजर त्यांपैकी भारतीय दिसणाऱ्या नागरिकाकडे जाताच त्यांच्या तोंडून सहज उद्गार निघाले, 'अरे ! हा तर तो बाबी तेली ! बऱ्याच वर्षांनी पहातो आहे बेट्याला ! बराच फुगलेला दिसतो, गॅस भरलेल्या फुग्यासारखा !' आता त्यांची खात्रीच झाली की, बाबीसोबत असलेली व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून, ती म्हणजे दिल्लीच्या तिहार जेलमधून पळालेला कुप्रसिद्ध तस्कर खुनी चार्लस्च होय ! त्यांनी जवळ बस-लेल्या कर्नल, इन्स्पेक्टर भेंडे, सज्जन व त्यांच्या दोन हत्यारबंद सहकाऱ्यांना खूण केली. सर्वांनी चहापान लवकर संपविले. ते सर्व डायनिंगरूमच्या दाराजवळ गर्दी करून एकत्र उभे राहिले, सर्व तयारीत होते. मग डॅडी व इन्स्पेक्टर भेंडे सहज चालत चहापानात मग्न असलेल्या संशयित जोडगोळीकडे गेले. डॅडी चटकन् त्यांपैकी भारतीय दिसणाऱ्या व्यक्तीच्या अगदी जवळ जाऊन उभे राहिले. इन्स्पेक्टर भेंडे त्या परकीय व्यक्तीला चिकटून उभे राहिले, क्षणात डॅडी त्या भारतीय व्यक्तीचा एक हात व दुसरा दंड गच्च पक-डीत मोठ्याने ओरडले– "अरे बाबी ! तू किती वर्षांनी भेटतो आहेस ? म्हणे मोठा अमीर झाला आहेस ! आम्हा गरीबांची ओळख

तरी आहे का ?" हे वाक्य ऐकताच ते दोघे चपापले परंतु त्यांना पुढील हालचाल करण्याची संधी न देता डॅडी व भेंडे यांनी गच्च पकडून ठेवले. त्यांच्याबरोबरच्या सर्व साथीदार गुप्त पोलिसांनी लगेच पुढे सरसावून त्या दोन्ही महाधूर्त, खतरनाक तस्करांच्या हातांत लगेच बेड्या ठोकल्या. सकाळचे अकरा वाजून गेलेले होते, त्यानंतर त्या दोघा गुन्हेगारांचे सामान ताब्यात घेण्यात आले. सामानाचा पंचनामा करण्यात आला. पर्यटन केन्द्राचा मुख्य दरवाजा बंद केला गेला, सर्व पर्यटक प्रवाशांच्या सामानाचीही झडती घेण्यात आली. न जाणो, कदाचित् त्यामध्ये बदमाशांचे साथीदार असण्याचाही संभव होता ! ' चार्लस् व बनावट साटममहाराज ऊर्फ बॉबी ह्यांची तर अवतार समाप्ती झाली !' कर्नल उद्गारले.

लगेच दिल्ली गृहमंत्रालयास बिनतारी संदेश गेला. पंतप्रधान, गृहमंत्री व राष्ट्रपती ह्या सर्वांनीच खास संदेश देऊन इ. भेंडे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. मात्र ती बातमी लगेच देशातील वर्तमानपत्रे, आकाशवाणी व दूरदर्शन ह्या माध्यमांना मुद्दामच देण्यात आली नाही, कारण अद्याप तिहार तुरुंगामधून पळालेले चार्लस्‌चे चार साथीदार आंबोलीतील डोंगरातल्या गुहेत मोकळेच होते. त्यांना जर ही बातमी समजली असती तर ते पळून जाण्याचा संभव होता ! रविवारी रात्रौ आठला दिल्लीहून आलेल्या खास पोलीस तुकडीच्या ताब्यात चार्लस् व बॉबीला देण्यात आल्यावर एकदाचा इ. भेंडे व त्यांच्या सहकारी पोलिसांनी समाधानाचा सुस्कारा टाकला ! एका आंतरराष्ट्रीय बदमाशाला पकडून देऊन त्यांनी मोठीच जबाबदारी पार पाडली होती. आता जराही वेळ न दडवता त्वरित हालचाल करून पहाटेपूर्वी आंबोलीमधील गुहेत चार्लस् व बॉबीची वाट पाहात बसलेल्या त्याच्या

साथीदारांना गिरफदार करणे आवश्यक होते; म्हणून सर्व पोलिस मंडळी डॅडी आणि कर्नलसह, आंबोलीतील गुहेकडे निघाली. शिरोड्याहून कर्नलनी सावंतवाडीस डॉ. प्रसन्नांना फोन लावून ही अत्यंत आनंदाची बातमी त्यांच्या कानावर घातली. डॉ. प्रसन्न म्हणाले, ' पण इकडे एक अत्यंत वाईट बातमी आहे. मुले बंटीसह दुपारी घरातून बाहेर पडली, त्यांचा अजून पत्ता नाही ! ' बातमी ऐकून कर्नलसह सर्वच सचिंत झाले.

पंधरा :

# पुनर्जन्म

ते चारही बदमाश आपापसात ज्या भाषेतून बोलत होते ती भाषा सचिन व सलमा यांना मुळीच कळत नव्हती. मात्र त्यांपैकी एकाचा आवाज त्यांना ओळखीचा वाटला, आपल्याला आंबोलीपर्यंत आणून सोडणारा व नंतर आपण ज्याचा पाठलाग करीत असताना पकडले गेलो त्याचाच हा आवाज आहे, हे मुलांनी ओळखले.

बदमाशाच्या हालचालींवरून ते काहीसे गडबडीत असून कुणाची तरी वाट बघत आहेत हे मुलांनी ताडले.

' पीटर, सर्व तयारी जय्यत आहे. बॉस पहाटे चार वाजता बॉबीला घेऊन येणार ! एकदा त्याची ग्लाय-डरवरून रवानगी केली की, थोड्याच वेळात तो बोटीवर पोहोचेल. तिथे पोहोचल्याची खूण म्हणून तो मोठ-

मोठे प्रकाशनमान बलून्स आकाशात सोडील की, समजावं सर्व काही ठीक घडून आलं! मग आपण सर्वच बॉबीसह हॉटेल मिरा-मारमध्ये मजा करायला मोकळे !' डेनिझ म्हणाला,

'आणि ती पोरे व तो कुत्रा यांचं काय करायचं?' रॉबर्टने विचारले.

'पोरांना ठार मारून पोत्यात भरून गोव्याच्या वाटेवर देऊ टाकून समुद्रात ! आणि कुतरड्याला गोळी घालून टाकू इथेच ह्या डोंगरावरून खाली ! त्याची नको काळजी ! सध्या काही त्याची घाई नाही !' पीटर म्हणाला.

मग सर्व बदमाश, पोरांना जिथे बांधलेले होते त्या ठिकाणी, गुहेच्या आतील बाजूस आले. मुले झोपेचे सोंग घेऊन निपचित पड-लेली होती. ते पाहून त्यापैकी एकाने त्यांचे दोर सोडले व त्यांना जमिनीवर पालथे फेकून दिले. नंतर ते सर्व ती खुर्ची व तेथे जवळच ठेवलेला पेट्रोमॅक्सचा कंदील घेऊन बाहेर गेले,

सचिन व सलमा मनातून फारच घाबरलेली होती. इथे मोठ्याने बोलण्याचीही चोरी होती, आपण करायला गेलो एक तर झाले भलतेच असे त्यांना वाटत होते. आता हे बदमाश आपणाला जास्त वेळ जिवंत ठेवणार नाहीत ह्याची त्यांना खात्री होती. सलमाला तर या विचाराने अंकल व मम्मीची आठवण येऊन रडू कोसळायचेच बाकी राहिलेले होते. सचिन मात्र तिची अशाही प्रसंगी हळूवार आवाजात समजूत घालीत होता. यातून काहीतरी मार्ग निघू शकेल असे त्याला त्याची मनोदेवता सांगत होती. 'न निश्चितार्थताद् विरमन्ति धीराः !' म्हणजे आपल्या निश्चित केलेल्या कार्यापासून कितीही संकटे आली तरी– धैर्यवान लोक ढळत नाहीत. हे त्याच्या संस्कृतच्या गुरुजींनी 'अमृतमंथन' हा धडा शिकविताना सांगित-

लेले वचन त्याला त्यावेळी आठवले.

मुले आता बदमाशांनी दोऱ्या सोडल्यामुळे बंधमुक्त अवस्थेत गुहेमधील जमिनीवर पडून होती. जवळच एका कोपऱ्यामध्ये साखळीने बांधलेला व तोंडात बोळा कोंबलेला बंटी असहाय्य स्थितीत पडला होता. गुहेच्या बाहेरच्या बाजूस पेट्रोमॅक्सचा दिवा जळत होता. त्याच्या अंधुक प्रकाशामध्ये मुलांना तस्करांच्या सावल्या दिसत होत्या.

'एव्हाना पोरं तर झोपलीच! कुत्तरड्याच्या नरडीत कोंबलेल्या बोळ्यामुळे तोही पडला आहे निपचित एका कोपऱ्यात! कुठून दुर्बुद्धी झाली आणि ह्या कार्ट्यांना मी लिफ्ट दिली माझ्या मोटारमधून! नाहीतर हे असं झंझट नसतं उद्भवलं ह्या गडबडीत! बाकी पोरं मात्र फार चलाख आणि धाडसी दिसतात हं! खरोखर आपल्या गँगमध्ये शोभली असती!' रॉबर्ट म्हणाला. पोरांना इम्पाला गाडीतून लिफ्ट देणारा तो इसम म्हणजे रॉबर्ट होता हे बालवाचकांच्या आता लक्षात आले असेलच.

बाहेर बदमाशांचे खाणे पिणे चाललेले होते व गुहेच्या आत मुले गुहेमधून लवकरात लवकर सुटका कशी होईल या विचारात होती. एवढ्यात सरपटत सरपट सचिन व सलमा बंटीजवळ आली. त्यांनी बंटीची साखळी सोडली. मात्र पूर्वीच्या अनुभवावरून धडा शिकल्यामुळे त्यांनी बंटीच्या तोंडातील बोळा तेवढा तसाच राहू दिला. सरपटत सरपटत त्या दोघांनी गुहेच्या सर्व अंतर्भागाची चाचपणी केली असता एकेजागी त्यांना जमीन पार खचलेली आढळली. सचिनने त्या जागेवर सर्व शक्ती एकवटून अधिक जोर लावताच त्याजागी एक सुमारे तीन फूट लांब व तेवढीच रुंद भेग तयार झाली. प्रथम त्या भेगेमधून सचिनने बंटीस पुढे जाऊ दिले. तो पुढे

जाऊ लागताच सचिनही हळूहळू तसाच अंग चोरून त्या भेगेत शिरला. तर काय आश्चर्य, जरासे पुढ गेल्यावर त्याला पायऱ्या दिसू लागल्या. त्यापुढची वाट अंधारामुळे दिसत नव्हती. सलमा-देखील सचिनच्या मागोमाग येत होती, ती मध्येच एकदम थबकली.

तिला कसली तरी आठवण झाली. घरून निघताना प्रवासात उपयोगी पडेल या हेतूने तिने आपल्या बुटाच्या मोजात एक छोटी पेन्सिल–टॉर्च दडवून आणलेली होती. सलमाने स्पर्शाने चाचपून पाहिले. टॉर्च हाताला लागताच तिला फार आनंद झाला. ही टॉर्च तिला तिच्या मैत्रिणीने वाढदिवसाची भेट म्हणून दिलेली होती. टॉर्चचा उपयोग अशावेळी होईल याची तिला तेव्हा कल्पना नसणार ! म्हणतात ना–' खरोखर गरजेच्यावेळी जो धावून येतो तोच खरा मित्र,' ह्या म्हणीप्रमाणे सलमाला अशा संकटात आपल्या प्रिय मैत्रिणीची--दीपाची आठवण झाली. ' ही टॉर्च म्हणजे दीप–यावरून तुला नेहमीच माझी आठवण राहावी म्हणून मी ही तुझ्या वाढदिवसाच्या दिवशी तुला भेट देत आहे.' असं काहीतरी दीपा त्यावेळी बोलली होती सहज थट्टेने. पण आज खरोखर सलमाला त्या भुयारातील मिट्ट काळोखात तो इवलासा दीपच उपयोगी पडला होता.

टॉर्चच्या प्रकाशामुळे पुढची वाट हळू हळू त्यांना दिसत होती. त्या चिंचोळ्या वाटेने ते सरपटत सुमारे पंधरा मिनिटे गेल्यावर त्यांना एक चढणीसारखा रुंद व चालता येईल एवढा उंच रस्ता लागला. त्या रस्त्याने ते हळू हळू चालत होते. सुमारे अर्धा तास उलटल्यावर त्यांना ते भुयार संपले असल्याचे वाटू लागले. त्यानंतर पुढ एक चढणीवर वर वर जाणाऱ्या पायऱ्यासारखा मार्ग दिसू लागला.

सचिन, सलमा व बंटी तिथेच थांबली. तिथे थोडा वेळ विश्रांती घेतल्यावर सलमाने इकडे तिकडे नजर टाकली. तिला त्या पायऱ्यांच्या शिरोभागी एक प्रचंड दरवाज्याप्रमाणे शिळा दिसली.

अलिबाबा आणि चाळीस चोर या कथेमधील गुहेच्या दारावर असणारी ती शिळा अशीच काहीशी असावी का? अशी एक कल्पना उगीच दोघा मुलांच्या मनास चाटून गेली.

मात्र त्या शिळेला असलेल्या फटीमधून थोडाथोडा अंधूक प्रकाश दिसत होता. 'तिळा दार उघड' असे म्हणण्याचे सचिनच्या अगदी जिभेवर आले होते परंतु तसे काही न करता त्याने त्या शिळेवर पाय दिला तेव्हा ती बाजूस सरकली व त्या जागी वर जायला एक मार्ग दिसू लागला. ती एक विहिरीसारखी जागा होती. नेहमीप्रमाणे, प्रथम त्या विहिरीमधून वरच्या अंगास बंटी उडी मारून पार झाला. मागोमाग सचिन व सलमाही होतीच. वर येताच तो एका देवालयाचा गाभारा असून बाजूस एक घुमटी आणि शंकराची पिंडी असल्याचे सचिनच्या दृष्टोत्पत्तीस आले. ते एक जुने पुराणे शिवमंदिर होते. त्या देवळाच्या गाभाऱ्यात असणाऱ्या विहिरीसारख्या भुयारामधून जाणारा मार्ग शेवटी थेट आंबोलीतील डोंगरावरील बदमाशांच्या गुहेत जाऊन मिळत होता. सचिनने सलमाला आपल्या हाताचा घट्ट आधार देऊन त्या विहिरीमधून वर काढले. मग ती मुले बंटीसह देवळाच्या आवारात आली. तेथून त्यांना दूर कुठेतरी दिव्यांचा उजेड आणि झांजेचा आवाज ऐकू येऊ लागला. त्या आवाज व प्रकाशाच्या दिशेने मुले व बंटी चालू लागली. तिथे पोहोचताच तो परिसर त्यांनी पटकन ओळखला, आदल्या दिवशीच रात्री ती दोघं तिथे दशावतारी–नाटक पहायला आली होती त्यामुळे तो परिसर म्हणजे दाणोली येथील साटममहाराजांच्या समाधी-

लगतचा परिसर आहे हे ओळखण्यास त्यांना वेळ लागला नाही

'अंकल व माझे डॅडी आपली वाट पाहात फार काळजीत असणार, म्हणून प्रथम इथं आपण पोलिसला भेटू या, व त्याच्या मदतीने पोलिस ठाण्यावरून सावंतवाडीस हवामहल बंगलीवर फोन करू या!' सचिन सलमाला म्हणाला.

मुले खरोखरच शहाणी होती. ती दोघे उत्सवाच्या गर्दीमधून वाट काढीत तिथे बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसास जाऊन भेटली व त्याला थोडक्यात–आपण इथे कसे आलोत हे त्यांनी सांगितले. हवालदारानी त्या मुलांना व बंटीला पोलिस ठाण्यावर आणले, दाणोली पोलिस ठाणे हे चावडीजवळच एका छोट्या जागेत आहे. पोलिस ठाण्यात त्याचवेळी येऊन बसलेल्या एका व्यक्तीचे सहज त्या मुलांकडे व त्यांच्याबरोबर असलेल्या कुत्र्याकडे लक्ष गेले. मुलांना पाहून त्या व्यक्तीने प्रश्न केला–

'तुमची नावे सचिन आणि सलमा आहेत का?'

मुलांनी त्यापूर्वी त्या व्यक्तीस कधीही पाहिलेले नसल्यामुळे, आश्चर्यचकीत होऊन होकार दिला.

'बरं झालं तुम्ही सापडलात! प्रथम मी तुमच्या डॅडींना फोन करून सावंतवाडीस कळवितो की, तुम्ही सर्वजण इथे सुखरूप आहात!' ती व्यक्ती असे म्हणाली व तिने पोलिस स्टेशनमधील फोनची तबकडी फिरविली. फोन डॉ. प्रसन्नांनी उचलला. मुले साप-डलीत हे ऐकून त्यांचा आनंद गगनात मावेना. मग सचिन व सलमा ह्यांना त्या व्यक्तीने रिसिव्हर देऊन त्यांचा आवाज डॉ. प्रसन्न ह्यांची खात्री व्हावी म्हणून त्यांना ऐकविला. डॉ. प्रसन्न ह्यांच्या-कडून मुलांना बातमी मिळाली की; फोन येण्या अगोदर थोडावेळ शिरोड्याहून सावंतवाडीस पोहोचलेले कर्नल अंकल व डॅडी, जीपने

दाणोलीकडेच यायला निघालेले आहेत. ते दोघे पुढे गेलेल्या इन्स्पेक्टर भेंडे ह्यांनाच भेटायला दाणोलीस येत आहेत. आता मुलांच्या डोक्यात प्रकाश पडला की; मघाशी आपल्यास नावाने ओळखणारी व्यक्ती म्हणजेच इन्स्पेक्टर भेंडे होत.

इन्स्पेक्टर भेंडे ह्यांना शिरोड्याहून निघताना कर्नलसाहेबाकडून सावंतवाडीहून मुले नाहीशी झाल्याची फोनवर मिळालेली बातमी समजलेली होती. त्यामुळे त्यांनी कर्नलसाहेबांकडून मुलांची नावे व वर्णन मिळवून त्याची खबर जिल्ह्यामधील सर्व पोलिस स्टेशन्सना मिळेल अशी जातीने व्यवस्था करूनच ते दाणोलीस आले होते.

मुले भुकेलेली होती. हे त्यांच्या चेहऱ्यावरून सहज ओळखता येत होते. इन्स्पेक्टर भेंडे ह्यांनी त्यांच्यासाठी पोलिस ठाण्यातच जेवण मागवून घेतले. शिवाय बंटीचीही भोजनाची खास व्यवस्था त्यांनी करविली. जेवत असताना मुलांच्या तोंडून त्यांनी मुलांनी बदमाशांच्या तावडीतून कशी सुटका करून घेतली, ते सर्व वर्णन ऐकले. त्यांचा त्यांच्या कानावर विश्वासच बसेना ! एवढ्या लहान वयात एवढे धाडस व प्रसंगावधान दाखवून खतरनाक खुनी तस्करांच्या अड्ड्यावर जाऊन पुन्हा तेथून सुखरूपणे गुप्तवाटेने परत येणाऱ्या त्या छोट्या मुलांकडे पाहून इन्स्पेक्टर भेंडेना स्वातंत्र्य लढ्यात तिरंगी झेंडा हातातून न सोडता ब्रिटिश सोल्जरची गोळी हसत छातीवर झेलणाऱ्या कोवळ्या शिरीषकुमारची आठवण झाली. गहिवरून येऊन इन्स्पेक्टर भेंडे सचिन व सलमाच्या पाठीवरून हात फिरवीत व प्रेमाने त्यांची पाठ थोपटीत म्हणाले–,

'ब्रेव्हो ! ब्रेव्हो ! माय् डियर फ्रेन्डस् ! पोलिसांना न जमणारं काम तुम्ही आज केलेलं आहे ! तुमची नावं मी मुद्दाम राष्ट्रपती

वीर बालक पदकासाठी पाठवून देणार आहे ! '

इन्स्पेक्टरकडून ऐकलेल्या या प्रशंसेने मुलांचा सकाळपासूनच्या श्रमाचा सारा थकवा कुठच्या कुठेच पळून गेला होता.

एवढे सर्व होईस्तोवर, डॅडी व कर्नल यांची जीप दाणोली पोलिस ठाण्यात येऊन थडकली. तेव्हा रात्रीचे बारा वाजलेले होते. मुलांना इन्स्पेक्टर भेंडेबरोबर गप्पा मारताना पाहून कर्नल इन्स्पेक्टर भेंडेंना उद्देशून म्हणाले–,

' काय इन्स्पेक्टरसाहेब, शेवटी इकडे येऊन मुलांनाही गिरफदार केलंच म्हणायचं तुम्ही ! का रे पोरांनो ! कुठल्या मोहिमेवर गेला होतात, सर्वांना काळजीत टाकून ? ' मुलांकडे पाहात कर्नल पुन्हा म्हणाले.

' मी कसला गिरफदार करणार या शूर मुलांना ! उलट ह्यांचीच मदत घेऊन आता आपणास आंबोलीच्या गुहेत चार्लस् व बॉबी ह्यांची प्रतिक्षा करीत बसलेल्या तस्करांना गिरफदार करावं लागणार आहे ! ' असे म्हणून इन्स्पेक्टर भेंडे यांनी जेव्हा मुलांनी केलेल्या साहसाची सर्व हकिकत कर्नल व डॅडींना ऐकविली तेव्हा त्यांचाही ऊर भरून आला. कर्नल मुलांना छातीशी घट्ट धरून म्हणाले–

' बाळांनो, आज तुमचा खरोखर पुनर्जन्मच झाला म्हणायचा ! तुमच्यासारख्या शूर मुलांचा कुणाही आईबापांना अभिमानच वाटेल ! '

सोळा :

# थ्री चिअर्स टू थ्री

नाटकाचा शेवटचा अंक रात्री साडेबाराला सुरू झाला. भरतवाक्य म्हणायला असलेल्या नटसंचात प्रमुख कर्नल शेख हे धनगरवेष धारण केलेले चार्लस् सालाझार बनलेले होते, तर इन्स्पेक्टर भेंडे श्रीसमर्थ साटम महाराजांच्या वेषात बॉबी ऊर्फ बाबी तेली बनलेले होते.

सचिन, सलमा व बंटी ज्या गुप्त मार्गाने दाणोलीस आले तो मार्ग मुलांनी इ. भेंडे व कर्नल शेख यांना दाखवून दिला. ठीक साडेबारास धनगरवेषधारी कर्नल आणि समर्थ वेषधारी इन्स्पेक्टर भेंडे ह्यांनी दाणोलीच्याशिवमंदिरातील गाभाऱ्यात प्रवेश केला. गुप्तमार्गाने जाऊन भुयारातील दरवाजामधून एकदम एन्ट्री घेऊन बदमाशांवर हल्ला करा-

यचा असे ठरले. त्याचवेळी आंबोलीच्या संपूर्ण डोंगरास शस्त्रसज्ज पोलिसांनी वेढा दिला व कुणीही पळून जाऊ नये असा कडेकोट बंदोबस्त करण्यात आला. गुहेबाहेरील पोलिस व्हॅनमध्ये अर्थात् सचिन, सलमा, डॅडी व बंटी ही मंडळी होतीच.

इकडे आंबोलीच्या परिसरात हे नाट्य घडत असता तिथे दाणोलीमध्ये समर्थांच्या समाधीजवळ प्रचंड जत्रा भरली होती. समाधीसमोरील भजने, टाळ मृदुंग, चिपळ्या, झांजा ह्यांच्या जल्लोशात रंगली होती. भक्तजन रात्रौ एक वाजता उडत्या तबकडीमध्ये बसून येणाऱ्या साटममहाराजांची वाट पाहात बसलेले होते.

इकडे हिरण्यकेशी डोंगराला पोलिसांनी वेढा दिलेला होता. कुठच्याही क्षणाला गुहेमध्ये कर्नल शेख, इन्स्पेक्टर भेंडे प्रवेश करणार होते. त्यानंतर जी धुमश्चक्री होणार होती ती पाहाण्यासाठी गुहेबाहेरील सर्वांनी आपले श्वास रोखून धरलेले होते.

रात्रीचा ठीक एक वाजला. हातात काठी, डोकीस मुंडासे व खांद्यावर घोंगडी अशा वेषातील कर्नल व त्यामागोमाग रिव्हॉल्व्हर व टॉर्च घेतलेले इ. भेंडे ह्यांनी बदमाशांच्या गुहेत अचानक प्रवेश केला.

बदमाशांचा पत्त्यांचा डाव रंगात आलेला आहे व अतिमद्यपान केल्यामुळे ते बेसावधही आहेत हे इ. भेंडे व कर्नलसाहेब दोघांच्याही लक्षात आले.

प्रथम बराच वेळ त्या बदमाशांचे लक्ष कर्नल शेख व इ. भेंडे ह्यांच्याकडे गेलेच नव्हते, पण नंतर कर्नलनी पुढे होऊन 'हाय्' असा शब्दोच्चार करताच ते सर्व भानावर आले. त्यानी आपआपल्या हातामधील घड्याळाकडे पाहिले. त्यामधील एकजण त्या धनगर-

वेषधारीलाच चार्लस् समजून पोर्तुगीज भाषेत ओरडला.

'काय बॉस् ! बॉबी ! आपण आणि एवढ्या लवकर इथे ! काही गडबड झाली का ? आपण तर पहाटे चारला येण्याचे ठरलेले होते !'

परंतु क्षणाचाही विलंब न लावता त्या धनगरवेषधारी कर्नलसाहेबांनी सर्वांवर रिव्हॉल्व्हर रोखले व पोर्तुगीज भाषेत त्या बदमाशांना गुपचूप हात वर करून गुहेबाहेर चलण्याचा हुकूम केला. प्रथम ते चारही बदमाश पार गोंधळून गेले. त्यांना हा प्रकार काय आहे तेच समजेना परंतु दुसऱ्याक्षणी इन्स्पेक्टर भेंडे ह्यांनी रॉबर्टवर झडप घातली. आता मात्र त्या बदमाशांच्या लक्षात सर्व प्रकार आला.



सॅन्डीने चटकन् कर्नलसाहेबावर हल्ला करून त्यांच्या हातामधील पिस्तुल हस्तगत करण्याचा प्रयत्न केला परंतु कर्नल पूर्णपणे सावध होते. त्यानी त्याचा तो प्रयत्न हाणून पाडला. सॅन्डीने चिडून तेथील खुर्ची उचलून कर्नलसाहेबांवर फेकली. त्याचा नेम चुकला व खुर्ची पेट्रोमॅक्सच्या कंदीलावर बसून तो एकदम भडकला. सॅन्डीचे

तोंड व संपूर्ण चेहरा भाजला. सॅन्डीने कर्नलसाहेबांवर केलेला हल्ला पाहाताच रॉबर्टने स्वतःचे पिस्तुल काढण्यासाठी पँटच्या खिशात हात घातला तोच त्याचा हात पँटच्या खिशात असतानाच इन्स्पेक्टर भेंडेनी चपळाईने एवढ्या जोरात पिरगळला की, रॉबर्ट कळवळला व तो प्रयत्न त्याने सोडून दिला. इ. भेंडेनी रॉबर्टला निशस्त्र केले. रॉबर्ट शरण येताच त्याला त्यानी बेड्या ठोकल्या.

चेहरा भाजलेल्या स्थितीत सॅन्डीलाही आता प्रतिकार करणे शक्य नव्हते त्यामुळे तोदेखील शरण आला. मग त्यालाही बेड्या ठोकण्यात आल्या.

मात्र या सर्व गडबडीचा फायदा घेऊन पीटर व डेनिझ् हे दोघेजण गुहेबाहेर निसटले. ते कुठे गेले त्याचा पोलिस पथकास पत्ता लागेना. ते डोंगरातच काळोखाचा फायदा घेऊन कुठेतरी लपून राहिलेले असावेत असा तर्क इ. भेंडें ह्यानी कर्नलना बोलून दाखविला. नंतर ते स्वतः, कर्नल, डॅडी, सचिन, सलमा, बंटी या सर्वांसह पोलिस जीप घेऊन डोंगराखालील रस्त्याने निघाले. जाता जाता त्यानी सशस्त्र पोलिस दलाला सूचना केली. की, कुठल्याही परिस्थितीत पीटर व डेनिझ् ह्या दोन डोंगरामध्ये दडून बसलेल्या बदमाशांचा शोध लागेपर्यंत डोंगराभोवती दिलेला वेढा उठवायचा नाही. त्यासाठी मधून मधून सर्व पोलिसांना आळीपाळीने विश्रांती द्यावी.

इन्स्पेक्टर भेंडे सूचना देऊन डोंगरमाथ्यावरून आपली जीप खाली उतरवत होते. मागील जीपमध्ये डॅडी, सचिन, सलमा व बंटी आणि त्याही मागून असलेल्या एका पोलिस व्हॅनमध्ये सशस्त्र पोलिस पथक व कर्नलसाहेबांची स्वारी असा लवाजमा आता डोंगर उतरू लागला होता. इतक्यात एकाएकी बंटीने जोरजोराने भुंकत

पोलिस जीपमधून बाहेर उडी टाकली. बंटी डोंगरमाथ्याकडील एका झुडुपाजवळ धावत येऊन उभा राहिला व जोरजोरात गुरगुरू लागला. लगेच एका हातात रिव्हॉल्व्हर व दुसऱ्या हातात वॉकी टॉकी... यंत्र घेतलेले इन्स्पेक्टर भेंडे व सज्जन बंटीच्या मागोमाग पोलिस व्हॅनमधून उड्या टाकून त्या गर्द झुडुपांजवळ येऊन पोहोचले.

ज्याअर्थी बंटी एकाएकी असा झुडुपाजवळ येऊन भुंकत आहे, त्याअर्थी नक्कीच तिथे जवळपास कुणीतरी दडून बसलेलं असावं अशी इ. भेंडेना खात्री वाटू लागली. त्यांनी आपल्या हातातील वॉकी टॉकी वरून, आवाहन करण्यास सुरुवात केली. ‘ झुडुपात दडलेल्या व्यक्तीने लगेच स्वतः बाहेर येऊन पोलिसांना शरण यावे.’ परंतु बराच वेळ कुणीही बाहेर येईना अगर कसलीही हालचाल करीना. ह्यात सुमारे एक तास गेला. रात्रीचे तीन वाजून गेले होते.

एवढ्यात बंटीने धावत दूर जाऊन तेथील झुडुपात दडून बसलेल्या एका व्यक्तीची कॉलरच पकडली आणि त्या व्यक्तीस तो झुडपाबाहेर खेचण्याचा प्रयत्न करू लागला. बंटीच्या तावडीतून सुटका करून घेण्याचा अखेरचा प्रयत्न करावा म्हणून आपल्या बुटात दडविलेला चाकू काढण्याकरिता तो बदमाश खाली वाकला मात्र आणि बंटीने त्याची मानगूटच घट्ट पकडली व त्याला जरासुद्धा हालचाल करण्याची संधी न देता झुडुपामधून खेचूनच बाहेर काढले.

एवढे होईपर्यंत इ, भेंडे व सज्जन तेथपर्यंत येऊन पोहोचले होते. त्यानी रक्तबंबाळ स्थितीतील डेनिझला बेड्या ठोकल्या. डेनिझची पोलिस व्हॅनमध्ये भरती करण्यात आली,

पीटर या चवथ्या बदमाशाचा पत्ता मात्र पहाटेपर्यंत पोलिसांना लागलेला नव्हता. अखेरीस सकाळी सहाच्या सुमारास एका पाद-

चाऱ्याने येऊन पोलिसाना माहिती दिली की; डोंगराच्या पायथ्याशी एक मृतदेह रक्तबंबाळ स्थितीत पडलेला असून ती व्यक्ती परकीय नागरिक असावी.

लगेच पोलिसपथक तो मृतदेह ज्या ठिकाणी पडलेला होता, त्या ठिकाणी जाऊन दाखल झाले. पोलिसांनी त्या प्रेताचा ताबा घेतला. त्यानंतर रॉबर्ट, सॅन्डी व डेनिझ ह्यानी ती मृत व्यक्ती म्हणजेच आपला म्होरक्या पीटर असल्याची पोलिसांना ओळख दिली. धावपळीमध्ये. अंधारात नीट दिसू न शकल्यामुळे, बहुधा मद्याच्या प्रभावाखाली असलेल्या पीटरचा पाय घसरून तो दरडी-वरून गडगडत खाली आला असावा व त्यांतच डोके फुटून त्याचा अंत झाला असावा असा इन्स्पेक्टर भेंडे ह्यांनी तर्क केला.

अशातऱ्हेने आंतरराष्ट्रीय कीर्तीचा कुप्रसिद्ध खुनी तस्कर व त्याच्याबरोबर दिल्ली येथील तिहार जेलमधून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झालेले सर्वच्या सर्व गुन्हेगार गिरफदार झालेच; परंतु श्रीसमर्थ साटममहाराज ह्या पुण्यपुरुषाच्या नावाने अंध-श्रद्धाळू जनांना आपल्या नादी लावणारा बदमाश बॉबी ऊर्फ बाबी तेली हाही गजाआड झाला. अखेरीस त्या आधुनिक साटममहा-राजांची अवतार समाप्ति झाली !

बॉबीने दिलेल्या कबुलीजबाबावरून मनोरंजक माहिती उघड-कीस आली, बॉबी ऊर्फ बाबी तेली हा कोकण किनाऱ्यावरील सागरी तस्कर–सम्राट म्हणूनच ओळखला जाई. पूर्वी कस्टम्स खात्यातील केलेल्या नोकरीमुळे त्या खात्यात त्याच्या बऱ्याच ओळखी होत्या. त्यामुळे बरीच वर्षे त्याचा चोरट्या मालाचा धंदा बिनधास्तपणे चाललेला होता. अलीकडे भारत सरकारने सागरी मार्गाची प्रचंड नाकेबंदी केली. तसेच चोरट्या मालाचे साठे कर-

ण्याकरिता लागणारी गुदामे मिळणेही कोकणात मुष्किल होऊ लागले. त्यावेळी त्याने आंबोलीच्या डोंगरामधील गुहांचा उपयोग त्या कामासाठी करावयास सुरूवात केली. त्या मालाच्या देवघेवीच्या व्यवहारासंबंधात अनेक परदेशी स्मगलर मंडळी बॉबीस नित्य नियमाने आंबोलीस भेटावयास येऊ लागली. ह्या भेटींबद्दल स्थानिक लोकांत संशय उत्पन्न होऊ नये म्हणून ही उडत्या तबकड्यांची व साटमहाराज दाणोलीत प्रकट होण्याची कल्पना बॉबीच्या सुपीक डोक्यातून निघाली. परदेशातून येणारे हे स्मगलर्स दर अमावास्येस बॉबीची दाणोलीस भेट घेत, त्यावेळी ते सर्व आपण पर्यटक म्हणून ह्या पवित्रस्थळाला भेट देतो असेच भासवीत! अमावास्येच्या आसपास काळोख्या रात्री असे बरेच परदेशी तस्कर विमानांमधून हवाई छत्र्यांना प्रकाशझोत लावून कोकणातील सागर किनाऱ्यावर उतरत असत व आपणास कुणी ओळखू नये म्हणून मुद्दाम चित्रविचित्र पोषाख घालीत, विविध प्राण्यांचे मुखवटेही धारण करीत. अशा वेळी बॉबीचे स्थानिक साथीदार गावांतील रस्त्यावर असलेल्या दिव्यांच्या विद्युत जोडण्या तात्पुरत्या तोडून ठेवीत. त्यामुळे सवत्र अंधार होई. अंधाराचा फायदा घऊन हे परदेशी तस्कर आपल्या हालचाली बिनधास्तपणे करू शकत असत.

सचिन व सलमाने आंबोलीच्या विश्रामधामापुढील खडकावरून पाहिलेल्या दूर समुद्रांत उतरणाऱ्या प्रकाशमान गोल वस्तू त्या ह्याच होत्या. हे कर्नलसाहेबांच्या आता लक्षात आले. अशा तऱ्हेने कोकण किनाऱ्यावर दिसणाऱ्या उडत्या तबकड्यांचे रहस्य उलगडले गेले.

पण ह्या नाटकाचा अखेरचा अंक संपताना व नाटकाचा पडदा पडताना नाटकात महत्त्वाच्या भूमिका पार पाडणारे ते दोन छोटे जीव

पहाटेच्या सुमारास पोलिसव्हॅनमध्ये बटीस कुशीत घेऊन कधीच गाढ झोपी गेलेले होते ! आदल्या दिवशी दुपारी घरामधून निघाल्या-पासून तो आज दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत त्या कोवळ्या जिवांना विश्रांती कशी ती आताच मिळालेली होती ! मात्र झोपेतसुद्धा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व कर्तव्यपूर्तीचे समाधान हे भाव कुणा-लाही सहज दिसाण्यासारखे होते !

सोमवार सकाळच्या सर्व वृत्तपत्रांमधून, आकाशवाणी व दूर चित्र-वाणी ह्या सर्व प्रसिद्धी माध्यमांमधून देशोदेशीच्या कानाकोपऱ्यात जेव्हा ही बातमी पसरली तेव्हा कर्नलसाहेब, डॉ. प्रसन्न आणि मुले ह्या सर्वांवर सगळीकडून अभिनंदनपर तारा आणि पत्रे ह्यांचा नुसता पाऊस पडू लागला.

वृत्तपत्रात पहिल्याच पानावर सचिन, सलमा व बंटी ह्यांचे मोठे फोटो देण्यात येऊन त्याखाली खालील अक्षरे मोठ्या टाइपमध्ये देण्यात आली.

'थ्री चिअर्स टू थ्री !'

राष्ट्रपतींनी मुलांना पाठविलेल्या संदेशात म्हटले--

' तुमच्यासारखी धाडसी व प्रसंगावधानी मुले या देशात अस-ल्याबद्दल संपूर्ण देशाला त्याचा अभिमान वाटतो आणि ह्या देशाचे भवितव्य उज्ज्वल असल्याबद्दल खात्री वाटते !'

पंतप्रधानांनी मुलांचे अभिनन्दन करून त्यांना १५ ऑगस्ट ह्या भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी खास आपल्या घरी भेटायला येण्याचे आमंत्रणही देऊन टाकले.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सचिन व सलमा दोघांची नावे प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी देण्यात येणाऱ्या वीरबालक पदकासाठी राष्ट्रपतींकडे खास शिफारस देऊन पाठविली. शिवाय ह्या दोन

मुलांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपयांचे बक्षीस व पुढील सर्व शिक्षणही मोफत केले गेल्याचे जाहीर केले.

इन्स्पेक्टर भेंडे ह्यांना तर दिल्लीच्या गृहमंत्र्यांकडून अगोदरच जाहीर करण्यात आलेले एक लक्ष रुपयांचे बक्षीस मिळालेच, परंतु कर्नल शेख ह्यांनाही ह्या मोहिमेत स्वयंस्फूर्त भाग घेऊन गुन्हेगार राष्ट्रद्रोह्यांना पकडून देण्यात स्वतःचा जीव धोक्यात घालून केलेल्या मदतीबद्दल खास प्रशस्तिपत्र व पन्नास हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आले. एवढ्या सगळ्या गडबडीमध्ये, महाराष्ट्र राज्यातर्फे मुंबईत १५ ऑगस्ट रोजी शिवाजी पार्क मैदानावर झालेल्या महाराष्ट्र राज्य पोलिस संचलनाचे वेळी बंटीच्या गळ्यात एक खास रौप्यपदक अडकवून त्याचाही वीरोचित सन्मान करण्यास महाराष्ट्रराज्य पोलिस महानिरीक्षक विसरले नाहीत !

सरकारतर्फे मिळालेल्या सर्व चेक्सकडे पाहात, मुले व कर्नलना उद्देशून डॉ. प्रसन्न हसत हसत म्हणाले, 'एवढ्या वर्षांनंतर शाळेत शिकलेल्या 'साहसे श्री प्रतिवसति' या संस्कृत सुभाषिताचा खरा अर्थ आज मला समजला !'

BVBK-0402228

२२२८
९२।८५
ता.ता.